# द ऑफिसर्स टाईम्स®
# चालू घडामोडी

मनोहर पाटील

स्पर्धा परीक्षा मासिक ★ मुंबई ★ डिसेंबर २०१८ ★ अंक २९ ★ मूल्य. ५५ /-

*** लोकराज्य, लोकसत्ता, योजना, द हिंदू, कुरुक्षेत्र ***




★ परीक्षाभिमुख ★

नियुक्त्या व व्यक्ती विशेष, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय, पुरस्कार व पुस्तके, क्रीडा, आर्थिक, पर्यावरण , विज्ञान आणि तंत्रज्ञान, निर्देशांक

The Reliable Publication, Pune

संपादक : मनोहर पाटील 9222333999 www.reliableacademy.com

## द ऑफिसर्स टाईम्स®

# चालू घडामोडी

## डिसेंबर २०१८


संपादक

मनोहर एकनाथ पाटील

(संस्थापक – संचालक Reliable Academy)

लेखक

संदीप एकनाथ पाटील

(M.Sc. Biotech)


The Reliable Publication, Pune

# चालू घडामोडी डिसेंबर २०१८

UPSC-MPSC-PSI-STI-ASO & Tax Asst, Excise sub Inspector

प्रकाशक
The Reliable Publication, Pune
कार्यालयीन पत्ता : ५ वा मजला, सी. जे. जोशी कॉम्पलेक्स, वोडाफोन स्टोअरच्या वर, रेल्वे रिझर्व्हेशन सेंटर समोर, कल्याण (प.) ४२१ ३०१
Website : www.reliableacademy.com
Email : thereliableacademy@gmail.com
Facebook : http://www.facebook.com/@reliableacademy
Telegram : @mpscofficers

मुखपृष्ठ आणि अक्षरजुळणी : Team Reliable
मुद्रणस्थळ : पुणे
मूल्य : ५५/-

आवृत्ती : २९ वी, डिसेंबर २०१८
वितरणासाठी संपर्क : ९२२२३३३९९९
© सर्वाधिकार प्रकाशकाधीन

© All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without permission. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1 | यशोगाथा | 1 |
| 2 | नियुक्त्या | 3 |
| 3 | पुरस्कार | 8 |
| 4 | राज्य | 14 |
| 5 | राष्ट्रीय | 18 |
| 6 | जागतिक | 34 |
| 7 | आर्थिक घडामोडी | 52 |
| 8 | क्रीडा | 58 |
| 9 | विज्ञान आणि तंत्रज्ञान | 62 |
| 10 | व्यक्ती विशेष | 70 |
| 11 | महत्वाचे दिवस | 71 |
| 12 | MPSC-PSI-STI-ASO संभाव्य प्रश्न | 75 |

महाराष्ट्रात प्रथमच

# महा TEST SERIES



संस्थापक : श्री. मनोहर पाटील

## महाराष्ट्रात ३६ जिल्ह्यांमध्ये सर्व विध्यार्थींना मोफत



The Name Of Quality

Knowledge is Power

संस्थापक : श्री. मनोहर पाटील

**Reliable Academy®**

ISO 9001 : 2015



**प्रशासकीय अधिकारी आणि टीम रिलायबलच्या मार्गदर्शनातून साकारलेल्या सराव परीक्षा**

गरिबीचे चटके सहन करूनही जिद्द न सोडणाऱ्या व स्वतःच्या अस्तित्वासाठी नेहमी प्रयत्नशील असणाऱ्या ग्रामीण तसेच शहरी भागातील सर्व प्रामाणिक , मेहनती व होतकरू विद्यार्थ्यांसाठी...

| MPSC | PSI-STI-ASO | सरळसेवा |
| --- | --- | --- |
| राज्यसेवा पूर्व<br>GS + CSAT | संयुक्त पूर्व<br>परीक्षा | तलाठी<br>ग्रामसेवक<br>पोलीस भरती |

# मोफत

**दर सोमवारी सराव प्रश्नपत्रिका व उत्तर तालिका आपल्या Website**

**www.reliableacademy.com**

**वर सायंकाळी ७ला प्रसारीत केले जातील.**

**अधिक माहितीकरीता आम्हाला संपर्क करा.**

9222 333 999

@mpscofficers

# १. यशोगाथा



## बांगड्या विकणारा झाला आयएएस अधिकारी....

- स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या होतकरु विद्यार्थी मित्र/मैत्रिणींसाठी आम्ही आज एक प्रेरणादायी माहिती घेवून आलो आहोत. लहानपणीच पोलीओ झालेला रामू नावाचा एक मुलगा आईसोबत रस्त्यावर बांगड्या विकून आयएएस अधिकारी कसा होतो, हा रामूचा जीवनसंघर्ष आपणास नक्कीच प्रेरणादाई ठरेल.
- जेव्हा आपण दृढनिश्चय करतो व यश मिळविण्यासाठी दिवसरात्र एकत्र करुन प्रामाणिकपणे प्रचंड मेहनत घेतो, तेंव्हा यश आपलेच असते. याचे मुर्तीमंत उदाहरण आहे ते आयएएस अधिकारी रमेश घोलप यांचे...ते आज लाखो तरुणांचे आदर्शस्थान आहेत.
- लहानपणी रमेश घोलप यांना पोलीओ झाला. तेंव्हा त्यांच्या घरची परिस्थिती प्रचंड हालाखीची होती. दोन वेळेच्या जेवणाचेही वांधे होते, पोटासाठी त्यांची आई रस्त्यावर फिरुन बांगड्या विकत असे.
- रमेश यांच्या वडीलांचे सायकल दुरुस्तीचे एक छोटेसे दुकान होते. त्यांच्या परिवारामध्ये चार सदस्य होते मात्र वडिलांना दारुचे प्रचंड व्यसन असल्याने संपुर्ण परिवार रस्त्यावर आला होता.
- दारुचे व्यसन इतके वाढले की, त्यांना दवाखान्यात भरती करावे लागले. यामुळे परिवाराचा पोट भरण्यासाठी आईसोबत रमेश हे देखील बांगड्या विकण्यासाठी फिरु लागले. मात्र आपल्या मुलाने खुप शिकावे ही आईची ईच्छा होती.
- गावात प्राथमिक शिक्षण पुर्ण केल्यानंतर हायस्कुलमध्ये प्रवेश घेण्यासाठी रमेश आपल्या काकांच्या गावी गेले. सन २००५ मध्ये रमेश जेंव्हा १२ वीत होते तेंव्हा त्यांच्या वडिलांचे निधन झाले.
- काकांच्या गावापासून स्वत:च्या घरी जाण्यासाठी बसचे भाडे केवळ सात रुपये होते मात्र रमेश विकलांग असल्याने त्यांना केवळ दोन रुपये भाडे लागत होते. परंतू दुदैव्य इतके की त्यांच्या कडे दोन रुपये देखील नव्हते.
- तेंव्हा शेजाऱ्यांच्या मदतीने रमेश वडिलांच्या अंत्यविधीला कशेबशे घरी पोहचले. वडीलांचे छत्र डोक्यावरुन हरपल्यानंतरही त्यांनी १२वीत ८८ टक्के मिळवले. घरची जबाबदारी असल्याने डीएड करुन गावातल्या एका शाळेत ते शिक्षक म्हणून रुजू देखील झाले.

- याचवेळी त्यांनी बी.ए.ची डीग्री देखील घेतली. आपला मुलगा खुप शिकला शिक्षक झाला याचे कौतूक आईसह गावकऱ्यांनाही होते मात्र रमेश यांचे लक्ष काही तरी वेगळेच होते. रमेश यांनी सहा महिन्यांकरीता नोकरी सोडून देत युपीएससीची तयारी केली.
- २०१० मध्ये त्यांनी पहिल्यांदा ही परीक्षा दिली तेंव्हा त्यांच्या पदरी निराशा पडली. मुलाची जिद्द पाहून आईने गावातून काही पैसे उसनवारीने घेतले त्यानंतर रमेश पुणे येथे जावून युपीएससीची तयारी करु लागले.
- यावेळी रमेश यांनी शपथ घेतली होती की जोपर्यंत ते मोठे अधिकारी होत नाही तो पर्यंत गावकऱ्यांना आपले तोंडही दाखविणार नाही.
- प्रचंड इच्छाशक्ती व प्रामाणिक मेहनत काय करु शकते, याची प्रचिती २०१२ मध्ये आली.
- रमेश हे यूपीएससीच्या परीक्षेत २८७ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. कोणत्याही प्रकारच्या क्लासेसला न जाता महागडी पुस्तके न खरेदी करता गरीब व निरक्षर आई-वडीलांचा मुलगा आयएएस अधिकारी झाला.
- त्यांची पहिली पोस्टींग कुंती (झारखंड) येथे झाली. तेथे एक प्रमाणिक अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. यामुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या सर्व मित्र/मैत्रिनींनो छोट्याशा अपयशाने खचून जाऊ नका, परिस्थितीचा बाऊ करु नका.
- तुम्ही अधिकारी होण्याचे जे ध्येय निश्चित केले आहे, त्या मार्गावर प्रामाणिकपणे वाटचाल करा, यश तुमची वाट पाहत आहे.....भविष्यातील वाटचालीसाठी खुप खुप शुभेच्छा!

# २. नियुक्त्या



## ❖ सीबीआय संचालकपदी एम. नागेश्वर राव



- सीबीआय म्हणजेच केंद्रीय अन्वेषण विभागाचे संचालक आलोक वर्मा व विशेष संचालक राकेश अस्थाना या दोघांचेही सर्व अधिकार काढून घेतले आहेत.
- या दोघांनी परस्परांच्या विरुद्ध केलेल्या भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपांची केंद्रीय दक्षता आयोगाकडे (सीव्हीसी) चौकशी सुरु आहे.
- या अभूतपूर्व परिस्थितीचा विचार करता सीव्हीसीने आपल्या अधिकाराचा वापर करत आलोक वर्मा आणि राकेश आस्थाना यांचे सर्व अधिकार काढून घेण्याचा निर्णय घेतला आहे.
- या आदेशामुळे या दोन्ही अधिकाऱ्यांना पुढील आदेश मिळेपर्यंत सीबीआयचे कुठलेही कामकाज करता येणार नाही अथवा अधिकार वापरता येणार नाही.
- या प्रकरणाची प्रसारमाध्यमांमध्ये चर्चा झाल्यामुळे या संस्थेच्या प्रतिष्ठेला धोका पोहोचला आहे. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.
- सीबीआयच्या ७२ वर्षांच्या इतिहासात २ सर्वोच्च पदांवरील अधिकाऱ्यांवर अशी कारवाई एकाच वेळी करण्याची ही पहिलीच वेळ आहे.
- देशातील सर्वोच्च अन्वेषण संस्था असलेल्या सीबीआयच्या कार्यप्रणालीवर या प्रकरणाचे गंभीर आणि दूरगामी परिणाम होऊ शकतात.
- सीव्हीसीच्या या निर्णयाशी केंद्र सरकारही सहमत आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांना पदावरुन हटवण्याच्या निर्णयाला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे.
- या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने एम. नागेश्वर राव यांची सीबीआयचे संचालक म्हणून नियुक्ती केली आहे.
- ओडिशाच्या १९८६च्या तुकडीतील अधिकारी नागेश्वर राव सध्या सीबीआयचे सहसंचालकम्हणून कार्यरत आहेत.
- आलोक वर्मा १९७९च्या बॅचचे आयपीएअस अधिकारी आहेत. फेब्रुवारी २०१७मध्ये ते सीबीआयचे प्रमुख झाले. त्यापूर्वी ते दिल्ली पोलीस आयुक्त होते.
- सीबीआयचे विशेष संचालक राकेश अस्थाना १९८४च्या बॅचचे गुजरात आयपीएस अधिकारी आहेत. त्यांनी चारा घोटाळा आणि गोध्रा हत्याकांडाचा तपास केला होता. स्टर्लिंग बायोटेक घोटाळयात त्यांच्यावर लाचखोरीचा आरोप आहे.

## ❑ केंद्रीय अन्वेषण विभाग(CBI: Central Bureau of Investigation):-

- स्थापना: १ एप्रिल १९६३
- मुख्यालय: नवी दिल्ली
- ही भारत सरकारचे विशेष पोलिस आस्थापना, गुन्हे अन्वेषण विभाग व गुप्तहेर खाते आहे.
- ती राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या गुन्ह्यांचा (हत्या, घोटाळा आणि भ्रष्टाचार) तपास भारत सरकारतर्फे करते.
- सीबीआयची स्थापना १९४१मध्ये करण्यात आली होती पण याला एप्रिल १९६३ला सेन्ट्रल ब्युरो ऑफ इन्वेस्टीगेशन हे नाव देण्यात आले.
- भारत सरकार राज्य सरकारच्या संमतीने सीबीआयला राज्यातील प्रकरणांच्या चौकशीचे आदेश देते.
- शिवाय, सर्वोच्च आणि उच्च न्यायालय राज्य सरकारच्या सहमतीशिवाय कुठल्याही राज्यात अपराधीक प्रकरणाच्या चौकशीचे आदेश सीबीआयला देऊ शकते.

# ❖ पेटीएम बँकेचे नवे सीईओ आणि एमडी सतीश कुमार गुप्ता



- पेटीएमने पेटीएम पेमेंट्स बँकेचे सीईओ आणि एमडी म्हणून सतीश कुमार गुप्ता यांची नियुक्ती केली.
- सतीश कुमार गुप्ता यांनी स्टेट बँक ऑफ इंडियाचे उपमहाप्रबंधक (डेप्युटी जनरल मॅनेजर) म्हणून काम केले आहे.
- त्यानंतर त्यांनी नॅशनल पेमेंट्स कारपोरेशन ऑफ इंडियाचे मुख्य प्रकल्प अधिकारीम्हणूनही कार्य केले. गेल्या ३५ वर्षांपासून ते बँकिंग क्षेत्राशी संबंधित आहेत.

## ❑ पेमेंट बँक म्हणजे काय?

- पेमेंट बँक म्हणजे आकाराने छोट्या असणाऱ्या बँका. या बँका शक्यतो मोबाइल फोनच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत विविध सेवा पोहोचवतात.
- त्यामुळे बँकेकडून देण्यात येणाऱ्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी ग्राहकाला प्रत्यक्ष बँकेच्या शाखेपर्यंत जाण्याची आवश्यकता भासत नाही.
- कोणीही सामान्य व्यक्ती वा व्यावसायिक वा संस्था पेमेंट बँकेत खाते उघडू शकतो. पेमेंट बँक प्रत्येक खातेधारकाकडून १ लाख रुपयांपर्यंतची रक्कम स्वीकारू शकते.
- सामान्य बँकांच्या तुलनेत पेमेंट बँकांची कार्यपद्धती थोडी वेगळी असते. या बँका कर्जे अथवा क्रेडीट कार्ड सेवा देऊ शकत नाही.
- या बँका केवळ रक्कम जमा करून घेणे अथवा परकी चलन स्वीकारू शकतात. याशिवाय त्या इंटरनेट बँकिंग आणि अन्य विशिष्ट सेवाही प्रदान करतात.
- जानेवारी २०१४मध्ये डॉ. नचिकेत मोर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पेमेंट बँका स्थापन करण्याची शिफारस केली होती.

## ❖ भारतीय वंशाचे नील चॅटर्जी अमेरिकेतील एफईआरसीचे अध्यक्ष



- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वंशाचे अमेरिकन नागरिक नील चॅटर्जी यांना फेडरल एनर्जी रेग्युलेटरी कमिशनचे (एफईआरसी) अध्यक्ष म्हणून नियुक्त केले आहे.
- ही संस्था अमेरिकेच्या पॉवर ग्रीडची देखरेख आणि अब्जावधी डॉलरच्या ऊर्जा प्रकल्पांशी संबंधित निर्णय घेते.
- एफईआरसीचे विद्यमान अध्यक्ष केविन मॅकलिंटायर हे २२ ऑक्टोफबरला निवृत्त होत आहेत. त्यांची ऑगस्ट २०१७ मध्ये या पदावर नियुक्ती करण्यात आली होती.
- सध्या चॅटर्जी एफईआरसीच्या ३ आयुक्तांपैकी एक आहेत. चॅटर्जी यांनी याआधी सिनेटचे नेते मिच मॅककॉनेल यांचे ऊर्जा सल्लागार म्हणून काम पाहिले होते.
- नील चॅटर्जी केंटकीचे निवासी आहेत. त्यांचे कुटुंब ५० वर्षांपूर्वी कोलकत्ता येथून अमेरिकेत स्थायिक झाले होते.

## ❖ हिमा दास: UNICEF इंडियाच्या तरुण राजदूत

- भारताची 18 वर्षीय धावपटू हिमा दास ह्यांची संयुक्त राष्ट्रसंघ बाल कोष (UNICEF) इंडिया म्हणजेच UNCEFच्या भारतीय शाखेच्या प्रथम तरुण राजदूत म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
- संयुक्त राष्ट्रसंघ बाल कोष (United Nations Children's Fund -UNICEF) याचे मुख्यालय न्यूयॉर्क शहर (न्यूयॉर्क, अमेरिका) येथे आहे.



- UNICEF आधी दिनांक 11 डिसेंबर 1946 रोजी 'युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रन्स इमर्जन्सी फंड' या नावाने तयार करण्यात आले होते, ज्यामधून द्वितीय विश्वयुद्धाच्या धर्तीवर प्रभावित झालेल्या बालकांना आपत्कालीन अन्न आणि आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी याची स्थापना केली गेली होती.
- पोलंडचे डॉक्टर लुडविक राज्चमॅन हे UNICEFचे संस्थापक म्हणून ओळखले जातात आणि ते या संघटनेचे पहिले अध्यक्ष होते.
- पुढे 1950 साली सर्वत्र विकसनशील देशांमधील बालकांच्या आणि महिलांच्या दीर्घ-काळाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संघटनेचा विस्तार करण्यात आला.
- 1953 साली तो संयुक्त राष्ट्रसंघाचा भाग बनला आणि नावामधील 'इंटरनॅशनल' व 'इमर्जन्सी' शब्द वगळण्यात आले, मात्र मूळ संक्षिप्त नाव काम ठेवण्यात आले.
- UNICEFचे कार्यक्षेत्र 190 देश आणि प्रांतांमध्ये पसरलेले आहे.

## ❖ न्या. अमरेश्वर प्रताप साही: पटना उच्च न्यायालयाचे नवे मुख्य न्यायाधीश



- न्यायमूर्ती अमरेश्वर प्रताप साही यांनी पटना उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश पदाची शपथ घेतली आहे.
- बिहारचे राज्यपाल लालजी टंडन यांनी न्या. साही यांना शपथ दिली. या नियुक्तीपूर्वी न्या. साही इलाहाबाद उच्च न्यायालयात न्यायाधीश होते.
- भारताच्या राज्यघटनेत नमूद कलम क्र. 214 अन्वये प्रत्येक घटकराज्याला एक उच्च न्यायालय असेल किंवा एक किंवा दोन राज्यांसाठी मिळून एक उच्च न्यायालय असेल अशी तरतूद करण्यात आलेली आहे.
- सध्या देशात 24 उच्च न्यायालये कार्यरत आहेत.
- याशिवाय प्रत्येक राज्यामध्ये विभागीय पातळीवर खंडपीठे निर्माण करण्यात आली आहेत.
- महाराष्ट्रचे उच्च न्यायालय मुंबई येथे असून त्याची महाराष्ट्रात पणजी (गोवा), नागपूर, औरंगाबाद अश्या तीन ठिकाणी तीन खंडपीठे आहेत.
- उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश आणि राष्ट्रपतीच्या आदेशानुसार ठरविण्यात आलेले संख्येनुसार इतर न्यायाधिश असतात.
- उच्च न्यायालयातल्या सर्वोच्च न्यायाधिशांची नेमणूक करण्याचा अधिकार भारताच्या राष्ट्रपतीला आहे.

## ❖ किम जोंग-यांग (दक्षिण कोरिया): इंटरपोलचे नवे अध्यक्ष

- दक्षिण कोरियाचे किम जोंग-यांग यांची आंतरराष्ट्रीय गुन्हेगार पोलीस संघटनेचे (इंटरपोल) नवे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.
- अचानक बेपत्ता झालेले मेंग हाँगवेई यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर ही निवड करण्यात आली आहे.




- आंतरराष्ट्रीय फौजदारी पोलीस संघटना (इंटरपोल / International Criminal Police Organisation) ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे जे आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार्यासाठी सुविधा पुरवते.
- 1923 साली याची स्थापना करण्यात आली.
- फ्रान्समधील लिऑन येथे इंटरपोलचे मुख्यालय आहे.
- इंटरपोलमध्ये 192 देशांमधील (2017 सालापर्यंत) पोलीस दलांची सदस्यता आहे.

## ❖ गायक नाहिद आफ्रिन: ईशान्य क्षेत्रासाठीचे UNICEFचे प्रथम 'यूथ ॲडव्होकेट'



- बाल अधिकारांसाठी लढण्यासाठी आसामचे लोकप्रिय 17 वर्षीय गायक नाहिद आफ्रिन यांना UNICEF इंडियाने ईशान्य क्षेत्रासाठीचे 'यूथ ॲडव्होकेट' म्हणून नियुक्त केले आहे.
- संयुक्त राष्ट्रसंघ बाल कोष (United Nations Children's Fund -UNICEF) याचे मुख्यालय न्यूयॉर्क शहर (न्यूयॉर्क, अमेरिका) येथे आहे.
- UNICEF आधी दिनांक 11 डिसेंबर 1946 रोजी ‘युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रन्स इमर्जन्सी फंड’ या नावाने तयार करण्यात आले होते.
- ज्यामधून द्वितीय विश्वयुद्धाच्या धर्तीवर प्रभावित झालेल्या बालकांना आपत्कालीन अन्न आणि आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी याची स्थापना केली गेली होती.
- पोलंडचे डॉक्टर लुडविक राज्चमॅन हे UNICEFचे संस्थापक म्हणून ओळखले जातात आणि ते या संघटनेचे पहिले अध्यक्ष होते.
- पुढे 1950 साली सर्वत्र विकसनशील देशांमधील बालकांच्या आणि महिलांच्या दीर्घ-काळाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संघटनेचा विस्तार करण्यात आला.
- 1953 साली तो संयुक्त राष्ट्रसंघाचा भाग बनला आणि नावामधील ‘इंटरनॅशनल’ व ‘इमर्जन्सी’ शब्द वगळण्यात आले, मात्र मूळ संक्षिप्त नाव काम ठेवण्यात आले.
- UNICEFचे कार्यक्षेत्र 190 देश आणि प्रांतांमध्ये पसरलेले आहे.

# ३. पुरस्कार







## ❖ फली नरिमन यांना लालबहादूर शास्त्री पुरस्कार



- देशातील प्रतिष्ठित कायदेतज्ञ आणि वकील फली नरिमन यांना लोकप्रशासनात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल १९व्या लालबहादूर शास्त्री पुरस्काराने गौरवण्यात आले.
- त्यांना हा पुरस्कार नवी दिल्ली येथे आयोजित एका कार्यक्रमात उपराष्ट्रपती वेंकैया नायडू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.
- १० जानेवारी १९२९ रोजी रंगून येथे जन्मलेले फली नरिमन यांचे शालेय शिक्षण विविध ठिकाणी झाले.
- त्यांनी मुंबईतील सरकारी विधि महाविद्यालयातून सुवर्णपदकासह विधि शाखेची पदवी मिळवली.
- मुंबई उच्च न्यायालयात १९५०पासून त्यांनी वकिली सुरू केली. २० वर्षे वकिली केल्यानंतर १९७१मध्ये ते सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ विधिज्ञ बनले.
- त्यांची कुशाग्र बुद्धिमत्ता लक्षात घेऊन १९७२मध्ये केंद्र सरकारने अतिरिक्त सॉलिसिटर जनरलपदी त्यांची नियुक्ती केली. १९७५पर्यंत ते या पदावर होते.
- इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करताच त्याचा निषेध म्हणून त्यांनी लगेच आपल्या पदाचा राजीनामा दिला व खासगी वकिली सुरू केली.
- बार असोसिएशन ऑफ इंडियाच्या अध्यक्ष पदावरही त्यांनी कार्य केले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मध्यस्तीसाठी ते एक सुप्रसिद्ध विधिज्ञ आहेत.
- त्यांना पद्मभूषण (१९९१), ग्रूबर प्राइज फॉर जस्टिस (२००२) आणि पद्मविभूषण (२००७)पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.
- १९९९ ते २००५ या काळात राष्ट्रपतींनी त्यांना राज्यसभा सदस्य म्हणून नामांकित केले होते.

### ❑ लालबहादुर शास्त्री राष्ट्रीय पुरस्कार:-

- भारताचे दुसरे पंतप्रधान लाल लालबहादुर शास्त्री यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ १९९९मध्ये लालबहादुर शास्त्री व्यवस्थापन संस्थेने हा पुरस्कार सुरू केला.
- हा पुरस्कार भारतीय व्यावसायिक नेते, व्यवस्थापन संबंधित व्यक्ती, लोकसेवक, शिक्षक इत्यादींना त्यांच्या समाजाप्रतीच्या उत्कृष्ठ योगदानासाठी दरवर्षी देण्यात येतो.
- प्रशस्तीपत्र आणि ५ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप असून, २०१७मध्ये हा पुरस्कार सुलभ इंटरनॅशनलचे संस्थापक बिंदेश्वर पाठक यांना हा पुरस्कार देण्यात आला होता.

## ❖ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सेऊल शांतता पुरस्कार




- भारत आणि जागतिक अर्थव्यवस्थेच्या विकासात दिलेल्या योगदानाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'सेऊल शांतता पुरस्कार २०१८' जाहीर झाला.
- द सेऊल पीस प्राइझ कमिटीने (कल्चरल फाऊंडेशन) या पुरस्कारासाठी त्यांची निवड केली असून, हा पुरस्कार जिंकणारे ते १४वे व्यक्ती आहेत.
- आंतरराष्ट्रीय सहकार्य, जागतिक आर्थिक वृद्धी, लोकशाही बळकट करणे, मानव विकास यासाठी मोदींनी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत समितीने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली आहे.
- मोदींनी भारतासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर वाढवून मानव विकास साधण्याचा केलेले प्रयत्न व भ्रष्टाचारविरोधी चालवलेल्या मोहिमांचे समितीने कौतुक केले आहे.
- गरीब आणि श्रीमंत यांच्यातील सामाजिक आणि आर्थिक दरी कमी करण्यासाठी मोदींनी केलेल्या प्रयत्नांची प्रशंसाही या समितीने केली आहे.
- २६ सप्टेंबर रोजी न्युयॉर्कमधील संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण आमसभेत मोदींना 'चॅम्पिअन्स ऑफ द अर्थ अवॉर्ड' हा पर्यावरण विषयक पुरस्कार जाहीर झाला होता. (फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासह)
- द सेऊल पीस प्राइझ कमिटीने विश्वशांतीसाठी 'मोदी सिद्धांत' आणि ॲक्ट ईस्ट धोरणांचेही कौतुक केले आहे.

### ❑ सेऊल शांतता पुरस्कार:-

- या पुरस्कारांची सुरुवात १९९०मध्ये दक्षिण कोरियातील सेऊल येथे आयोजित २४व्या ऑलिम्पिक खेळांच्या स्मृतीप्रीत्यर्थ करण्यात आली होती.
- हा पुरस्कार प्रत्येक २ वर्षांनी जागतिक शांतता आणि सद्भावना यांना प्रोत्साहित करणाऱ्यांना दिला जातो.
- यापूर्वी हा पुरस्कार संयुक्त राष्ट्रांचे महासचिव कोफी अन्नान, जर्मनीच्या चँसलर अँजेला मर्केल इत्यादी व्यक्तींना तर डॉक्टर्स विदआउट बॉर्डर्स आणि ऑक्सफेम अशा संस्थांना प्रदान करण्यात आला आहे.

## ❖ एम. एस. स्वामीनाथन यांना पहिला विश्व कृषी पुरस्कार जाहीर



- कृषी वैज्ञानिक प्राध्यापक एम. एस. स्वामीनाथन यांना भारतीय अन्न व कृषी परिषदेचा पहिला विश्व कृषी पुरस्कार जाहीर झाला आहे.
- त्यांना हा पुरस्कार जेनेटिक्स, सायटो जेनेटिक्स, किरणोत्सर्ग, रासायनिक म्युटाजेनेसिस, अन्न आणि जैवविविधतेचे संवर्धन या विषयांमधील संशोधनाकरिता देण्यात येणार आहे.

- या पुरस्काराची सुरुवात भारतीय अन्न आणि कृषी परिषदेद्वारे (ICFA) करण्यात आली आहे.
- कृषी क्षेत्रात मोलाचे कार्य करून मानवता व देशाच्या कल्याणासाठी योगदान देणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांना सन्मानित करण्यासाठी हा पुरस्कार सुरु करण्यात आला आहे.
- हा एक वार्षिक पुरस्कार असेल, जो व्यक्ती किंवा संस्थेला प्रदान करण्यात येईल. पुरस्कार विजेत्याला १ लाख डॉलर्सची रक्कम पुरस्कारस्वरूप देण्यात येईल.

### ❑ एम. एस. स्वामीनाथन:-

- एम. एस. स्वामीनाथन भारतातील अग्रगण्य कृषी शास्त्रज्ञ आहेत. त्यांचा जन्म ७ ऑगस्ट १९२५ रोजी झाला. भारतात पहिली हरितक्रांती घडवून आणण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता.
- त्यांनी कृषि क्षेत्रातील संशोधनासाठी 'एम.एस. स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन'ची स्थापना केलेली आहे.
- १९७२ ते १९७९ दरम्यान ते भारतीय कृषी संशोधन परिषदेचे अध्यक्ष होते. १९७९-८०मध्ये ते कृषी मंत्रालयाचे मुख्य सचिव होते.
- १९८२-८८ ते आंतरराष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्थेचे महासंचालक होते. १९८८मध्ये ते आंतरराष्ट्रीय निसर्ग आणि नैसर्गिक संसाधन संवर्धन संघटनेचे अध्यक्ष झाले.
- भारत सरकारने २००४मध्ये डॉ. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली स्वामीनाथन आयोग किंवा राष्ट्रीय शेतकरी आयोगची स्थापना केली होती.
- स्वामिनाथन यांना टाईम मासिकाने २०व्या शतकातील २० सर्वाधिक प्रभावशाली आशियाई व्यक्तींमध्ये स्थान दिले आहे.
- याशिवाय भारतातील २०व्या शतकातील ३ सर्वाधिक प्रभावशाली व्यक्तींमध्ये त्यांचा समावेश केला आहे. (अन्य दोन महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर)
- त्यांना मिळालेले पुरस्कार: पद्मश्री (१९६७), पद्मभूषण (१९७२), पद्मविभूषण (१९८९), रेमन मॅगसेसे पुरस्कार (१९७१), बोरलॉग पुरस्कार, अल्बर्ट आईन्स्टाईन जागतिक विज्ञान पुरस्कार, जागतिक अन्न पुरस्कार, इंदिरा गांधी शांतता पुरस्कार, शांतीस्वरूप भटनागर पुरस्कार. दी टायलर पुरस्कार इत्यादी

## ❖ मीनल पटेल यांचा अमेरिकेत प्रेसिडेंशियल मैडलने सन्मान




- भारतीय वंशाच्या मीनल पटेल यांना मानवी तस्करीविरुद्ध त्यांनी दिलेल्या लढ्यासाठीअमेरिकेत प्रेसिडेंशियल मैडलने गौरविण्यात आले.
- मीनल पटेल या मानवी तस्करीवरील ह्युस्टनचे महापौर सिल्वेस्टर टर्नर यांच्या सल्लागार आहेत.
- जुलै २०१५मध्ये त्यांना या पदावर नियुक्त करण्यात आले. या पदावर कार्य करताना त्यांनी मानव तस्करी थांबविण्यासाठी प्रशंसनीय कार्य केले.

- सध्या त्या महापौरांच्या मानवी तस्करी विरोधी योजनेची अंमलबजावणी करीत आहेत. अमेरिकेतील अशा प्रकारची ही पहिलीच योजना आहे.
- यापूर्वी त्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवीय शिखर संमेलनाच्या प्रवक्त्याही होत्या. त्यांनी कनेक्टिकट विद्यापीठातून एमबीए पदवी प्राप्त केली आहे.

## ❖ अमेनेस्टी इंटरनॅशनलने म्यानमारच्या आंग सान सू की यांना दिलेला सन्मान परत घेतला




- लंडन (UK) येथील अमेनेस्टी इंटरनॅशनल या जागतिक मानवाधिकार संघटनेनी म्यानमारच्या आंग सान सू की यांना 2009 साली बहाल केलेला ‘अॅम्बेसेडर ऑफ कोन्सायन्स अवॉर्ड’ हा सन्मान परत घेण्याचा निर्णय घेतला आहे.
- गेल्यावर्षी रोहिंग्या सशस्त्र गटाने पोलीस ठाण्यांवर केलेल्या हल्ल्याच्या घटनेनंतर झालेल्या संघर्षात म्यानमारच्या सुरक्षा दलावर हत्याकांडाचा आरोप करण्यात आला.
- तेव्हापासून सुमारे 700,000 रोहिंग्या मुस्लीम लोकांनी बांग्लादेशकडे स्थलांतरण केले.
- अश्या आरोपांना म्यानमारच्या राष्ट्रीय सल्लागार मंत्री आंग सान सू की यांनी फेटाळण्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला गेला आहे.
- म्यानमार हा आग्नेय आशियातला एक देश आहे.
- नॅयपिडॉ हे देशाचे राजधानी शहर असून बर्मीज क्याट राष्ट्रीय चलन आहे.

## ❖ भारत: ‘आशिया पर्यावरण अंमलबजावणी पुरस्कार-2018’चा विजेता




- आशिया खंडात सीमेलगत पर्यावरण-विषयक गुन्ह्यांविरुद्ध लढा देण्यामध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्यासाठी भारत सरकारच्या वन्यजीवन गुन्हे नियंत्रण विभाग (WCCB) याला संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण कार्यक्रम (UNEP) कडून ‘आशिया पर्यावरण अंमलबजावणी पुरस्कार-2018’ (Asia Environment Enforcement Award) याने सन्मानित करण्यात आले आहे.
- वन्यजीवन गुन्हे नियंत्रण विभाग (WCCB) हे भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या अंतर्गत कार्य करते.
- विभागाला हा पुरस्कार ‘नवकल्पना’ गटात मिळाला आहे.
- विभागाने गुन्हेगारीचा कल ओळखण्यासाठी आणि गुन्ह्यांना रोखण्यासाठी आणि प्रभावी उपाययोजना शोधण्यासाठी वास्तविक वेळेत माहिती मिळविण्यासाठी ऑनलाइन ‘वन्यजीवन गुन्हे माहिती व्यवस्थापन प्रणाली’ विकसित केली आहे.

- संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण कार्यक्रम (UNEP) हा दिनांक 5 जून 1972 रोजी स्थापना करण्यात आलेला संयुक्त राष्ट्रसंघाचा एक विभाग आहे.
- जे पर्यावरणविषयक धोरणे आणि पद्धती यांच्या अंमलबजावणीमध्ये मदत करते.
- याचे मुख्यालय नैरोबी (केनिया) येथे आहे.

## ❖ नंदीता दास: FIAPF पुरस्काराचे विजेता



- भारतीय चित्रपट निर्माता नंदिता दास यांना यावर्षीचा 'इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फिल्म प्रोड्यूसर्स असोसिएशन्स (FIAPF) पुरस्कार' जाहीर झाला आहे.
- दि. 29 नोव्हेंबर 2018 रोजी ब्रिस्बेनमध्ये होणार्यार 12वे 'एशिया पॅसिफिक स्क्रीन अवार्ड्स' (APSA) या पुरस्कार वितरण सोहळयात या पुरस्काराचे वाटप करण्यात येणार आहे.
- इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फिल्म प्रोड्यूसर्स असोसिएशन्स (FIAPF) ही एक अग्रणी संस्था आहे.
- ज्याचे प्रमुख 30 देशांमधील चित्रपट निर्मात्यांच्या 36 सदस्य संघटना सदस्य आहेत.
- संघटनेची 1933 साली स्थापना करण्यात आली.
- याचे मुख्यालय फ्रान्सच्या पॅरिस शहरात आहे.
- हे जगभरात काही महत्त्वाच्या कार्यक्रमांसह आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांचे नियमन करण्यासाठी जबाबदार आहे.

## ❖ केशव गिंडे यांना भीमसेन जोशी पुरस्कार जाहीर



- भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ बासरीवादक पं. केशव गिंडे यांची निवड झाली आहे.
- सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनी या पुरस्काराची घोषणा केली.
- दर वर्षी राज्य सरकारतर्फे शास्त्रीय गायन व वादन या क्षेत्रांत प्रदीर्घ काळ उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलाकाराला भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.
- या पुरस्काराचे स्वरूप पाच लाख रुपये, मानपत्र, सन्मानचिन्ह असे आहे.
- सांस्कृतिक कार्यमंत्री तावडे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या पुरस्कारासाठी ज्येष्ठ बासरीवादक पं. केशव गिंडे यांची शिफारस केली होती.
- या समितीत उस्मान खान, सदानंद नायमपल्ली, शाम गुंडावार, भारती वैशंपायन, बाळ पुरोहित आणि शुभदा पराडकर या मान्यवरांचा समावेश आहे.

## ❖ युक्रेनच्या 'डॉनबास' चित्रपटाला सुवर्ण मयूर सन्मान मिळाला: IFFI 2018



- "स्प्रेड द जॉय ऑफ सिनेमा (सिनेमाच्या आनंदाचा प्रसार करा)" या संकल्पनेखाली गोव्यात पार पडलेल्या 49व्या 'भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' (International Film Festival of India -IFFI) या कार्यक्रमाच्या शेवटी सुवर्णमयूर (Golden Peacock), रौप्यमयूर, जीवनगौरव पुरस्कार आणि 'इंडियन पर्सनॅलिटी ऑफ द इयर' पुरस्कार यांचे वाटप करण्यात आले.

### ❑ हे पुरस्कार विजेते पुढीलप्रमाणे -

- सर्वोत्कृष्ट चित्रपट (सुवर्ण मयूर, मानपत्र आणि 40 लक्ष रुपये) - 'डॉनबास' (सर्गेई लोझनित्सा दिग्दर्शित युक्रेनचा चित्रपट)
- 'इंडियन पर्सनॅलिटी ऑफ द इयर' पुरस्का र – अमिताभ बच्चन (अभिनेता)
- सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (15 लक्ष रुपये आणि रौप्य मयूर) - लिजो जोस पेलिस्सरी ('इ मा यौ' या भारतीय चित्रपटासाठी)
- सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (10 लक्ष रुपये आणि रौप्य मयूर) - अॅनास्ताशिया पुश्तोतवित ('व्हेन द ट्रीज फॉल' या युक्रेनच्या चित्रपटासाठी)
- सर्वोत्कृष्ट अभिनेता (10 लक्ष रुपये आणि रौप्य मयूर) - चेंबन विनोद ('इ मा यौ' चित्रपटासाठी)
- IFFI विशेष पुरस्कार - सलीम खान (चित्रपटातल्या अमूल्य योगदानाबद्दल)
- विशेष ज्युरी पुरस्कार (15 लक्ष रुपये आणि रौप्य मयूर) - मिल्को लाझारोव्ह ('अगा' या बल्गेरियाच्या चित्रपटासाठी)
- उत्तम दिग्दर्शक (फिचर फिल्म) - अल्बेर्टो मॉन्टेरस द्वितीय ('रेस्पेटो' या फिलिपिन्सच्या चित्रपटासाठी)
- ICFT-UNESCO गांधी पदक - 'वॉकिंग विथ द विंड' (प्रवीण मोरछले दिग्दर्शित लद्दाखी चित्रपट)
- ICFT-UNESCO गांधी पदक हा पुरस्कार पॅरिसच्या इंटरनॅशनल कौन्सिल फॉर फिल्म, टेलिव्हिजन अँड ऑडिओ व्हिज्युअल कम्युनिकेशन आणि UNESCO यांच्यावतीने देण्यात येतो.
- शांतता आणि सलोखा ही गांधीवादी मूल्ये मांडणाऱ्या चित्रपटाला हा सन्मान प्रदान करण्यात येतो.
- नऊ दिवसांच्या या कार्यक्रमात 67 देशांमधून आलेल्या 220 हून अधिक चित्रपट प्रदर्शित केले गेलेत. जर्मनीच्या 'सील्ड लिप्स' या चित्रपटाने या महोत्सवाची सांगता झाली.
- भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (IFFI) –
- IFFIची सन 1952 मध्ये स्थापना करण्यात आली आणि हा कार्यक्रम दरवर्षी गोव्यामध्ये आयोजित केला जातो.
- एंटरटेंमेंट सोसायटी ऑफ गोवा हे या कार्यक्रमाचे आयोजक आहेत.

# ४. राज्य




## ❖ सहकारी संस्थांना आरक्षण सवलत



- कोणत्याही सहकारी संस्थेत अनुसूचित जाती-जमाती, इतर मागास प्रवर्ग किंवा महिला सभासद नसल्यास व्यवस्थापन समितीतील पदे आरक्षणातून वगळण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने घेतला आहे.
- या निर्णयामुळे आरक्षित पदे भरू न शकलेल्या आणि गणसंख्येअभावी प्रशासक नियुक्तीच्या कारवाईला सामोरे जावे लागणाऱ्या लाखो सहकारी संस्थांना दिलासा मिळाला आहे.
- त्याचप्रमाणे कोणत्याही सहकारी संस्थेच्या व्यवस्थापन समितीमध्ये अडीच वर्षांपेक्षा अधिक काळ रिक्त असलेली पदे भरण्याचाही मार्ग मोकळा झाला आहे.
- 97व्या घटनादुरुस्तीच्या माध्यमातून सहकार कायद्यात आमूलाग्र बदल झाले आहेत. राज्य सरकारनेही या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने सहकार कायद्यात अनेक बदल केले.
- सहकारातील नव्या दुरुस्त्यांमुळे गृहनिर्माण संस्थांसह सर्वच सहकारी संस्थांच्या निवडणुका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्याचा निर्णय सरकारने पाच वर्षांपूर्वी घेतला.
- मात्र अनेक संस्थांमध्ये अनुसूचित जाती-जमाती, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, महिला आदी प्रवर्गातील सभासदच मिळत नसल्याने व्यवस्थापन समितीच्या निवडणुकीत ही पदे भरली जात नव्हती.
- काही लहान संस्थांमध्ये तर 7 किंवा 11 सदस्यीय व्यवस्थापन समितीमध्ये आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांचा शोध घेणे संस्थांना कठीण जात होते.

## ❖ स्वाक्षरीयुक्त 'सातबारा'त अहमदनगर आघाडीवर

- सातबारा संगणकीकरण प्रकल्पांतर्गत महसूल विभागाच्या वतीने डिजिटल स्वाक्षरीयुक्त सातबारा उपक्रम सुरूझाला असून अहमदनगर जिल्हा त्यात आघाडीवर आहे.
- पुणे सातव्या क्रमांकावर तर मुंबईसह सिंधूदुर्ग व रत्नागिरी जिल्हा पिछाडीवर आहे.
- राज्यात आतापर्यंत 39 लाख 24 हजार 648 डिजिटल स्वाक्षरीयुक्त सातबारा उताऱ्यांचे काम पूर्ण झाले आहे.



- सातबारा संगणकीकरणात चावडी वाचन, सातबारा दुरुस्ती, पुनर्लेखन, आॅनलाइन सातबारा आणि डिजिटल स्वाक्षरीयुक्त सातबारा असे विविध टप्पे आहेत.
- तर त्यातच संगणकीकरणाच्या प्रक्रियेत काही चुका झाल्या असल्याची शक्यता नाकारता येत नाही.
- त्यामुळे महसूल विभागाने राज्यातील सर्व जमीनधारक व शेतकर्यांकना नोव्हेंबर अखेरपर्यंत चुका दुरूस्त करून घेण्याची संधी दिली आहे.
- परिणामत: डिजिटल स्वाक्षरीच्या कामाने अद्याप वेग घेतलेला नाही. अहमदनगर जिल्ह्यात सर्वाधिक 5 लाख 5 हजार 594 सातबारा उतारे तयार झाले असल्याचे सांगण्यात आले आहेत.

## ❖ गायकवाड समितीने मराठा समाजासाठी महाराष्ट्रात 16% आरक्षण करण्याची शिफारस केली



- मराठा आरक्षणबाबतचा मागासवर्ग आयोगाने दिलेला अहवाल महाराष्ट्र राज्य सरकारपुढे सादर केला गेला आहे.
- हा अहवाल न्यायमूर्ती (सेवानिवृत्त) एन. जी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीने तयार केला आहे.
- या अहवालात मराठा समाजाला सरकारी नोकर्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये स्वतंत्रपणे 16% आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली आहे.
- यामुळे राज्यात 68% पर्यंत आरक्षण जाईल. परंतु, भारतीय राज्यघटनेनुसार 50% पेक्षा अधिक आरक्षण देता येत नाही.
- तामिळनाडूने मात्र आरक्षणसंबंधी कायदेशीर बाबीवर आपल्यापुरता उपाय शोधला होता. म्हणूनच तामिळनाडूत 69% आरक्षण आज अस्तित्वात आहे. अशा प्रकारचे आरक्षण देणारे तामिळनाडू हे देशातले एकमेव राज्य आहे.
- यासाठी तामिळनाडूने खास घटनेत तशी तरतूद करून घेतली, न्यायालयात लढाई लढली आणि त्यामुळेच तामिळनाडू हे सर्वात जास्त आरक्षण देणारे राज्य ठरले आहे.

## ❖ औरंगाबादमध्ये महाराष्ट्र राज्यातले दुसरे मेगा फूड पार्क




- महाराष्ट्रातले दुसरे मेगा फूड पार्क औरंगाबाद जिल्ह्यातल्या पैठण तालुक्यात वाहेगाव आणि धनगांव या गावांमध्ये उभारण्यात आले आहे.
- 'पैठण मेगा फूड पार्क'साठी 124.52 कोटी रुपये खर्च आला असून ते 102 एकर भूखंडावर उभारण्यात आले आहे.
- यामध्ये ड्राय वेअरहाऊस, कोल्ड स्टोरेज, प्रि-कुलिंग, रायपनिंग चेंबर्स, फ्रीझर रुम, अन्न तपासणी प्रयोगशाळा, दुधाचे टँकर्स आदी सुविधा उपलब्ध आहेत.
- राज्यातल्या तिसऱ्या मेगा फूड पार्कलाही मंत्रालयाने मंजुरी दिली असून ते वर्धा जिल्ह्यात उभारण्यात येणार आहे.

- राज्यातले पहिले मेगा फूड पार्क सातारा जिल्ह्यात आहे.
- भारत सरकारच्या केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या मेगा फूड पार्क योजनेच्या अंतर्गत प्रत्येक मेगा फूड पार्क प्रकल्पाला 50 कोटी रुपयांपर्यंतचे आर्थिक सहाय्य दिले जात आहे.
- मेगा फूड पार्क ही योजना "समूह" पध्दतीवर आधारित आहे.
- पार्कमध्ये विशेषत: पुरवठा साखळीसाठी पायाभूत सुविधा, ज्यामध्ये संकलन केंद्रे, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, केंद्रीय प्रक्रिया केंद्रे, शीतसाखळी आणि उद्योजकांसाठी 30-35 पूर्ण विकसित भूखंडासकट अन्नप्रक्रिया उद्योग उभारण्याची सोय असते.
- मेगा फूड पार्क प्रकल्प स्पेशल पर्पज व्हेईकल (SPV) द्वारे चालवले जातात, जे कंपनी कायद्यांतर्गत नोंदणीकृत कॉर्पोरेट मंडळ असतात.

## ❖ भेसळ रोखण्यासाठीच्या कायद्यात बदल करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने विधेयक मंजुर केले



- महाराष्ट्र राज्य सरकारने भेसळ रोखण्यासाठीच्या कायद्याला अधिक कडक करीत त्यात बदल करण्यासाठी नवे विधेयक संमत करण्यात आले आहे.
- हे विधेयक भेसळ रोखण्यासाठी व भेसळ करणाऱ्या व्यक्ती, आस्थापना यांच्याविरोधात 'भारतीय दंड संहिता-1860'च्या कलम 272 व 273 मध्ये सुधारणा करणारे आहे.
- दूध किंवा अन्य खाद्यपदार्थांमध्ये भेसळसंबंधी सर्व गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र ठरविण्यात आले आहेत.
- अशा गुन्ह्यांमध्ये दोषीला आजन्म कारावासाची शिक्षा देण्याची कायदेशीर तरतूद करण्यात आली आहे.
- दुधात युरिया, ग्लुकोज, चरबी, कॉस्टिक सोडा तसेच गोडेतेलापासून पाण्यापर्यंत तऱ्हे-तऱ्हेची भेसळ होत असल्यामुळे मानवी आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो.

## ❖ मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रेमानंद गज्वी



- 99व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नाटककार आणि लेखक प्रेमानंद गज्वी यांची निवड करण्यात आली आहे.
- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.
- संमेलनाध्यक्षपदासाठी श्रीनिवास भणगे, अशोक समेळ, सुनील साकोळकर ही नावे चर्चेत होती. मात्र प्रेमानंद गज्वी यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले.
- याची घोषणा 23 नोव्हेंबर रोजी माटुंगा येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या तालीम हॉल येथे झालेल्या पत्रकार परिषदेत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रसाद कांबळी यांनी केली.

- 99व्या नाट्य संमेलनाच्या स्थळासाठी परिषदेकडे 12 ठिकाणांहून प्रस्ताव आले.
- त्यापैकी नागपूर, लातूर, पिंपरी-चिंचवड या ठिकाणांचा अंतिम टप्प्यात विचार करण्यात आला. वरील ठिकाणांपैकी एक नाव जाहीर होण्याची शक्यरता आहे.
- नाट्य संमेलन समिती या ठिकाणांचा दौरा करून संमेलनाचे अंतिम ठिकाण लवकरच जाहीर करेल.
- संमेलन फेब्रुवारी ते एप्रिलदरम्यान होईल, अशी माहिती प्रसाद कांबळी यांनी दिली.

## ❖ मराठा समाजाला 16 टक्के आरक्षण : विधानसभेत विधेयक एकमताने मंजूर



- मराठा समाजाला स्वतंत्र 16 टक्के आरक्षण देण्याचं विधेयक महाराष्ट्र विधानसभेत एकमताने मंजूर झालं आहे.
- मुख्यमंत्र्यांनी विधान सभेत हे विधेयक मांडल्यानंतर विरोधी पक्षांनी त्याला एकमताने पाठिंबा दिला आहे.
- आता हे विधेयक मुख्यमंत्र्यांनी विधान परिषदेत मांडलं आहे.
- गुरुवारी सकाळपासूनच संपूर्ण राज्याचे लक्ष याकडे लागून होते.
- राज्य मागासवर्ग आयोगाकडून मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या अहवालातील निष्कर्षांचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुपारी बारा वाजता सभागृहात ठेवला.
- यावेळी काही सदस्यांनी 'मराठा समाजाचा विजय असो', अशा घोषणा देण्यात आल्या.

# ५. राष्ट्रीय



## ❖ हरित दिवाळी-स्वस्थ दिवाळी अभियान



- पर्यावरण मंत्रालयाने 'हरित दिवाळी-स्वस्थ दिवाळी' अभियान सुरू करण्याचे जाहीर केले आहे. याच प्रकारचे अभियान गेल्यावर्षीही राबविण्यात आले होते.
- पर्यावरण आणि लोकांना हानी पोहचू नये यासाठी दिवाळीत फटक्यांमुळे होणारे प्रदूषण कमी करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.
- उत्तर भारतात हिवाळ्यात धुलीकण, कचरा जाळणे यामुळे प्रदूषणात लक्षणीय वाढ होते. दिवाळीमध्ये फटक्यांमुळे या प्रदूषणात आणखी वाढ होते.
- फटक्यांमध्ये ॲल्युमिनियम, मॅग्नेशियम, बेरियम, तांबे, सोडियम, लिथियम आणि स्ट्रॉन्टियम इत्यादी पदार्थ असतात.
- यामुळे वृध्द व्यक्ती, लहान मुले आणि श्वसनाच्या व्याधींनी ग्रस्त व्यक्तींना खूप त्रास होतो.
- गेल्या वर्षी या अभियानांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना कमी फटाके जाळण्याची शपथ देण्यात आली होती. तसेच पर्यावरणाची काळजी घेत दिवाळी साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले होते.
- तसेच त्यांना याबाबत जागरूकता निर्माण करण्यासही सांगण्यात आले होते. परिणामी २०१६च्या तुलनेत २०१७मध्ये प्रदूषणात घट झाली होती.

## ❖ #MeToo संबंधित तक्रारींसाठी मंत्रीगटाची स्थापना

- #MeToo मोहिमेद्वारे महिलांवरील लैंगिक छळांबाबत आलेल्या तक्रारींची केंद्र सरकारने दखल घेत याबाबत कार्यवाहीसाठी एका मंत्रीगटाची स्थापना केली आहे.
- गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील या मंत्रिगटात केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी, संरक्षणमंत्री निर्मला सीतारामन आणि महिला व बालविकास मंत्री मनेका गांधी यांचा समावेश आहे.



- कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ रोखण्यासाठी व त्याला आळा घालण्यासाठी कायदेशीर व संस्थात्मक चौकट बळकट करण्याच्या दृष्टीने हा मंत्रिगट स्थापन करण्यात आला आहे.
- कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाबाबत सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यात #MeTooमधील प्रकरणांचा समावेश करता येईल का? याबाबत या मंत्रीगटाकडून पडताळणी करण्यात येणार आहे.
- सध्या अस्तित्वात असलेल्या लैंगिक छळाच्या कायद्याची कडक अंमलबजावणी करणे तसेच सध्याचे कायदे अधिक सक्षम करण्याबाबत या कायद्याची पडताळणी करण्यात येणार आहे.
- मंत्रीगटाची स्थापना झाल्यानंतर ३ महिन्यांत या गटाकडून सध्याच्या कायद्याची पडताळणी करुन हा कायदा अधिक सक्षम आणि परिणामकारक व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येतील.
- याव्यतिरिक्त महिला आणि बालविकास मंत्रालयाने महिलांसाठी इलेक्ट्रॉनिक तक्रार बॉक्स तयार केले आहेत. कामाच्या ठिकाणी होत असलेल्या लैंगिक छळाबाबतची तक्रार महिलांना यामध्ये नोंदवता येणार आहे.

## ❑ #MeToo मोहीम:-

- कामाच्या ठिकाणी मिळणारी अपमानास्पद वागणूक आणि होणारे लैंगिक शोषण याविरुद्ध महिलांनी #MeToo मोहीम सुरु केली आहे.
- ही मोहिम २०१७साली ट्विटरवरुन सुरु झाली होती. त्यावेळी ७० महिलांनी हॉलिवूड निर्माता हार्वे विनस्टिनवर लैंगिक शोषणाचे आरोप केले होते.
- अमेरिकन अभिनेत्री एलिसा मिलानोने #MeToo या हॅशटॅगचा वापर करत महिलांना त्यांच्याबरोबर झालेल्या गैरवर्तनाविरुद्ध आवाज उठविण्यास प्रेरित केले.
- नंतर या हॅशटॅगचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आणि अनेक महिलांनी त्यांच्याबरोबर झालेल्या गैरवर्तनाच्या घटना समोर आणण्यास सुरुवात केली.
- अभिनेत्री तनुश्री दत्ताने नाना पाटेकर यांच्यावर केलेल्या आरोपानंतर भारतात या मोहिमेने जोर पकडला आणि यामुळे चित्रपट सृष्टीतील अनेक नामांकित चेहरे अडचणीत आले आहेत.
- चेतन भगत, रजत कपूर, कैलाश खेर, विकास बहल, साजिद खान, आलोक नाथ, सुभाष घई अशा अनेकांवर महिलांनी बलात्कार आणि लैंगिक जबरदस्तीचे आरोप केले आहेत.
- माजी सहकारी महिलांनी अशा प्रकारचे आरोप केल्यानंतर विख्यात पत्रकार आणि परराष्ट्र राज्यमंत्री एम. जे. अकबर यांनादेखील मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे.

## ❖ 'ऑपरेशन ग्रीन्स': अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाची मोहीम

- केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने 'ऑपरेशन ग्रीन्स' या मोहीमेसाठी कार्यान्वयन धोरण मंजूर केले आहे.
- 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात टोमॅटो, कांदा आणि बटाटा या प्रमुख पिकांच्या सुरळीत पुरवठ्यासाठी तसेच वर्षभर स्थिर किंमतीनुसार देशात संपूर्ण पिकांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी 500 कोटी रुपये खर्च असलेल्या या मोहीमेची घोषणा करण्यात आली होती.



### ❑ मंत्रालयाने निश्चित केलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे –

- अल्पमुदत किंमत स्थिरीकरण उपाययोजना – यांची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रीरय कृषी सहकारी विपणन संघ (NAFED) ही केंद्र संस्था असेल.
- पिकांचे उत्पादन गोदामापर्यंत वाहतूक करण्याच्या साखळीला आणि योग्य गोदामांची नियुक्ती या दोन घटकांना 50% अनुदान दिले जाईल.
- दीर्घकालीन एकात्मिक मूल्य श्रृंखला विकास प्रकल्प – प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या 50%-70% किंवा जास्तीतजास्त 50 कोटी रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार.
- यात उद्योगांचा समूह, क्षमता निर्मिती, गुणवत्ता, कापणीनंतरच्या सोयी-सुविधा, वाहतूक, विपणन आदी. अश्या घटकांचा समावेश आहे.

## ❖ प्रवासी रोपेवे प्रकल्पासाठी WAPCOS, डॉपेलमायर यांच्यात सामंजस्य करार



- देशात ‘प्रवासी रोपवे’ प्रकल्पासाठी उपाययोजना पुरविण्यासाठी WAPCOS (भारत सरकारची अग्रगण्य अभियांत्रिकी सल्लागार संस्था) आणि डोपेलमायर (ऑस्ट्रियाची जगातली सर्वात मोठी रोपेवे निर्माता कंपनी) यांच्यादरम्यान एक सामंजस्य करार करण्यात आला आहे.
- या करारामधून प्रकल्पासाठीचा अभ्यास, प्रकल्पाचा तपशीलवार अहवाल, बांधकाम, उपकरणांचा पुरवठा, कार्ये व देखरेख इ. घटकांच्या बाबतीत मदत मिळणार आहे.
- देशाला वाहतूक क्षेत्राच्या विकासासाठी भविष्यातील तंत्रज्ञान आवश्यक आहे.
- स्वस्त आणि परिणामी कमी प्रदूषणाचे लक्ष्य समोर ठेवत रोपेवे, केबल कार, फनिक्युलर रेल्वे हे डोंगराळ आणि क्लिष्ट भूभागांसाठी वाहतूकीचे अतिशय उपयुक्त मार्ग असू शकतात.
- शिवाय हे वाहतूक पर्याय टीयर II शहरांसाठी खूप उपयोगी ठरतील.


## ❖ छत्तीसगडमध्ये विधानसभा निवडणुकीत महिलांसाठी 'संगवारी' मतदान केंद्र



- निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीत महिला मतदारांना प्रोत्साहन देण्यासाठी छत्तीसगडमधील विविध मतदारसंघांमध्ये 'संगवारी' मतदान केंद्राची स्थापना केली आहे.
- छत्तीसगढी भाषेत 'संगवारी' याचा अर्थ मित्र असा होतो. या मतदान केंद्रावर सर्व अधिकारी व सुरक्षा कर्मचारी महिला असतील.
- राज्यात 12 आणि 20 नोव्हेंबर अश्या दोन टप्प्यांमध्ये निवडणुका घेतल्या जाणार आहेत.
- भारतीय निवडणूक आयोग (ECI) ही एक स्वायत्त व निम-न्यायिक संस्था आहे. आयोगाची स्थापना 25 जानेवारी 1950 रोजी झाली.

- आयोगामध्ये एक मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन निवडणूक आयुक्त असतात. आयोगावर राष्ट्रपती व उपराष्ट्रपती तसेच संसदेची लोकसभा आणि राज्यसभा तसेच राज्याच्या विधानसभा निवडणुका घेण्याची जबाबदारी असते.
- निवडणूक आयुक्त हे भारतीय निवडणूक आयोगाचे सदस्य आहेत, ज्यांना राष्ट्रीय व राज्य पातळीवर निवडणूक घेण्याचे अधिकार आहेत. पूर्वी आयोग एक सदस्य असलेले मंडळ होते, परंतु 1989 सालानंतर दोन अतिरिक्त निवडणूक आयुक्त पद निर्माण करण्यात आले.
- ओम प्रकाश रावत हे भारताचे वर्तमान मुख्य निवडणूक आयुक्त आहेत.
- भारतात विधानसभा निवडणूकीमध्ये भारतीय मतदाता विधानसभा (किंवा विधिमंडळ / राज्य विधानसभा) मधील सदस्यांची निवड करतो.
- ही निवडणूक दर 5 वर्षांनी आयोजित केली जाते आणि विधानसभेच्या सदस्यांना आमदार (MLA) म्हणून संबोधले जाते. विधानसभा निवडणुका सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकाच वर्षी घेतल्या जात नाहीत.
- विधानसभा निवडणुका या देशातील 29 राज्यांमध्ये आणि 7 केंद्रशासित प्रदेशांपैकी 2 (दिल्ली आणि पुडुचेरी) मध्ये आयोजित केल्या जातात.

## ❖ पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी RBIने ECB निकषांना शिथिल केले




- पायाभूत सुविधांसाठी बाह्य व्यावसायिक कर्ज (ECB) नियंत्रित करणार्‍या निकषांना भारतीय रिझर्व्ह बँकेनी शिथिल केले आहेत.

❑ अधिसूचनेनुसार -

- पात्र कर्जदारांनी उभारलेल्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी ECBसाठी आवश्यक असलेला किमान सरासरी परिपक्वतेचा कालावधी आधीच्या पाच वर्षांवरून कमी करीत तीन वर्षांचा केला आहे.
- अनिवार्य बचाव व्यवस्थेसाठी सरासरी परिपक्वता आवश्यकतेचा कालावधी आधीच्या दहा वर्षांवरून कमी करीत पाच वर्षांचा केला आहे.
- दीर्घकालीन मालमत्तांसाठी अल्पकालीन निधीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असणार्‍या बिगर-बँक कर्जदारांना येणार्‍या अडचणी दूर करण्यासाठी आणि तरलता राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.


## ❖ नवी दिल्लीत 'शारीरिकदृष्ट्या अपंग युवांसाठी जागतिक माहिती तंत्रज्ञान आव्हान 2018'चे आयोजन

- दिनांक 9 नोव्हेंबर ते 11 नोव्हेंबर 2018 या काळात नवी दिल्लीत 'शारीरिकदृष्ट्या अपंग युवांसाठी जागतिक माहिती तंत्रज्ञान आव्हान 2018' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- या कार्यक्रमाचे आयोजन रिहॅबिलिटेशन इंटरनॅशनल कोरिया आणि LG इलेक्ट्रॉनिक्स यांच्या सहकार्याने केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तींचे सक्षमीकरण विभागातर्फे केले गेले.




- या कार्यक्रमात यावर्षी भारतासह 18 देशांमधील 100 युवांचा सहभाग होता.
- आशिया-प्रशांत क्षेत्रातल्या अपंग युवांमध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कौशल्याचा प्रसार करणे आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

## ❖ बंगालच्या उपसागरात 'गज' चक्रीवादळ



- बंगालच्या उपसागरामध्ये सध्या गज या चक्रीवादळाची निर्मिती झाली असून, पुढील दिवसांत त्याची तीव्रता वाढणार आहे.
- चक्रीवादळामुळे तमिळनाडू, आंध्र प्रदेश आदी भागांमध्ये जोरदार पाऊस पडणार आहे. महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी ढगाळ स्थिती राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे.
- दोन दिवसांपासून बंगालच्या उपसागरामध्ये कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे.
- त्यातून चक्रीवादळाची निर्मिती होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. त्यानुसार गज चक्रीवादळाची निर्मिती झाली आहे.
- चक्रीवादळात किनाऱ्यालगतच्या भागामध्ये ताशी 90 ते 110 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.
- तमिळनाडू, आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यालगत दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. चक्रीवादळाची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्याने या परिसरात अतिवृष्टी होण्याचा अंदाज आहे.
- महाराष्ट्रामध्ये सध्या बहुतांश भागात निरभ्र आकाश असल्याने कोकण, मुंबई विभाग वगळता इतर ठिकाणी किमान तापमानात घट झाली असल्याने थंडी अवतरली आहे.
- अनेक ठिकाणी रात्रीच्या तापमानाचा पारा 20 अंशांच्या खाली आला आहे. चक्रीवादळाच्या स्थितीत राज्यात ढगाळ वातावरण निर्माण होऊ शकते. त्यामुळे किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.

## ❖ केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दिली राफेल किमतीची माहिती

- फ्रान्सच्या दस्सॉल्ट कंपनीकडून घ्यायच्या 36 राफेल लढाऊ विमानांच्या किंमतीची माहिती देण्यास कुरकुर करणाऱ्या केंद्र सरकारने फक्त न्यायाधीशांना पाहण्यासाठी का होईना, पण ती सीलबंद लखोट्यात सर्वोच्च न्यायालयात सादर केली.
- या विमानखरेदीच्या निर्णय प्रक्रियेसह किंमतीची माहितीही द्यावी, असा आदेश न्यायालयाने 31 ऑक्टोबर रोजी दिला, तेव्हा ॲटर्नी जनरल के.के. वेणुगोपाळ यांनी किंमतीची माहिती गोपनीय असल्याने ती उघड करण्यास विरोध केला होता.



- परंतु सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनी आदेशात बदल न करता त्यांना सांगितले की, तर तसे प्रतिज्ञापत्र करा. आम्ही त्याचा विचार करू. त्यानंतर न्यायालयाचा रोष टाळण्यासाठी केंद्राने ती सादर केली.
- राफेल विमाने खरेदीच्या निर्णय प्रक्रियेसंबंधी न्यायालयाने सांगितले होते की, त्यातील जो भाग उघड करणे योग्य आहे असे वाटते तेवढा सरकारने सादर करावा व त्याची एक प्रत याचिकाकर्त्यांनाही द्यावी.
- यानुसार या माहितीचा दुसरा लखोटाही न्यायालयात सादर करून ती माहिती याचिकाकर्त्यांना दिली.
- राफेल खरेदीसंबंधी एकूण तीन याचिका न्यायालयापुढे असून त्यावर पुढील सुनावणी बुधवारी 14 नोव्हेंबर रोजी होणार आहे.

## ❖ कोचीमध्ये 10व्या वर्धापन दिनानिमित्त 'IONS परिसंवाद' आयोजित





- केरळच्या कोचीमध्ये 13 व 14 नोव्हेंबर 2018 पासून 'इंडियन ओशन नेव्हल सिम्पोझियम (IONS)' याचा 10वा वर्धापन दिन साजरा करण्यासाठी एक परिसंवाद आयोजित केले गेले होते.
- "IONS अॅज ए कॅटालिस्ट फॉर SAGAR" या विषयाखाली हा कार्यक्रम चालवला गेला.
- भारत सरकारचा 'SAGAR ('सिक्युरिटी अँड ग्रोथ फॉर ऑल इन द रीजन' / प्रदेशातील सर्वांसाठी सुरक्षा व विकास)' हा दृष्टीकोन भारताच्या 'अॅक्ट ईस्ट' धोरणाशी संबंधित आहे आणि देशाच्या राजनैतिक, आर्थिक आणि लष्करी आराखड्याशी संबंधित आहे.
- इंडियन ओशन नेव्हल सिम्पोझियम (IONS) हिंद महासागर प्रदेशातील देशांतर्गत द्विवार्षिक बैठकीची एक शृंखला आहे.
- या मंचाची सुरुवात 2008 सालच्या फेब्रुवारी महिन्यात भारताने केली होती. एकूण 32 देश IONSचे सदस्य आहेत.
- हे सागरी सुरक्षेच्या क्षेत्रात सहकार्याला बळकट करण्यासाठी एक मंच प्रदान करते तसेच क्षेत्रीय समुद्री समस्यांवर चर्चा करण्यासाठी आणि सदस्य राष्ट्रांमध्ये मैत्रीपूर्ण संबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी सहाय्य प्रदान करते.
- सन 2018 मध्ये इराणी नौदलाने दोन वर्षांसाठी IONS चे अध्यक्षपद स्वीकारलेले आहे.

## ❖ मणीपूरच्या 7 जहालमतवादी गटांवर पाच वर्षांची बंदी



- केंद्र सरकारने मणीपूर राज्यात कार्यरत असलेल्या 7 मीतेई जहालमतवादी गटांवर आलेल्या बंदीचा काळ आणखी पाच वर्षांसाठी वाढविण्यात आला आहे.
- 'अनाधिकृत क्रियाकलाप (प्रतिबंधक) अधिनियम-1967' अंतर्गत तरतुदींच्या अन्वये बंदी घालण्यात आलेले गट पुढीलप्रमाणे आहेत -
- पीपल्स लिबरेशन आर्मी (PLA) आणि त्याची 'द रिव्होल्यूशनरी पीपल्स फ्रंट' ही राजकीय शाखा
- यूनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट (UNLF) आणि त्याची 'मणीपूर पीपल्स आर्मी' ही सशस्त्र शाखा
- कांगलीपाकची पीपल्स रिव्होल्यूशनरी पार्टी आणि त्याची 'रेड आर्मी' ही सशस्त्र शाखा
- कांगलीपाक कम्युनिस्ट पार्टी (KCP) आणि त्याची 'रेड आर्मी' ही सशस्त्र शाखा
- कांगली याओल कान्बा लुप (KYKL)
- द कोऑर्डिनेशन कमिटी
- अलायन्स फॉर सोशलिस्ट युनिटी कांगलीपाक (ASUK).

## ❖ नेताजींनी तिरंगा फडकवला या घटनेच्या स्मृतीत 75 रूपयांचे स्मारक नाणे प्रसिद्ध




- पोर्ट ब्लेअर येथे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी पहिल्यांदा तिरंगा फडकवला होता.
- या घटनेच्या 75व्या वर्धापन दिनानिमित्त 75 रूपये मूल्य असलेले स्मारक नाणे प्रसिद्ध करण्यात आले आहे.
- 30 डिसेंबर 1943 रोजी अंदमान व निकोबार बेटे या केंद्रशासित प्रदेशात पोर्ट ब्लेअरच्या सेल्युलर जेल येथे जपानच्या मदतीने नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी पहिल्यांदा तिरंगा फडकवला होता आणि अंदमान-निकोबार द्वीपसमूहाला ब्रिटिश राजवटीपासून मुक्त म्हणून घोषित केले होते.

## ❖ सहकार क्षेत्रात तरुण उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी NCDCची नवीन योजना

- सहकार क्षेत्रात तरुणाईच्या गरजा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ (NCDC) याने एक योजना तयार केली आहे.
- 'युवा सहकार - कोऑपरेटीव्ह एंटरप्राइज सपोर्ट अँड इनोव्हेशन स्कीम' या योजनेच्या माध्यमातून तरुणाईला सहकार क्षेत्रात चालवल्या जाणार्याह व्यवसायिक उपक्रमांकडे आकर्षित करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

## ❑ योजनेचे स्वरूप -

- NCDCने तयार केलेली ही योजना 1000 कोटी रुपयांच्या सहकार स्टार्टअप आणि अभिनवता कोष (Cooperative Start-up and Innovation Fund -CSIF) याच्याशी जोडली जाणार आहे.
- ईशान्य भारत, NITI आयोगाने ओळखलेली 28 राज्यांमधील विकास आकांक्षित जिल्हे तसेच महिला/अनुसूचित जाती/जमाती/दिव्यांग सदस्य असलेल्या सहकार उपक्रमांना अधिक अनुदान (प्रकल्पाच्या एकूण खर्चापैकी 80%) मिळणार, तर इतरांसाठी 70% अनुदान मिळणार. कर्जावरील व्याज दर देखील कमी असेल.
- या योजनेसाठी सर्व प्रकारचे सहकार उपक्रम किमान एक वर्षासाठी कार्यरत असावेत असा निकष ठरविण्यात आला आहे.

## ❑ राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ -

- 1963 साली राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ (National Cooperative Development Corporation -NCDC) याची स्थापना करण्यात आली आहे.
- नवी दिल्लीत याचे मुख्यालय आहे.
- हे मंडळ कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्य करते.

# ❖ मेघालयात भारत आंतरराष्ट्रीय चेरी ब्लॉसम महोत्सवाचा शुभारंभ




- दिनांक 14 नोव्हेंबर 2018 रोजी मेघालय राज्याच्या शिलांग शहरामध्ये ‘भारत आंतरराष्ट्रीय चेरी ब्लॉसम महोत्सव 2018’ या कार्यक्रमाला शुभारंभ करण्यात आला आहे.
- ही या महोत्सवाची तिसरी आवृत्ती आहे.
- जपान सरकारच्या भागीदारीने हा महोत्सव साजरा करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रोत्साहन दिले जात आहे.
- चार दिवसांच्या या महोत्सवाचे आयोजन भारत सरकारचे वन व पर्यावरण विभाग, मेघालय राज्य सरकार, जैव-स्त्रोत व शाश्वत विकास संस्था तसेच भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद यांच्या संयुक्त सहकार्याने केले गेले आहे.
- शरद ऋतूत (उन्हाळा आणि हिवाळा या दोन ऋतुंमधील काळ) हिमालयाच्या प्रदेशात चेरी ब्लॉसम या झाडाला बहर येतो.
- या विशेष बहारदार झाडांच्या निमित्ताने फुलांचा उत्सव साजरा केला जात आहे.

## ❖ FSSAI तर्फे 'ईट राइट' पुरस्काराची स्थापना

Food Safety and Standards Authority of India

- भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) कडून 2018 साली म्हणजे या वर्षाच्या सुरूवातीस 'इट राइट इंडिया' चळवळ सुरू केली गेली.
- या पुढाकारासाठी व्यक्ती आणि संस्थांना त्यांच्या उत्कृष्ट योगदानासाठी सन्मानित करण्यासाठी यावर्षी 'इट राइट' पुरस्काराची स्थापना करण्यात आली आहे.
- सुरक्षित आणि पोषक अन्नधान्य पर्यायांना प्रोत्साहन देण्यासाठी 'इट राइट इंडिया' चळवळीत सहभागी झालेल्या अन्नधान्य क्षेत्रातल्या कंपन्या, स्टार्टअप आणि व्यक्ती यांना सन्मानित करण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार तयार करण्यात आला आहे.
- भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) याची स्थापना 2011 साली केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत झाली.
- भारतात अन्न सुरक्षा आणि त्याच्या नियमनशी संबंधित कायदेशीर चौकट प्रदान करणार्याआ 'अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम-2006' याच्या अन्वये FSSAIची स्थापना करण्यात आली. ही एक स्वायत्त संस्था आहे.
- याचे नवी दिल्लीत मुख्यालय आहे.

## ❖ NITI आयोगाने 'हिमालय राज्य प्रादेशिक परिषद'ची स्थापना केली

- राष्ट्रीय परिवर्तनीय भारत संस्था (NITI) आयोगाने 'हिमालय राज्य प्रादेशिक परिषद' (Himalayan State Regional Council) याची स्थापना केली आहे.
- परिषदेच्या अध्यक्षपदी NITI आयोगाचे डॉ. व्ही. के. सारस्वत हे असतील.




- अन्य सदस्यांमध्ये हिमालय प्रदेशातील राज्यांचे मुख्य सचिव तसेच प्रमुख केंद्रीय मंत्रालयांचे सचिव, NITI आयोगाचे वरिष्ठ अधिकारी आणि काही विशेष व्यक्ती असतील.
- भारतीय हिमालयाच्या क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी ही परिषद तयार करण्यात आली आहे.
- हिमालयाच्या क्षेत्रात चालवल्या जाऊ शकणार्यास कार्यांसाठी विषयनिहाय एक आराखडा तयार करण्याच्या उद्देशाने 2017 साली स्थापन केलेल्या पाच कार्यगटांच्या अहवालांवर आधारित ओळखल्या गेलेल्या कृतींचे पुनरावलोकन आणि अंमलबजावणी करण्यासाठी परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.
- परिषद 12 राज्यांचा आढावा घेणार आहे, ज्यामध्ये जम्मू-काश्मीर, उत्तराखंड , हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश, मणीपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, सिक्किम, त्रिपुरा, आसामचे दोन जिल्हे (दिमा हसाओ आणि कार्बी अंगलोंग) आणि पश्चिम बंगालचे दोन जिल्हे (दार्जिलिंग आणि कलिमपोंग) यांचा समावेश आहे.

## ❖ स्वदेश दर्शन योजनेच्या अंतर्गत अरुणाचल प्रदेशात दोन परिक्रमांचे उद्धाटन झाले




- भारत सरकारच्या स्वदेश दर्शन योजनेच्या अंतर्गत अरुणाचल प्रदेशात दोन परिक्रमांचे उद्धाटन करण्यात आले आहे.
- "ईशान्य परिक्रमांचा (North East Circuits) विकास" प्रकल्प पुढीलप्रमाणे आहेत -
- भालुकपोंग-बोम्दीला-तवांग प्रकल्प
- नाफरा-सेप्पा-पाप्पू, पासा, पाक्के व्हॅलीज-सांगदूपोटा-नवे सागाली-जीरो-योम्चा प्रकल्प

- भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने देशात पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रसाद (Pilgrimage Rejuvenation and Spiritual Augmentation Drive -PRASAD) आणि स्वदेश दर्शन योजना सन 2014-15 मध्ये सुरू केली.
- देशात विषय आधारित पर्यटन परिक्रमा प्रकल्प विकसित करण्याच्या उद्देशाने 'स्वदेश दर्शन' योजना सुरू केली गेली आहे.
- या योजनेच्या अंतर्गत विकासासाठी 13 पर्यटन परिक्रमांची ओळख करण्यात आलेली आहे.
- ते आहेत - बुद्धीष्ट परिक्रमा, ईशान्य भारत परिक्रमा, सागरकिनारा परिक्रमा, हिमालय परिक्रमा, कृष्ण परिक्रमा, वाळवंट परिक्रमा, पर्यावरणीय परिक्रमा, वन्यजीव परिक्रमा, आदिवासी परिक्रमा, ग्रामीण परिक्रमा, धार्मिक परिक्रमा, रामायण परिक्रमा आणि वारसा परिक्रमा.

## ❖ नागरी विमान उड्डयण मंत्रालयाच्या 'एयर सेवा 2.0' पोर्टलचे उद्घाटन

- केंद्रीय नागरी विमान उड्डयण मंत्रालयाकडून दिनांक 19 नोव्हेंबर 2018 रोजी नवी दिल्लीत 'एयर सेवा 2.0' या संकेतस्थळ आधारित पोर्टलच्या आधुनिक आवृत्तीचे आणि मोबाईल ॲपचे उद्घाटन करण्यात आले आहे.
- यावेळी एक वर्षात प्रवाशांच्या तक्रारींचे तत्परतेने निवारण केल्याबद्दल चेन्नई विमानतळाला चॅम्पियन पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.




- हवाई वाहतुकीच्या सर्व सुविधांची माहिती प्रवाशांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे पोर्टल आणि ॲप तयार करण्यात आले आहे.
- त्याशिवाय या ॲपमुळे प्रवाशांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सुधारित यंत्रणा, विमानाच्या वेळा, वेळापत्रक यांची अद्ययावत माहिती प्रवाशांना मिळू शकेल.

## ❖ आगरतळा येथे 7व्या 'आंतरराष्ट्रीय पर्यटन मार्ट' या वार्षिक प्रदर्शनीचे आयोजन




- 22 नोव्हेंबर ते 24 नोव्हेंबर या काळात त्रिपुरा राज्याच्या आगरतळा शहरात 7वे 'आंतरराष्ट्रीय पर्यटन मार्ट' या वार्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.
- भारत सरकारचे पर्यटन मंत्रालय, पर्यटन विभाग, त्रिपुरा सरकार आणि ईशान्य राज्ये यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.
- प्रदर्शनीत देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारताच्या ईशान्य राज्यांमधील पर्यटनाच्या संभाव्य संध्या प्रदर्शित करण्यात आल्या आहेत.
- भारताच्या ईशान्य राज्यांमध्ये अरुणाचल प्रदेश, आसाम, मणीपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, त्रिपुरा आणि सिक्किम या राज्यांचा समावेश आहे.


## ❖ परदेशात नोकरी मिळविण्यासाठी परराष्ट्र कल्याण मंत्रालयाकडे ई-नोंदणी करणे आवश्यक




- नव्या निर्णयानुसार, 'नॉन-इमिग्रेशन चेक रीक्वायर्ड (नॉन-ECR)' हा दर्जा असणार्यार पारपत्र (पासपोर्ट) धारकांना परदेशात नोकरी मिळवण्यासाठी परराष्ट्र कल्याण मंत्रालयाकडे स्वतःची ई-नोंदणी करणे अनिवार्य केले जाणार आहे.
- परदेशात जाणाऱ्या भारतीयांच्या कल्याणासाठी घेतलेला हा निर्णय दिनांक 1 जानेवारी 2019 रोजी लागू होणार आहे.
- संयुक्त अरब अमीरात, सौदी अरब, कुवैत, ओमान, बहरीन आणि कतार तसेच अफगाणिस्तान, इंडोनेशिया, इराक, जॉर्डन, लेबनन, लिबिया, मलेशिया, सुदान, दक्षिण सुदान, सीरिया, थायलंड आणि येमेन अश्या 18 देशांसाठी नोंदणी आवश्यक आहे.
- इच्छुक भारतीयांना 'www.emigrate.gov.in' या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करावी लागणार आहे.

## ❖ ACROSS या छत्र योजनेच्या अंतर्गत नऊ उप-योजना 2020 सालापर्यंत चालू ठेवण्यास मंजुरी

- आर्थिक कल्याणासंबंधी मंत्रिमंडळ समितीने 'वातावरण व हवामान संशोधन पद्धती निरीक्षण प्रणाली आणि सेवा' (Atmosphere & Climate Research-Modelling Observing Systems & Services -ACROSS) या एकछत्री योजनेच्या 9 उप-योजना सन 2017 ते सन 2020 या कालावधीत चालविण्यासाठी मंजुरी दिली आहे.




- योजनेसाठी 1450 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.
- भूविज्ञान मंत्रालय, भारतीय हवामानशास्त्र विभाग (IMD), राष्ट्रीय उष्णकटिबंधी हवामानशास्त्र संस्था (IITM), नॅशनल सेंटर फॉर मिडीयम रेंज वेदर फोरकास्टिंग (NCMRWF) आणि इंडियन नॅशनल सेंटर फॉर ओशन इन्फॉर्मेशन सर्विस (INCOIS) या संस्थांच्या माध्यमातून या योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.
- ACROSS योजना ही भूविज्ञान मंत्रालयाच्या वातावरणविषयक शास्त्र कार्यक्रमाशी संबंधित असून, ही योजना चक्रीवादळ, वादळ, उष्माघात, गडगडाटासह मुसळधार पाऊस आदींसाठी धोक्याचा इशारा यासह वातावरण आणि हवामान सेवांच्या विविध दृष्टीकोणांना समजून घेण्यासाठी आहे.
- या योजनेमुळे हवामान, तापमान आणि महासागर यासंबंधी सुधारित अंदाज आणि सेवा उपलब्ध होतील.
- त्यातून सार्वजनिक हवामान सेवा, आपत्ती व्यवस्थापन, कृषी-हवामान सेवा, हवाई सेवा, पर्यावरण देखरेख सेवा, पर्यटन, तीर्थयात्रा, वीज निर्मिती, जल व्यवस्थापन, क्रिडा आदी सेवांना लाभ होईल.

## ❖ भारतातील 60 दशलक्ष मोबाइल सिम कार्ड बंद होणार




- रिलायन्स जिओच्या स्पर्धेत टिकण्यासाठी भारतीय एअरटेल आणि व्होडाफोन आयडिया या कंपन्यांनी किमान किमतीचे प्लान बाजारात आणले आहेत.
- यामुळे आता अनेकांना दोन-दोन सिम कार्ड वापरण्याची गरज पडणार नाही.
- त्यामुळे आगामी सहा महिन्यांत अधिकचे सिम कार्ड वापरण्याचा ट्रेंड कमी होण्याची शक्यता आहे.
- त्यातून सुमारे 60 दशलक्ष सिम कार्ड बंद होतील, असे दूरसंचार क्षेत्रातील जाणकारांनी सांगितले.
- ऑगस्ट महिन्यातील मिळालेल्या आकडेवारीनुसार भारतात 1.2 अब्ज मोबाइलचे वापरकर्ते आहेत.
- यापैकी केवळ एक सिम कार्ड वापरणाऱ्यांची संख्या 730 ते 750 दशलक्ष इतकी आहे. उरलेल्या ग्राहकांकडे दोन-दोन सिम कार्ड आहेत.
- सेल्युलर ऑपरेटर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे (सीओएआय) महासंचालकराजन मॅथ्यूज यांनी सांगितले की, बंद होऊ शकणारे आणि नव्याने दिले जाऊ शकणारे सिम कार्ड यांचा एकत्रित विचार केल्यास आगामी सहा महिन्यांत दूरसंचार कंपन्यांची ग्राहकसंख्या 25 ते 30 दशलक्षांनी कमी होईल, असे मला वाटते.

## ❖ मोफत 'इनकमिंग कॉल' बंद होणार




- भारतीय दूरसंचार क्षेत्रात रिलायंस जिओ आल्यापासून बऱ्याच कंपन्या डबघाईला लागल्या, तर अनेक कंपन्या कशाबशा बाजारात तग धरुन आहेत.
- परिणामी अनेक दूरसंचार कंपन्या लवकरच मोबाइल धारकांना मोठा धक्का देण्याच्या तयारीत आहेत.
- जिओने स्वस्त इंटरनेट पॅक उपलब्ध करून दिल्याने आपला ग्राहक वर्ग टिकवण्यासाठी इतर सर्वच कंपन्यांनीही स्वस्त दरात इंटरनेट पॅक उपलब्ध करुन दिले.
- जिओने डेटा आणि दरयुद्ध छेडल्यानंतर इतर कंपन्यांनीही कॉल दर कमी केले. पण यामुळे त्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.
- परिणामी आता या कंपन्यांनी 'इनकमिंग कॉल'साठी शुल्क आकारण्याची तयारी सुरु केल्याचे समजते.
- जिओच्या दूरसंचार क्षेत्रातील प्रवेशामुळे व्होडाफोन-आयडिया, एअरटेल आणि बीएसएनएल सारख्या कंपन्यांना मोठा फटका बसला आहे.
- त्यामुळे ग्राहकांना आता मोफत इनकमिंग कॉल सुविधा न देण्याचा निर्णय घेण्याच्या तयारीत या कंपन्या आहेत.
- सध्या तरी अनेक युजर्स असे आहेत की, फक्त इनकमिंग कॉलसाठी मोबाईल वापरतात.
- एके काळी मोबाईल कंपन्या आऊटगोइंगच नव्हे, तर इनकमिंगसाठी शुल्क आकारत होत्या.
- आता ग्राहकांना इनकमिंग कॉलसाठी महिन्याला (28 दिवस) 35 रुपयांचा रिचार्ज करावा लागण्याची शक्यता आहे. अन्यथा आउटगोइंगच नव्हे, तर इनकमिंग सेवाही बंद केली जाऊ शकते.

## ❖ पॅनकार्ड आता वडिलांच्या नावाशिवायही मिळणार




- सरकारी कागदपत्रांसाठी आपली सर्व माहिती देणे आवश्यक असते. आपली ओळख पटविण्यासाठी आपल्या नावाबरोबरच अडनाव, आई आणि वडिलांचे नाव आवश्यक असते.
- पॅन कार्ड हे एक महत्त्वाचे ओळखपत्र असून ते काढण्यासाठीही आपली सर्व माहिती द्यावी लागते. मात्र आता त्याच्या नियमांमध्ये काही बदल करण्यात आले आहेत.
- त्यामुळे आपली ओळख पटवण्यासाठी आता वडिलांच्या नावाचा संदर्भ देण्याची आवश्यकता नाही.
- आयकर विभागाने या नव्या नियमाबाबत माहिती दिली असून या नव्या नियमामुळे येत्या काळात ही सर्व प्रक्रिया काही प्रमाणात सोपी होण्याची शक्यता आहे.
- ज्यांचे आई-वडिल विभक्त झाले असतील त्यांना पॅनकार्ड काढण्यासाठी काही अडचणी येत असत.


- पॅन कार्ड काढण्यासाठी वडिलांचे नाव बंधनकारक असल्याने या अडचणींचा सामना करावा लागतो.
- या सर्व अडचणी लक्षात घेऊन आयकर विभागाने अशा लोकांना पॅन कार्ड काढण्यासाठी वडिलांचे नाव देण्याचा नियम शिथिल केला आहे.
- तर याअंतर्गत आयकर विभागाने आयकर काद्यातील 114व्या नियमात बदल करत पॅन कार्डसाठी वडिलांऐवजी आईचे नाव देण्यास मान्यता दिली आहे किंवा वडिलांच्या नावाचा संदर्भ देणे बंधनकारक नसल्याचे सांगितले आहे.
- त्यामुळे अनाथ मुले किंवा इतरही अनेकांचे प्रश्न यामुळे सुटणार आहेत.
- हा नवीन नियम येत्या 5 डिसेंबरपासून लागू होणार असल्याचे आयकर विभागाकडून सांगण्यात आले आहे. या निर्णयामुळे सिंगल पॅरेंट असणाऱ्यांनाही अडचणी येणार नाहीत.

## ❖ जम्मू-काश्मीर बँकेला RTI, CVC, राज्य विधानमंडळाच्या देखरेखीखाली आणले




- जम्मू-काश्मीर राज्य सरकारने जम्मू-काश्मीर बँक लिमिटेडला माहितीचा अधिकार (RTI) कायदा, केंद्रीय दक्षता आयोग (CVC) आणि राज्य विधानमंडळ यांच्या देखरेखीखाली आणले आहे.
- राज्य सरकारने सार्वजनिक क्षेत्रातले उपक्रम (PSU) म्हणून जम्मू-काश्मीर बँक लिमिटेडला मानण्यासंबंधी राज्यपाल सत्य पाल मलिक यांच्या अध्यक्षतेखाली राज्य प्रशासकीय परिषदेचा प्रस्ताव मंजुर केला आहे.
- त्यानुसार जम्मू-काश्मीर माहितीचा अधिकार कायदा-2009' याच्या तरतुदी इतर PSU प्रमाणेच बँकेला लागू होतील आणि ते CVCच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणार आहे.
- इतर PSU प्रमाणेच बँक राज्य विधानमंडळास देखील उत्तरदायी असेल आणि त्याचा वार्षिक अहवाल राज्य सरकारच्या वित्त विभागाद्वारे विधानमंडळाकडे सादर केला जाणार आहे.
- वित्त विभाग बँकेच्या देखरेखीसाठी योग्य दिशानिर्देश देणार आहे.
- 1938 साली स्थापना करण्यात आलेली जम्मू-काश्मीर बँक ही देशातली एकमेव राज्याकडून चालवली जाणारी बँक आहे.
- ज्यात त्याचा 59.3% हिस्सा आहे.
- भारताचे केंद्रीय दक्षता आयोग (CVC) भारत सरकारच्या विभिन्न विभागांच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या संबंधित भ्रष्टाचार नियंत्रणाची सर्वोच्च संस्था आहे.
- याची स्थापना सन 1964 मध्ये केली गेली.
- ही कोणत्याही कार्यकारी अधिकारांच्या नियंत्रणापासून मुक्त आहे आणि केंद्र सरकाराच्या अंतर्गत सर्व दक्षता कृतींवर देखरेख ठेवते.
- आयोगात एक केंद्रीय दक्षता आयुक्त (CVC) आणि दोन दक्षता आयुक्त नियुक्त केले जातात.

## ❖ ओडिशामधील दुर्मिळ आदिवासी भाषांचे शब्दकोष तयार केले गेलेत



- आदिवासी भाषांना लुप्त पावण्यापासून वाचविण्यासाठी ओडिशा राज्य सरकारने 21 आदिवासी भाषांचे शब्दकोष तयार केले आहेत.
- द्वैभाषिक आदिवासी शब्दकोष आदिवासी जमात असलेल्या जिल्ह्यात प्राथमिक पातळीवर राज्य सरकारद्वारे दिल्या जाणार्याल बहुभाषिक शिक्षणामध्ये वापरले जातील.
- ओडिशा राज्यात नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या 13 आदिवासी समुदायांसह 62 वेगवेगळे आदिवासी समुदाय आढळतात.
- या जमाती 21 भाषा आणि 74 बोलीभाषा बोलतात.
- 21 आदिवासी भाषांपैकी सातकडे त्यांची स्वत:ची लिपी आहे.

## ❖ शरयू नदीच्या किनारी श्रीरामाची भव्य मूर्ती उभारणार

- उत्तर प्रदेशातील ऐतिहासिक शरयू नदीच्या किनारी प्रभू श्रीरामाची 151 मीटर उंचीची मुर्ती उभारण्यात येण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.
- उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी अदित्यनाथ यांनी याची घोषणा केली.
- विशेष म्हणजे ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार हे ही मुर्ती साकारणार आहेत.
- श्रीरामाच्या या भव्य मूर्तीसाठी पाच मूर्तीकारांनी आपले मॉडेल सादर केले होते.



- यांपैकी मराठी असलेले प्रसिद्ध ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांच्या मॉडेलला मंजूरी देण्यात आली.
- राम सुतार हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे शिल्पकार आहेत.
- भारतीय संसदेच्या आवारात उभारण्यात आलेल्या महात्मा गांधी यांचा पुतळाही राम सुतार यांनी साकारला आहे.
- रामाची ही प्रस्तावित मूर्ती त्याच्या वैशिष्ट्यांवर आधारित अशा प्रकारे साकारण्यात येणार आहे.
- यामध्ये धनुर्धारी राजा, मर्यादा पुरुषोत्तम या रामाच्या प्रतिमेचा यातून आभास निर्माण होईल.

## ❖ मंडीमध्ये गृह मंत्रालयाची 'आणीबाणी प्रतिसाद सहाय्य यंत्रणा' स्थापित

- केंद्रीय गृह मंत्रालयाने मंडी (हिमाचल प्रदेश) या शहरात हिमाचल प्रदेशासाठी 'आणीबाणी प्रतिसाद सहाय्य यंत्रणा' (Emergency Response Support System -ERSS) कार्यरत केली आहे.
- हिमाचल प्रदेश हे ERSS प्रकल्पाच्या अंतर्गत संपूर्ण-भारतभरासाठी तयार करण्यात आलेला '112' हा एकच आपत्कालीन क्रमांक कार्यरत करण्यात आलेले देशातले पहिले राज्य ठरले आहे.

## ❑ सेवेची वैशिष्ठ्ये -

- या क्रमांकाला राज्यामधील आपत्कालीन प्रतिसाद केंद्राद्वारे पोलीस (100), अग्निशमन (101), आरोग्य सेवा (108), महिला मदतक्रमांक (1090) आणि इतर मदतक्रमांकांशी जोडले जाणार आहे.
- या सेवा '112 इंडिया' नावाच्या मोबाईल ॲपमध्ये देखील उपलब्ध करून दिलेल्या आहेत.
- 'आणीबाणी प्रतिसाद सहाय्य यंत्रणा (ERSS)' प्रकल्पाच्या अंतर्गत, संपूर्ण राज्याला सेवा पुरविण्यासाठी 12 जिल्हा आदेश केंद्रांसह (DCCs) शिमला या शहरात एक आणीबाणी प्रतिसाद केंद्र (ERC) स्थापन करण्यात आले आहे.



# ६. जागतिक



## ❖ चीनमध्ये जगातील सर्वात लांब सागरी पुलाचे उद्घाटन



- चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी चीनमध्ये जगातील सर्वात लांब सागरी पुलाचे उद्घाटन केले. या पुलाचे नाव हाँगकाँग-झुहाई-मकाऊ ब्रिज आहे.
- समुद्रात उभारण्यात आलेला हा जगातील सर्वाधिक लांबीचा पूल आहे. २० अब्ज डॉलर (१.५ लाख कोटी रुपये) खर्चून उभारण्यात आलेला हा पूल ५५ किमी लांबीचा आहे.
- या पुलाचे काम डिसेंबर २००९मध्ये सुरू झाले आणि १४ नोव्हेंबर २०१७ रोजी पूर्ण झाले होते. तो २४ ऑक्टोबरपासून वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे.
- या पुलाचे काम सुरू असताना घडलेल्या दुर्घटनेत ७ मजुरांचा मृत्यू झाला होता, तर १२९ जण जखमी झाले होते.
- या पुलाच्या उभारणीसाठी सुमारे ४ लाख टन स्टीलचा वापर करण्यात आला. हा पूल १२० वर्षे वापरला जाऊ शकतो.
- या पुलाच्या खाली असलेल्या समुद्रात ६.७ किलोमीटरचा बोगदा तयार करण्यात आला आहे. हा बोगदा दोन कृत्रिम बेटांना जोडतो.
- यामुळे हाँगकाँग ते झुहाई दरम्यानचा प्रवास अवघ्या ३० मिनिटांवर येणार आहे. याआधी या प्रवासासाठी ३ तासांचा अवधी लागायचा.
- समुद्रात उभारण्यात आलेला हा पूल हाँगकाँग आणि मकाऊसह दक्षिण चीनमधील ११ शहरांना जोडतो. या भागात ६.८ कोटी लोकांचे वास्तव्य आहे.
- पर्ल नदीच्या मुखापाशी लिंगडिंगयांग उपसागरात हा पूल उभारण्यात आला आहे. या पुलामुळे व्यापार वाढणार आहे. त्याचा मोठा फायदा चीनच्या अर्थव्यवस्थेला होईल.

## ❖ ब्रिक्स देशांमधील पर्यावरण सहकार्य कराराला मंजुरी

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने ब्रिक्स देशांदरम्यान करण्यात आलेल्या पर्यावरण सहकार्याबाबत सामंजस्य कराराला मंजुरी दिली आहे.
- जुलै २०१८मध्ये दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग इथे १०व्या ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या होत्या.



- या करारामुळे ब्रिक्स देशांदरम्यान पर्यावरण संरक्षण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनासाठी दीर्घकालीन भागीदारी स्थापन होईल.
- या कराराच्या माध्यमातून ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या ५ मोठ्या देशांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी आणि संवर्धनासाठी आपली कटिबद्धता व्यक्त केली आहे.
- या करारामुळे हवामान बदल आणि वन्यजीव संरक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि सर्वोत्तम पद्धतीचा वापर होण्याची शक्यता आहे.
- तसेच ब्रिक्स देशांच्या सरकारी व खासगी क्षेत्राला शाश्वत विकास आणि पर्यावरण रक्षण क्षेत्रात आपले अनुभव, तांत्रिक ज्ञान आणि सर्वोत्तम पद्धतींचे आदान प्रदान करण्याची संधी मिळेल.

### ❑ या करारात पुढील क्षेत्रातील सहकार्याचा समावेश आहे:-

- हवेची गुणवत्ता
- जल
- जैव विविधता
- हवामान बदल
- कचरा व्यवस्थापन
- शाश्वत विकास उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी २०३० कार्यक्रमाची अंमलबजावणी
- परस्पर सहमतीची अन्य क्षेत्रे

## ❖ इन्वेस्ट इंडियाला संयुक्त राष्ट्रसंघाचा उत्कृष्ठता पुरस्कार




- भारताची गुंतवणूक प्रोत्साहन संस्था ‘इन्वेस्ट इंडिया’ने शाश्वत विकासासाठीच्या गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाचा उत्कृष्ठता पुरस्कार जिंकला आहे.
- हा पुरस्कार अर्मेनियाचे राष्ट्रपती अर्मेन सर्किस्सियन यांनी ‘इन्वेस्ट इंडिया’चे सीईओ अध्यक्ष दीपक बगला यांना जागतिक गुंतवणूक मंच, जिनिव्हा येथे प्रदान केला.
- पवनउर्जा निर्मितीसाठी आवश्यक टर्बाइन निर्मात्या कंपनीला भारतात उत्पादन प्रकल्प सुरू करण्यासाठी केलेल्या सहकार्याकरिता इन्वेस्ट इंडियाला हा पुरस्कार देण्यात आला. यामुळे भारताच्या पवनउर्जा उत्पादनाच्या खर्चात घट होईल.
- इन्वेस्ट इंडियासह लेसोथो (लेसोथो राष्ट्रीय विकास महामंडळ), बहारीन (बहारीन आर्थिक विकास महामंडळ) आणि दक्षिण आफ्रिका (इन्वेस्ट दक्षिण आफ्रिका) यांनाही संयुक्त राष्ट्रसंघाचा पुरस्कार प्राप्त झाला.

### ❑ संयुक्त राष्ट्र गुंतवणूक प्रोत्साहन पुरस्कार:-

- इंग्रजी: युनायटेड नेशन्स इनव्हेस्टमेंट प्रमोशन पुरस्कार
- हा पुरस्कार संयुक्त राष्ट्रांच्या व्यापार आणि विकास परिषदेद्वारे (UNCTAD) दरवर्षी प्रदान केला जातो. याची सुरुवात २००२मध्ये झाली. हा पुरस्कार गुंतवणूकीला प्रोत्साहन देणाऱ्या संस्थांना दिला जातो.

- २०१७मध्ये हा पुरस्कार स्पेनच्या COFIDES, इथियोपियन गुंतवणूक आयोग आणि मॉरीशसच्या गुंतवणूक मंडळाला देण्यात आला होता.

❑ इन्वेस्ट इंडिया:-

- ही केंद्र सरकारची अधिकृत गुंतवणूक प्रोत्साहन आणि मदत संस्था आहे. देशामध्ये गुंतवणूक सुलभ करणे, हे या संस्थेचे मुख्य कार्य आहे.
- वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या औद्योगिक धोरण आणि संवर्धन विभागाची ही ना-नफा तत्वावर कार्य करणारी संस्था आहे.
- जागतिक गुंतवणूकदारांना भारतात गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी या संस्थेची भूमिका फार महत्वाची आहे.

## ❖ भारत आणि मलावी यांच्यात तीन सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या




- मलावीचे राष्ट्रपती पीटर आर्थर मुथारिका हे भारताच्या दौऱ्यावर आहेत. दिनांक 5 नोव्हेंबर 2018 रोजी भारत आणि मलावी या देशांच्या दरम्यान तीन सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत.

❑ ते पुढीलप्रमाणे आहेत -

- शांततापूर्ण उद्देशांसाठी अणुऊर्जा क्षेत्रात सहकार्यासाठी
- राजनैतिक व अधिकृत पासपोर्टसाठी लागणारा व्हिसा मिळविण्यापासून मुक्ततेसाठी
- प्रत्यावर्तन करार
- मलावीमधील 18 जल प्रकल्पांसाठी भारताकडून मलावीला $ 215 दशलक्ष इतक्या रकमेपर्यंतची एक नवीन पतमर्यादा
- मलावी हा आग्नेय (दक्षिण-पूर्व) आफ्रिकेतला भूपरिवेष्टित देश आहे.
- लिलोंग्वे हे देशाचे राजधानी शहर आहे.
- मलावियन क्वाचा हे अधिकृत चलन आहे. देशात प्रामुख्याने चेवा ही भाषा बोलली जाते.

## ❖ भारताची ITU परिषदेच्या सदस्यांची निवड झाली




- आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ (ITU) परिषदेचे सदस्य म्हणून भारताला पुढील चार वर्षांसाठी म्हणजेच सन 2019 ते सन 2022 या काळासाठी निवडण्यात आले आहे.
- दुबई (संयुक्त अरब अमीरात) येथे 7 नोव्हेंबर 2018 रोजी पार पडलेल्या 'ITU प्लेनिपोटेंशीयरी परिषद 2018' मध्ये ही निवड झाली.

- भारत आशिया-ऑस्ट्रेलेशिया क्षेत्रामधून परिषदेसाठी निवडलेल्या 13 देशांपैकी तिसऱ्या आणि जागतिक पातळीवर परिषदेसाठी निवडलेल्या 48 देशांमध्ये आठव्या क्रमांकावर निवडून आला आहे.
- शिवाय, नवी दिल्ली येथे ITU दक्षिण आशिया क्षेत्र कार्यालय आणि तंत्रज्ञान अभिनवता केंद्र उभारण्याचा ITUने निर्णय घेतला आहे.
- आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ (ITU) हा माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानासाठीचा संयुक्त राष्ट्रसंघाचा एक विशेष विभाग आहे.
- 17 मे 1865 रोजी संघाची स्थापना करण्यात आली. जिनेव्हा (स्वित्झर्लंड) येथे याचे मुख्यालय आहे.
- संघाचे 193 देश आणि सुमारे 800 खासगी क्षेत्रातल्या कंपन्या आणि शैक्षणिक संस्था सदस्य आहेत.
- 1869 सालापासून भारत ITUचा सक्रिय सदस्य आहे. 1952 सालापासून भारत ITU परिषदेचा नियमित सदस्य म्हणून कार्यरत आहे.

## ❖ भारत: IEA अंतर्गत प्रगत मोटर इंधन तंत्रज्ञान सहयोग कार्यक्रमाचा सदस्य

- दिनांक 9 मे 2018 रोजी भारत आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या (IEA) अंतर्गत प्रगत मोटर इंधन तंत्रज्ञान सहयोग कार्यक्रम (Advanced Motor Fuels Technology Collaboration Program) याचा सदस्य म्हणून निवडला गेला आहे, ही घोषणा केंद्रीय मंत्रिमंडळाने केली आहे.
- आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेमध्ये (International Energy Agency -IEA) भारताला दिनांक 30 मार्च 2017 पासून "सहकारी (असोसिएशन)" दर्जा दिला गेला आहे.
- अमेरिका, चीन, जपान, कॅनडा, चिली, इस्राएल, जर्मनी, ऑस्ट्रिया, स्वीडन, फिनलँड, डेन्मार्क, स्पेन, कोरिया, स्वित्झर्लंड आणि थायलंड हे या कार्यक्रमाचे इतर सदस्य आहेत.
- कार्यक्रमाचे प्राथमिक उद्दीष्ट म्हणजे प्रदूषकांचे उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि वाहतूक क्षेत्रात इंधनाबाबत उच्च कार्यक्षमता प्राप्त करण्याच्या हेतूने प्रगत मोटर इंधन वा पर्यायी इंधनांच्या बाजारपेठांची ओळख करुन देणे हा आहे.
- या कार्यक्रमामध्ये सहभागाचे फायदे म्हणजे संशोधनासाठी खर्च सामायिक करण्यात येईल आणि तांत्रिक स्त्रोतांची उपलब्धता वाढणार आहे.
- आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्था (IEA) ही 1974 साली आर्थिक सहकार्य आणि विकास संघटना (Organisation for Economic Co-operation and Development -OECD) याच्या संरचनेत स्थापन करण्यात आलेली एक स्वायत्त आंतरसरकारी संस्था आहे.
- IEA चे सचिवालय पॅरिस (फ्रान्स) येथे आहे.

## ❖ श्रीलंकेच्या राष्ट्रपतींनी संसद बरखास्त केली, 5 जानेवारीला मतदान होणार



- श्रीलंकेत राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर श्रीलंकेचे राष्ट्रपती मैत्रिपाल सिरिसेना यांनी संसद बरखास्त करण्यात येत असल्याची घोषणा केली.
- तसेच संसद बरखास्त केल्यामुळे आता 5 जानेवारी 2019 रोजी स्नॅप संसदीय निवडणुका घेतल्या जातील अशी घोषणा करण्यात आली आहे.
- दिनांक 26 ऑक्टोबर 2018 रोजी राष्ट्रपती सिरिसेना यांनी रानिल विक्रमसिंघे यांना पंतप्रधानपदावरुन काढल्यानंतर महिंद्रा राजपक्षे यांची पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली होती.
- मात्र राजपक्षे यांना 225 सदस्यांच्या श्रीलंकन संसदेत पंतप्रधानपदी राहण्यासाठी पुरेस पाठबळ नसल्याने हा निर्णय घेण्यात आला.
- श्रीलंका हा हिंद महासागरातला भारताच्या दक्षिणेकडे असणारा एक बेट राष्ट्र आहे. कोलंबो ही या देशाची राजधानी आहे आणि श्रीलंकी रुपया हे राष्ट्रीय चलन आहे.

## ❖ भारतीय सैनिकांचे फ्रान्समध्ये 57 ठिकाणी पुतळे



- पहिल्या महायुद्धात भारतीय सैनिकांनी बजावलेल्या कामगिरीच्या स्मृतिप्रीत्यर्थ फ्रान्समधील लॅव्हेन्टी या शहरात नव्याने उभारलेल्या पुतळ्याचे अनावरण 11 नोव्हेंबर रोजी, सैन्य दिनानिमित्त झाले.
- 1918 मध्ये पहिले महायुद्ध संपल्याच्या स्मरणार्थ हा दिन पाळला जातो.
- ब्रिटिश सैन्यातून लढताना हौतात्म्य आलेल्या भारतीय सैनिकांना फ्रान्समधील वेगवेगळया स्मशानभूमींमध्ये दफन केलेले आहे.
- या ठिकाणांजवळ अशी 57 स्मृतिस्थळे उभारण्याची योजना ‘इंटर फेथ शहिदी कोमेमोरेशन असोसिएशन‘ (आयएफएससी) या संस्थेने आखली आहे. त्यापैकी हा सात फुटी कांस्य पुतळा पहिलेच स्मारक आहे.
- तर लॅव्हेन्टी येथील दोन मृतावशेष हे 39व्या रॉयल गढवाल रायफल्सच्या जवानांचे असल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्यांचे गेल्या वर्षी पुन्हा लष्करी इतमामात दफन करण्यात आले होते.
- फ्रान्सच्या भूमीत चिरनिद्रा घेत असलेल्या आपल्या भारतीय सैनिकांचे अशा सर्व 57 ठिकाणी पुतळे उभारण्याच्या प्रकल्पाला लॅव्हेन्टीतून प्रारंभ झाला आहे.

## ❖ एससीओ शिक्षण मंत्र्यांची बैठक कझाकस्तान पार पडली




- शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या (एससीओ) शिक्षण मंत्र्यांची ७वी बैठक कझाकस्तानची राजधानीत अस्ताना येथे आयोजित करण्यात आली होती.
- कझाकस्तान सरकार, कझाकस्तान विज्ञान व शिक्षण मंत्रालय, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय व एससीओ विद्यापीठाच्या रेक्टर कार्यालयाद्वारे ही बैठक आयोजित केली गेली.
- भारत, कझाकस्तान, चीन, किरगिझस्तान, पाकिस्तान, रशिया, ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तानचे शिक्षण मंत्र्यांनी या बैठकीत भाग घेतला.
- या बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व मानव संसाधन आणि विकास राज्यमंत्री सत्यपाल सिंगयांनी केले.
- या बैठकीत संयुक्त संशोधन प्रकल्प, शैक्षणिक यात्रा, भाषा अभ्यास, व्यावसायिक शिक्षण आणि युवा विनिमय कार्यक्रम या क्षेत्रामध्ये बहुपक्षीय सहकार्यावर चर्चा करण्यात आली.

### ❑ शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन:-

- शांघाय सहकार्य संघटनेची (एससीओ) स्थापना २००१मध्ये चीनच्या पुढाकाराने करण्यात आली.
- चीन, कझाकस्तान, किर्गीझस्तान, उझबेकिस्तान, ताजिकीस्तान आणि रशिया हे या संघटनेचे संस्थापक देश आहेत.
- या देशांपैकी उझबेकिस्तान वगळता इतर देश १९९६मध्ये स्थापन झालेल्या 'शांघाय फाइव्ह' या गटाचे सदस्य होते.
- २०१७मध्ये भारत व पाकिस्तानला या संघटनेचे पूर्ण सदस्यत्व देण्यात आल्यामुळे सध्या या संघटनेचे ८ सदस्य देश आहेत.
- हे ८ देश जगातील ४२ टक्के लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतात. या देशांचे उत्पन्न हे जागतिक उत्पन्नाच्या २० टक्के आहे.
- अफगाणिस्तान, बेलारूस, इराण व मंगोलिया हे 'एससीओ'शी निरीक्षक देश म्हणून संलग्न आहेत.
- दहशतवाद, फुटीरतावाद या समस्यांविरोधात लढण्यासाठी आणि उपखंडीय समृद्धीसाठी यंत्रणा निर्माण करण्याकरिता शांघाय सहकार्य संघटना (एससीओ) स्थापन झाली.
- मूलतत्त्ववाद व दहशतवाद या समस्यांबरोबरच व्यापार, गुंतवणूक व दळणवळण तसेच संपर्क या मुद्द्यांवर या संस्थेच्या माध्यमातून बदल घडून येणे अपेक्षित आहे.

## ❖ स्टीफन हॉकिंग यांचे शेवटचे पुस्तक प्रकाशित




- दिवंगत शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांचे 'Brief Answers to the Big Questions' हे शेवटचे पुस्तक प्रकाशित झाले.
- टाईम ट्रॅव्हल, ब्लॅक होल इत्यादीसारख्या अनेक विषयांवर या पुस्तकात प्रकाशटाकण्यात आला आहे.
- या पुस्तकात हॉकिंग यांनी परमाणु शस्त्रे, कृत्रिम बुद्धिमत्ता, जेनेटिक इंजीनियरिंग आणि ग्लोबल वार्मिंग यासारख्या विषयांवर आपले मत नोंदविले आहे.

### ❑ स्टीफन हॉकिंग:-

- ब्रिटनचे ख्यातनाम विश्वरचना शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांचा जन्म ८ जानेवारी १९४२ रोजी झाला. त्यांना आजच्या युगातील सर्वोत्तम शास्त्रज्ञांपैकी एक मानले जाते.
- ते एक सैद्धांतिक भौतिकशास्त्रज्ञ, विश्वरचना शास्त्रज्ञ व लेखक होते. ब्लॅक होल, हॉकिंग एनर्जी, हॉकिंग्ज रेडिएशन यांसह अनेक शोधांसाठी ते प्रसिद्ध आहेत.
- त्यासाठी त्यांना भौतिकशास्त्रातले अत्यंत मानाचे पुरस्कार मिळालेले आहेत. कमांडर ऑफ दी ब्रिटिश एम्पायर या पुरस्कारानेही त्यांना गौरवले होते.
- २००९मध्ये त्यांना प्रेसिडेन्शिअल मेडल फॉर फ्रीडम या अमेरिकेतील सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविले होते.
- त्यांचे 'ब्रिफ हिस्टरी ऑफ टाईम' हे पुस्तक विशेष गाजले. या पुस्तकात त्यांनी बिग बँग आणि कृष्णविवरासंदर्भात सविस्तर विवेचन केले होते.
- वयाच्या २१व्या वर्षी 'मोटार न्यूरॉन डिसीज'ने त्यांना ग्रासले होते. ते फार फार तर २ वर्षे जगू शकतील अशी भीती डॉक्टरांनी वर्तवली होती.
- परंतु असामान्य इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी आपल्या आजारपणावर मात करत आधुनिक काळातील न्यूटन अशी ख्याती जगभर मिळवली.
- दुर्धर अशा आजारपणावर मात करत विज्ञान विषयात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या हॉकिंग यांचे १४ मार्च २०१८ रोजी निधन झाले.

## ❖ सिंगापूरमध्ये एडीडीएमचे आयोजन

- सिंगापूरमध्ये १९-२० ऑक्टोबर २०१८ रोजी १२व्या आसियान संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीचे (एडीडीएम) आणि ५व्या एडीडीएम-प्लसचे आयोजन करण्यात आले.
- ही बैठक आग्नेय आशियातील संरक्षणासाठी प्रमुख मंत्रीस्तरीय मंच आहे. या मंचावर आसियान देशांद्वारे संरक्षण आणि सहकार्यावर चर्चा केली जाते.



- या बैठकीमध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, चीन, जपान, न्यूझीलँड, दक्षिण कोरिया, रशिया आणि अमेरिका या देशांचे संरक्षण मंत्री उपस्थित होते.
- या बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व भारताच्या संरक्षण मंत्री निर्मला सीतारामन यांनी केले.
- या बैठकीत संरक्षण मंत्र्यांनी सागरी सुरक्षा, दहशतवाद विरोधी कारवाई, शांतता मोहिमा या मुद्यांवर सहमती दर्शवली.

### ❑ एडीडीएम प्लस(ADDM: ASEAN Defence Ministers Meeting):-

- एडीडीएम प्लस आसियान सदस्य देश आणि ८ भागीदार देशांचे संरक्षण मजबूत करण्यासाठी तसेच शांती व विकास निर्मितीसाठी एक मंच आहे.
- या बैठकीचा उद्देश चर्चा आणि पारदर्शकतेसह सदस्य देशांमध्ये परस्पर विश्वास मजबूत करणे हा आहे.
- एडीडीएम प्लसच्या पहिल्या परिषदेचे आयोजन २०१०मध्ये व्हिएतनामची राजधानी हनोई येथे करण्यात आले होते.

### ❑ ASEAN (आसियान) : Association of Southeast Asian Nations

- आसियान ही आग्नेय आशियातील १० देशांची संघटना असून, याचे सचिवालय जकार्ता (इंडोनेशिया) येथे आहे.
- ब्रुनेइ, म्यानमार, कंबोडिया, इंडोनेशिया, लाओस, मलेशिया, फिलीपाइन्स, सिंगापूर, थायलंड आणि व्हिएतनाम हे देश आसियानचे सदस्य आहेत.
- ८ ऑगस्ट १९६७ रोजी रोजी ही संघटना स्थापन करण्याची घोषणा झाली, यालाच 'बँकॉक घोषणा' म्हणतात.
- स्थापनेवेळी याचे इंडोनेशिया, मलेशिया, फिलीपाइन्स, सिंगापूर, थायलंड हे पाच देश होते. त्यानंतर ब्रुनेइ हा सहावा देश जोडला गेला.
- १९९५ साली व्हिएतनाम, १९९७ साली लाओस व म्यानमार आणि १९९९ साली कंबोडिया हे देश जोडले गेले.
- जगाच्या एकूण जमिनक्षेत्रापैकी ३ टक्के क्षेत्र आसियान देशांनी व्यापलेले आहे. जगाच्या लोकसंख्येपैकी ८.८ टक्के लोकसंख्या आसियान देशांची आहे.
- सर्व आसियान देशांची मिळून एक अर्थव्यवस्था मानली तर ती जगातील सातव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे.

## ❖ गुन्हेगारीसंबंधित बाबींमध्ये कायदेशीर सहाय्यासाठी भारत आणि मोरोक्को यांच्यात करार




- दिनांक 12 नोव्हेंबर 2018 रोजी भारत आणि मोरोक्को या देशांदरम्यान गुन्हेगारीसंबंधित बाबींमध्ये परस्पर कायदेशीर सहकार्यासंबंधी करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत.
- या करारामुळे मोरोक्कोबरोबर द्विपक्षीय सहकार्य अधिक मजबूत होईल आणि गुन्ह्यांचा प्रतिबंध, तपास तसेच दहशतवादी कृत्यांना आर्थिक मदत

- मदत पुरवणाऱ्यांचा शोध, प्रतिबंध तसेच संपत्ती जप्त करण्यासाठी व्यापक कायदेशीर चौकट उपलब्ध होईल.
- मोरोक्को हा उत्तर आफ्रिका भागातला एक देश आहे.
- रबात हे देशाचे राजधानी शहर आहे.
- मोरोक्कन दिरहाम हे राष्ट्रीय चलन आहे.
- मोरोक्को आफ्रिकेतला एकमेव असा देश आहे, जो आफ्रिका संघाचा सदस्य नाही.
- मोरोक्को अरब संघाचा सदस्य आहे. अटलांटिक महासागर व भूमध्य समुद्र या दोन्हीचे किनारे लाभलेला मोरोक्को हा फ्रान्स व स्पेन व्यतिरिक्त एकमेव देश आहे.

## ❖ "समुद्र शक्ती": भारत-इंडोनेशिया यांचा द्वैपक्षीय सागरी सराव




- इंडोनेशियाच्या सुराबया बंदराजवळ भारत आणि इंडोनेशिया यांच्या नौदलांचा "समुद्र शक्ती 2018" या शीर्षकाखाली द्वैपक्षीय सागरी सराव आयोजित करण्यात आला आहे.
- हा कार्यक्रम 12 नोव्हेंबर ते 18 नोव्हेंबर या काळात चालत आहे.
- दक्षिण पूर्व आशिया क्षेत्रात तैनात भारतीय नौदलाचे 'INS राणा' या जहाजाने या सरावात भाग घेतला आहे.
- द्वैपक्षीय संबंध बळकट करणे, सागरी सहकार्य वाढवणे आणि सर्वोत्तम पध्दतींची देवाणघेवाण करणे हा या सरावाचा उद्देश आहे.
- इंडोनेशिया (दिपांतर प्रजासत्ताक) आग्नेय (दक्षिण पूर्व) आशिया आणि ओशिनिया येथील एक देश आहे.
- हा 17508 बेटांचा बेट राष्ट्र आहे आणि सुमारे 109 कोटी लोकसंख्येसह जगातला तिसरा सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे.
- जकार्ता या देशाची राजधानी आहे आणि इंडोनेशियन रुपिआह हे चलन आहे.

## ❖ 'इंद्रा 2018': भारत आणि रशिया यांचा संयुक्त लष्करी सराव




- दिनांक 18 नोव्हेंबर 2018 पासून उत्तरप्रदेशात बाबिना येथील लष्करी तळावर भारत आणि रशिया यांच्या लष्करी दलांचा 'इंद्रा 2018' नावाचा संयुक्त लष्करी सराव सुरू होणार आहे.
- 'इंद्रा' मालिकेचा यावर्षीची ही दहावी आवृत्ती आहे.
- हा सराव संयुक्त राष्ट्रसंघाच्या नेतृत्वाखाली बंडविरोधात लढा देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला आहे.

- अकरा दिवस चालणार्याण या प्रशिक्षण कार्यक्रमात लष्कराच्या आंतर-कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी अनुभवांचे आदानप्रदान केले जाणार आहे.
- रशिया हा पूर्व यूरोप आणि उत्तर एशिया प्रदेशात स्थित एक विशाल आकार असलेला देश आहे.
- हा एकूण 17075400 चौ. किमी. क्षेत्रफळ असलेला जगातला सर्वात मोठा देश आहे. आकाराच्या दृष्टीने हा भारताच्या पाच पट आहे.
- या देशाची राजधानी मॉस्को शहर असून देशाचे चलन रशियन रूबल हे आहे. देशाचे वर्तमान राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे आहेत.

## ❖ APIX: 23 देशांमधील बँक खाते नसलेल्यांसाठी नवे बँकिंग तंत्रज्ञान

- 10 ASEAN सदस्य देशांसह 23 देशांमध्ये बँक खात्याशिवाय असलेल्या लोकांपर्यंत पोहचण्यासाठी विशेषतः लहान बँका, टीयर-3 आणि 4 साठी बोस्टन येथील 'वर्च्युसा'द्वारे 'ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस एक्सचेंज (APIX)' नावाचे एक नवीन बँकिंग तंत्रज्ञान तयार करण्यात आले आहे.
- सिंगापूरमध्ये दिनांक 14 नोव्हेंबर 2018 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या नव्या बँकिंग तंत्रज्ञानाचे अनावरण करण्यात आले आहे.



- या तंत्राच्या माध्यमातून ठरविलेल्या क्षेत्रातल्या जवळजवळ दोन अब्ज लोकांपर्यंत मदत पोहचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, जे अजूनही बँक खात्याशिवाय आहेत.
- 'ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस एक्सचेंज (APIX)' हा एक वैश्विक फायनॅनष्यल टेक्नॉलॉजी (फिनटेक) मंच आहे.
- हे बोस्टन येथे मुख्यालय असलेल्या 'वर्च्युसा (Virtusa)' या कंपनीने विकसित केलेले एक अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे.
- हे तंत्रज्ञान दुर्गम प्रांतात लोकांपर्यंत पोहचण्यासाठी विशेषतः लहान बँकांसाठी (टियर 3 आणि टियर 4) हैदराबाद, कोलंबो आणि लंडन येथील सॉफ्टवेअर तंत्रज्ञांद्वारे तयार केलेले आहे.

## ❖ 'साखरेसंबंधी बाजारपेठेतल्या भारताच्या विकृत धोरणांवरून' ऑस्ट्रेलियाची WTO कडे याचिका दाखल

WORLD TRADE ORGANIZATION

- भारताने साखरेवर दिलेल्या अनुदानामुळे जागतिक किंमतींमध्ये "लक्षणीय घट" झाली आहे आणि यामुळे ऑस्ट्रेलियाच्या साखर उत्पादकांना तोटा होत आहे, असा आरोप ऑस्ट्रेलियाने केला आहे.
- या आरोपाखाली भारताविरूद्ध कायदेशीर

- कारवाई करण्यासाठी ऑस्ट्रेलियाने जागतिक व्यापार संघटनेकडे (WTO) याचिका दाखल केली आहे.
- भारत हा साखर उत्पादनात जगातला दुसरा तर ऑस्ट्रेलिया तिसरा सर्वात मोठा उत्पादक देश आहे.
- ऑस्ट्रेलियाने आरोप केला आहे की, भारतात यावर्षीच्या साखर हंगामात साखर उत्पादन सरासरी 20 दशलक्ष टनावरून ते 35 दशलक्ष टनापर्यंत पोहोचले आहे.
- WTOच्या नियमांच्या अंतर्गत शेतकऱ्यांना सहाय्य देण्यासाठी परवानगी देण्यात आलेल्या मर्यादेपेक्षा भारतात अधिक अनुदान दिले जात आहे.
- जागतिक व्यापार संघटना (WTO) ही संयुक्त राष्ट्रसंघाची आंतरसरकारी संघटना आहे, जी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमन करते.
- संघटनेचे मुख्यालय जिनेव्हा (स्वित्झर्लंड) येथे आहे आणि याचे 164 देश सभासद आहेत.
- 1948 साली लागू झालेल्या दर व व्यापार संदर्भात सर्वसाधारण करार (General Agreement on Tariffs and Trade -GATT) याला बदली करून दिनांक 15 एप्रिल 1994 रोजी 123 राष्ट्रांनी स्वीकारलेल्या मार्राकेश कराराच्या अंतर्गत WTO अधिकृतपणे दिनांक 1 जानेवारी 1995 रोजी कार्यरत झाले.

## ❖ दुबईत 87 व्या इंटरपोल महासभेचे आयोजन




- संयुक्त अरब अमीरातच्या (UAE) दुबई शहरात दिनांक 18 नोव्हेंबर ते 21 नोव्हेंबर या काळात 'आंतरराष्ट्रीय फौजदारी पोलीस संघटना (इंटरपोल) महासभा 2018' (General Assembly) भरविण्यात येणार आहे.
- महत्त्वपूर्ण सुरक्षात्मक समस्यांवर चर्चा करण्यासाठी सार्वजनिक सुरक्षा विभागाचे अधिकारी आणि जागतिक तज्ज्ञांना एकत्र आणणार आहे.
- संघटित गुन्हे आणि दहशतवाद विरोधात लढ्यात कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच प्रगत तंत्रज्ञानाची भविष्यातील भूमिका वाढविण्यावर चर्चा केली जाणार आहे.
- दुबई पोलिसांनी स्वत:ला जगाच्या सर्वोत्तम कायद्याच्या अंमलबजावणी संस्थांमध्ये विकसित केले आहे.
- त्यासाठी युरोपियन फाऊंडेशन फॉर क्वालिटी मॅनेजमेंट (EFQM) या संस्थेकडून दुबई पोलिसांना त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी प्लॅटिनम पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.
- ते हा पुरस्कार प्राप्त करणारे जगातले पहिले पोलीस दल बनले आहे.
- आंतरराष्ट्रीय फौजदारी पोलीस संघटना (इंटरपोल / International Criminal Police Organisation) ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे जे आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार्यासाठी सुविधा पुरवते.
- 1923 साली याची स्थापना करण्यात आली.
- फ्रान्समधील लिऑन येथे इंटरपोलचे मुख्यालय आहे.

## ❖ 'भारत-चीन संरक्षण आणि सुरक्षा संवाद' याची 9वी वार्षिक बैठक संपन्न




- भारत आणि चीन या दोन देशांमधील 'संरक्षण आणि सुरक्षा संवाद' याची नववी वार्षिक बैठक चीनची राजधानी बिजींग या शहरात पार पडली.
- भारत आणि चीन दोन्ही देशांच्या प्रतिनिधींनी दोन्ही देशांच्या लष्करी दलांमध्ये वेगवेगळ्या पातळीवर संरक्षण क्षेत्रासंबंधित विनिमय आणि परस्परसंवाद वाढविण्यास सहमती दर्शविलेली आहे.
- यावेळी 2019 सालामधील वार्षिक बैठक नवी दिल्लीत घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.
- चीन हा जगाच्या मध्यभागी वसलेला एक आशियाई देश आहे.
- हा जगातला सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश आहे.
- भूप्रदेशाच्या आकारानुसार, चीन (क्षेत्रफळ सुमारे 96 लक्ष चौरस किलोमीटर) जगातला दुसरा सर्वात मोठा देश आहे.
- बिजींग ही देशाची राजधानी असून रेन्मिन्बी (CNY) हे राष्ट्रीय चलन आहे.

## ❖ किलोग्रामसह सात मूलभूत मापांची व्याख्या बदलण्यात आली




- 13 नोव्हेंबर ते 16 नोव्हेंबर 2018 या कालावधीत व्हर्सिल (फ्रान्स) येथे 'वजन व माप महापरिषद' (General Conference on Weights and Measures -CGPM) याची 26वी बैठक पार पडली.
- या बैठकीत मूलभूत प्लांक्स कोंस्टंट (h) या वैज्ञानिक संज्ञेच्या आधाराने "किलोग्रामचे SI युनिट" याची 130 वर्ष जुनी म्हणजेच 1889 साली परिभाषित केली गेलेली व्याख्या पुनर्परिभाषित करण्याच्या हेतूने मतदान केले गेले. किलोग्राम सोबतच सेकंद (s), मीटर (m), एम्पियर (A), केल्विन (K), मोल आणि कॅन्डेला या सात मूलभूत मापांची व्याख्या बदलली गेली आहे.
- या ऐतिहासिक मतदानानंतर दिनांक 20 मे 2019 पासून नवीन व्याख्या लागू होणार आहेत.
- फ्रान्सच्या पॅरिस शहरात आंतरराष्ट्रीय वजन व माप संस्था (BIPM) याच्या कार्यालयात किलोग्रामचे आंतरराष्ट्रीय नमूना ठेवण्यात आले आहे.
- तो नमूना 90% प्लॅटिनम आणि 10% इरीडियम या धातूंनी बनलेला आहे आणि वृत्तचित्ती (cylinder) या आकारात असलेल्या या नमून्याचा व्यास 39 मिलिमीटर आणि उंची 39 मिलिमीटर इतकी आहे.
- 1875 साली स्थापन करण्यात आलेली 'वजन व माप महापरिषद' (CGPM) ही अचूक आणि नेमके मापांसाठी जगातली सर्वोच्च आंतरराष्ट्रीय संस्था आहे.
- या समूहात भारतासह 60 देश आणि 42 सहकारी सदस्य देश आहेत.

## ❖ मालदीव 'राष्ट्रकुल'मध्ये पुन्हा समाविष्ट होणार



- मालदीवच्या मंत्रिमंडळाने 53 राष्ट्रांच्या राष्ट्रकुल (Commonwealth) यामध्ये पुन्हा समाविष्ट होण्यास मान्यता दिली आहे.
- मालदिवने ऑक्टोबर 2016 मध्ये राष्ट्रकुलमधून बाहेर पडले.
- त्यावेळी माजी राष्ट्रपती अब्दुल्ला यामीन सत्तेत होते. देशावर भ्रष्टाचार तसेच मानवी हक्कांचे उल्लंघन याबाबत दबाव टाकल्यानंतर देश राष्ट्रकुलमधून बाहेर पडले होते.
- राष्ट्रकुल (कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स) ही 53 सदस्य राष्ट्रांची आंतरसरकारी संघटना आहे, जे भूतकाळात ब्रिटीश साम्राज्याखाली होते. याची स्थापना दिनांक 11 डिसेंबर 1931 रोजी करण्यात आली. याचे मुख्यालय लंडन (ब्रिटन) येथे आहे.
- ब्रिटनची संसद ही संघटनेची संस्थापक आहे.
- मालदीव हा हिंद महासागरातला एक उष्णकटिबंधीय बेटराष्ट्र आहे.
- हा देश 1000 पेक्षा जास्त कोरल बेटांपासून बनलेला आहे.
- माले हे देशाचे राजधानी शहर असून मालदीवी रुफिया हे राष्ट्रीय चलन आहे.

## ❖ लढाऊ जहाज तयार करण्यासाठी भारत आणि रशिया यांचा तांत्रिक करार



- भारतात ॲडमिरल ग्रिगोरोव्हिच श्रेणीतले दोन लढाऊ जहाज तयार करण्यासाठी भारताने रशियासोबत एक तांत्रिक करार केला आहे.
- $ 500 दशलक्ष इतक्या रकमेचा हा करार भारताच्या गोवा शिपयार्ड लिमिटेड (GSL) आणि रशियाच्या रोसोबोरोनेक्सपोर्ट यांच्यात झाला आहे.
- या करारामधून रशियाकडून तांत्रिक हस्तांतरणासह अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्जित दोन लढाऊ जहाजे भारतातच तयार करण्यात येणार आहे.
- रशिया हा पूर्व यूरोप आणि उत्तर एशिया प्रदेशात स्थित एक विशाल आकार असलेला देश आहे.
- हा एकूण 17075400 चौ. किमी. क्षेत्रफळ असलेला जगातला सर्वात मोठा देश आहे.
- आकाराच्या दृष्टीने हा भारताच्या पाच पट आहे.
- या देशाची राजधानी मॉस्को शहर असून देशाचे चलन रशियन रूबल हे आहे. देशाचे वर्तमान राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे आहेत.

## ❖ ऑस्ट्रेलियाने देखील UNचा स्थलांतरणासंबंधी करार नाकारला



- ऑस्ट्रेलियाच्या सरकारने स्थलांतरणासंबंधी असलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या वैश्विक करारावर स्वाक्षरी न करण्याचा निर्णय घेतला आहे.
- जगभरातील लोकांना कायदेशीर स्थलांतरण करण्यास मदत करणारे आणि त्याबाबत चांगल्या व्यवस्थापनेसाठी जुलै 2018 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने 'UN ग्लोबल कॉम्पॅक्ट फॉर मायग्रेशन' हा करार मान्य केला होता.
- देशाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या स्थलांतरणासंबंधी धोरणाशी संयुक्त राष्ट्रसंघाचा हा करार सुसंगत नसल्याचे कारण पुढे करीत अमेरिकेच्या पाठोपाठ आता ऑस्ट्रेलियाने देखील हा करार नाकारला आहे.
- ऑस्ट्रेलिया हा ऑस्ट्रेलियाच्या राष्ट्रकुल दक्षिण गोलार्धाच्या खंडाच्या अंतर्गत असलेला एक देश आहे, जो जगातला सर्वात छोटा खंड आहे आणि जगातला सर्वात मोठा बेट देखील आहे, जो हिंद व प्रशांत महासागरात पसरलेला आहे.
- ऑस्ट्रेलिया हा एकमेव असा प्रदेश आहे, जो एक खंड, एक राष्ट्र आणि एक बेट आहे.
- कॅनबेरा हे राजधानी शहर तर ऑस्ट्रेलियन डॉलर हे राष्ट्रीय चलन आहे.

## ❖ भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात शिक्षण आणि गुंतवणूक क्षेत्रात पाच सहकार्य करार



- दिनांक 21 नोव्हेंबर 2018 रोजी भारताने ऑस्ट्रेलियाशी पाच करार केले आहेत.
- राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांच्या ऑस्ट्रेलियाच्या दौर्या दरम्यान हे करार केले गेले आहेत.
- ते पुढीलप्रमाणे:–
- दिव्यांग व्यक्तींना सेवा प्रदान करण्यासाठी दिव्यांगतेच्या क्षेत्रामध्ये सहकार्यासाठी करार
- द्वैपक्षीय गुंतवणूक वाढविण्यासाठी इन्व्हेस्ट इंडिया आणि ऑसट्रेड यांच्यात करार
- केंद्रीय खणीकर्म नियोजन आणि संरचना संस्था (रांची, भारत) आणि कॅनबेराचे CSIRO यांच्यात वैज्ञानिक आणि नवकल्पकतेला प्रोत्साहन देण्यासाठी सहकार्यासाठी करार
- आचार्य एन. जी. रंगा कृषी विद्यापीठ (गुंटूर) आणि वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ यांच्यात कृषी संशोधन आणि शिक्षण क्षेत्रात सहकार्यासाठी करार
- इंद्रप्रस्थ इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी (नवी दिल्ली) आणि क्वीन्सलँड विद्यापीठ यांच्यात संयुक्त पीएचडी कार्यक्रमासंबंधी करार
- ऑस्ट्रेलिया हा ऑस्ट्रेलियाच्या राष्ट्रकुल दक्षिण गोलार्धाच्या खंडाच्या अंतर्गत असलेला एक देश आहे, जो जगातला सर्वात छोटा खंड आहे आणि जगातला सर्वात मोठा बेट देखील आहे, जो हिंद व प्रशांत महासागरात पसरलेला आहे.

## ❖ भारतासोबतचे संबंध वृद्धिंगत करण्यासाठी युरोपीय संघाचे धोरण जाहीर




- दिनांक 21 नोव्हेंबर 2018 रोजी युरोपीय संघाने भारतासोबतचे आपले संबंध वृद्धिंगत करण्यासाठी त्यांचे धोरण स्पष्ट करणारे दस्तऐवज प्रसिद्ध केले आहे.
- गुंतवणूक, पायाभूत सुविधा, संरक्षण, सुरक्षा आणि दहशतवादाविरोधी तसेच हिंद महासागर क्षेत्रात द्वैपक्षीय लष्करी सहकार्याला वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.
- युरोपीय संघ (EU) हा 28 सदस्य राज्यांचा राजकीय आणि आर्थिक संघ आहे.
- जे प्रामुख्याने युरोप खंडात आहेत.
- युरोपीय संघाची स्थापना 1 नोव्हेंबर 1993 रोजी झाली
- याचे मुख्यालय बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्स येथे आहे.

## ❖ ब्रिटन आणि युरोपीय संघाकडून ब्रेक्जिटनंतर संबंधांसंबंधी घोषणापत्राचा मसुदा मान्य




- ब्रिटन आणि युरोपीय संघाने ब्रिटन संघामधून बाहेर पडल्यानंतर दोघांमधील व्यापार आणि आर्थिक संबंध कश्याप्रकारे असणार यांची स्पष्टता देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या घोषणापत्राचा मसुदा मान्य केला आहे.
- 'ब्रेक्जिट' प्रक्रियेमधून ग्रेटब्रिटन (UK) यूरोपीय संघातून (EU) बाहेर पडणार आहे.
- युरोपिय संघ हा 28 सदस्य राज्यांचा राजकीय आणि आर्थिक संघ आहे, जे प्रामुख्याने युरोप खंडात आहेत.
- युरोपिय संघाची स्थापना 1 नोव्हेंबर 1993 रोजी झाली आणि याचे मुख्यालय बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्स येथे आहे.
- लिस्बन करारामधील कलम 50 लागू करीत ब्रिटन 29 मार्च2019 पर्यंत EU च्या आर्थिक विभागातून बाहेर पडणार आहे.
- ब्रिटन (ग्रेट ब्रिटन/यूनाइटेड किंगडम/यूके/बर्तानिया) हा युरोप खंडाच्या वायव्येकडे असलेला एक संयुक्त बेटराष्ट्र आहे.
- ज्यामध्ये स्कॉटलँड, वेल्स आणि इंग्लंड तसेच उत्तिर आयरलँड या प्रदेशांचा समावेश आहे.
- लंडन हे राजधानी शहर आहे आणि पाउण्ड स्टर्लिंग (GBP) हे अधिकृत चलन आहे.

## ❖ ऑस्ट्रेलियाचे 'व्हिजन 2035 फॉर इंडिया' दस्तऐवज



- दि. 23 नोव्हेंबर 2018 रोजी ऑस्ट्रेलियाच्या सरकारने 'व्हिजन 2035 फॉर इंडिया' शीर्षकाखाली तयार केलेल्या दस्तऐवजात नमूद कृतींची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.
- भारताचे राष्ट्रपती राम नाथ कोविंद ऑस्ट्रेलियाच्या दौर्यानवर आहेत. या दरम्यान यासंबंधी घोषणा केली गेली.
- भारताशी द्वैपक्षीय संबंध सुधारण्यासाठी ऑस्ट्रेलियाने आपला दृष्टीकोन जाहीर केला आहे.
- "इंडिया इकनॉमिक सर्व्हे" याच्या अंमलबजावणीची घोषणा देखील करण्यात आली आहे.
- भारत-ऑस्ट्रेलिया अन्न भागीदारी, खनिकर्म व्यवसायाचा विस्तार आणि हवाई संपर्क वाढविण्यासाठी पुढील बारा महिन्यांत सर्वेक्षणासंबंधी काही महत्त्वाच्या शिफारशी लागू करण्यास ऑस्ट्रेलिया सहमत आहे.
- शिवाय, खनिकर्म, विज्ञान व तंत्रज्ञान, कृषी संशोधन आणि शिक्षण अश्या क्षेत्रांमध्ये सहकार्यासाठी पाच करारांवर स्वाक्षर्या् करण्यात आल्या आहेत.
- ऑस्ट्रेलिया हा ऑस्ट्रेलियाच्या राष्ट्रकुल दक्षिण गोलार्धाच्या खंडाच्या अंतर्गत असलेला एक देश आहे.
- जो जगातला सर्वात छोटा खंड आहे आणि जगातला सर्वात मोठा बेट देखील आहे.
- जो हिंद व प्रशांत महासागरात पसरलेला आहे.
- ऑस्ट्रेलिया हा एकमेव असा प्रदेश आहे, जो एक खंड, एक राष्ट्र आणि एक बेट आहे.
- कॅनबेरा हे राजधानी शहर तर ऑस्ट्रेलियन डॉलर हे राष्ट्रीय चलन आहे.

## ❖ संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'वैश्विक शाश्वत शहरे 2025' पुढाकारासाठी नोएडा, ग्रेटर नोएडाची निवड



- संयुक्त राष्ट्रसंघाकडून 'वैश्विक शाश्वत शहरे 2025' (Global Sustainable Cities 2025) पुढाकारासाठी नोएडा, ग्रेटर नोएडा या शहरांची निवड करण्यात आली आहे.
- या पुढाकाराच्या अंतर्गत ही शहरे दुसर्या शहरांशी स्पर्धा करणार आहे.
- राष्ट्रीय राजधानी लगतच्या या दोन शहरांना "युनिव्हर्सिटी सिटी" श्रेणीमध्ये निवडले गेले आहे.
- शिवाय मुंबई आणि बेंगळुरू ही दोन शहरे भारतामधील एकमेव आमंत्रित शहरे आहेत.
- संयुक्त राष्ट्रसंघ (UN) वैश्विक शाश्वत विकास उद्दिष्टे शहरे पुढाकाराद्वारे (UN Global Sustainable Development Goals (SDG) cities initiative) पाच विभागांमध्ये जगभरातल्या एकूण 25 शहरांची निवड करण्यात आली आहे.
- आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ (UN) या आंतरसरकारी संघटनेची स्थापना करण्यात आली.

- दुसर्या महायुद्धानंतर दिनांक 24 ऑक्टोबर 1945 रोजी या संघटनेची स्थापना करण्यात आली.
- सध्या या संघटनेचे जगभरात 193 सदस्य देश आहेत.
- UN चे मुख्यालय मॅनहॅटन (न्यूयॉर्क शहर, अमेरिका) येथे आहे.
- संयुक्त राष्ट्रसंघ आमसभा (UNGA) हे संयुक्त राष्ट्रसंघामधील सहा प्रमुख अंगांपैकी एक आहे, ज्यामध्ये सर्व सदस्य राष्ट्रांना समान प्रतिनिधित्वाचा हक्क दिला गेला आहे.

## ❖ भारत आणि चीन यांनी DTAAमध्ये दुरूस्ती केली



- भारत आणि चीन या देशांनी उत्पन्नावरील कर आणि महसूल चुकवेगिरीला प्रतिबंध करण्यासंदर्भात त्यांच्यामधील दुहेरी कर टाळण्यासंबंधी करारामध्ये (DTAA) दुरूस्ती केली आहे.
- कर संबंधित माहितीचे देवाणघेवाण करण्यास दुहेरी कर टाळण्यासंबंधी करार (DTAA) केला जातो.

- भारताचा 88 देशांसोबत DTAA झालेला आहे, त्यापैकी 85 कार्यान्वित आहेत.
- या करारामधून कराचे दर आणि कायदे ठरवले गेले आहेत, जे दुसर्‍ी देशात उत्पन्न घेणार्याआ नागरिकाला दुहेरी कर देण्यापासून वाचवते.
- त्यासाठी ‘भारतीय आयकर अधिनियम-1961’ अंतर्गत कलम 90 व कलम 91 अश्या दोन तरतुदी आहेत.
- चीन हा जगाच्या मध्यभागी वसलेला एक आशियाई देश आहे.
- हा जगातला सर्वांत जास्त लोकसंख्या असलेला देश आहे.
- भूप्रदेशाच्या आकारानुसार, चीन (क्षेत्रफळ सुमारे 96 लक्ष चौरस किलोमीटर) जगातला दुसरा सर्वात मोठा देश आहे.
- बिजींग ही देशाची राजधानी असून रेन्मिन्बी (CNY) हे राष्ट्रीय चलन आहे.

## ❖ नैरोबीमध्ये ‘शाश्वत नील अर्थव्यवस्था परिषद 2018’ संपन्न

- केनियाच्या नैरोबी शहरात ‘शाश्वत नील अर्थव्यवस्था परिषद 2018’ भरविण्यात आली आहे.
- कॅनडा आणि जपानच्या सहाय्याने केनियाकडून ही दि. 28 नोव्हेंबर 2018 रोजी सुरू झालेली दोन दिवसीय परिषद आयोजित केली गेली.
- परिषदेत भारत सरकारचे केंद्रीय जलवाहतूक, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले.



- त्यांच्या माहितीप्रमाणे –
- भारत शाश्वत, सर्वसमावेशी आणि लोककेंद्रीत पद्धतीने नील अर्थव्यवस्था साध्य करण्यासाठी 'इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA)'च्या कार्यचौकटी अंतर्गत कार्य करीत आहे.
- नील अर्थव्यवस्था (ब्लू इकॉनॉमी) हा भारताच्या आर्थिक विकासाचा धोरणाचा एक महत्त्वाचा मुद्दा आहे आणि देशाचा 95% हून अधिक व्यापार समुद्रामार्गे चालविला जात आहे.
- भारत सरकारचा 'SAGAR ('सिक्युरिटी अँड ग्रोथ फॉर ऑल इन द रीजन' / प्रदेशातील सर्वांसाठी सुरक्षा व विकास)' हा दृष्टीकोन भारताच्या 'अॅक्ट ईस्ट' धोरणाशी संबंधित आहे.
- देशाच्या राजनैतिक, आर्थिक आणि लष्करी आराखड्याशी संबंधित आहे.
- जलवाहतुक आणि बंदरांच्या विकासाला चालना देणार्यार भारत सरकारच्या महत्वाकांक्षी 'सागरमाला' कार्यक्रमाच्या अंतर्गत 600 हून जास्त प्रकल्पांची ओळख पटविण्यात आली आहे.
- त्यात 2020 सालापर्यंत $120 अब्ज (सुमारे 8 लक्ष कोटी रुपये) इतकी गुंतवणूक केली जाणार आहे. ज्यामुळे मालवाहतूकीच्या खर्चात दरवर्षी $6 अब्जची बचत होईल.

## ❖ 2050 सालापर्यंत युरोपीय संघाने 'कार्बन उत्सर्जन विरहित' होण्याचे उद्दिष्ट ठेवले




- कार्बनचे उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि 2050 सालापर्यंत संपूर्ण युरोपीय संघाला 'कार्बन उत्सर्जन विरहित' प्रदेश बनविण्यासाठी युरोपीय संघाने एक महत्वाकांक्षी योजना तयार केली आहे.
- EUने प्रदेशामधील सर्व सरकार, व्यवसाय, नागरिक आणि क्षेत्रांना या योजनेत सामील होण्याची विनंती केली आहे. माहितीनुसार, जर युरोपने आपले वर्तमान लक्ष्य राखले, तर ते 2015 पॅरिस कराराच्या अंतर्गत दिलेले वचन पूर्ण करू शकणार नाही.
- कारण ते 2050 सालाच्या अखेरीपर्यंत निव्वळ कार्बन उत्सर्जन केवळ 60% नी कमी करेल. त्यामुळे नव्या योजनेनुसार 2030 सालापूर्वी हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात 40% नी घट होण्याची अपेक्षा आहे, तसेच 2050 सालापर्यंत "हवामान तटस्थता (climate neutral) प्राप्त युरोप" बनण्याचे लक्ष्य ठेवले गेले आहे.
- युरोपीय संघ (EU) हा 28 सदस्य राज्यांचा राजकीय आणि आर्थिक संघ आहे, जे प्रामुख्याने युरोप खंडात आहेत.
- युरोपीय संघाची स्थापना 1 नोव्हेंबर 1993 रोजी झाली आणि याचे मुख्यालय बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्स येथे आहे.

### ❑ 2015 पॅरिस हवामान करार –

- हा हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे, परिस्थितीशी जूळवून घेण्यासाठी आणि आर्थिक बाबी हाताळण्यासाठी युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज (UNFCCC) या संघटनेच्या कार्यचौकटीत तयार करण्यात आलेला आणि 2020 साली लागू होणारा एकमेव असा (पहिलाच) करार आहे.
- कराराला दि. 12 डिसेंबर 2015 रोजी पॅरिसमध्ये झालेल्या UNFCCC च्या 21 व्या पक्षीय परिषदेत 195 देशांमधील प्रतिनिधींद्वारा एकमताने अंगिकारले गेले.

# ७. आर्थिक घडामोडी



## ❖ जीसीएफकडून भारताला ४३.४ दशलक्ष डॉलर्सचा निधी

- ग्रीन क्लायमेट फंडने (जीसीएफ) भारतीय किनारपट्टीच्या भागात राहणाऱ्या समुदायांना हवामान बदलांचा सामना करण्यासाठी ४३.४ दशलक्ष डॉलर्सचा निधी मंजूर केला आहे.
- जीसीएफद्वारे निधी दिले जाणारे हा प्रकल्प बहू-आयामी आहे. या प्रकल्पांतर्गतआंध्रप्रदेश, महाराष्ट्र आणि ओडिशा राज्यांमधील संवेदनशील भागांवर लक्ष केंद्रित केले जाईल.
- या राज्यांमध्ये हवामान बदलांनुसार तेथील समुदायांना घडविण्यासाठी आणि हरित वायू उत्सर्जनामध्ये घट करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. याव्यतिरिक्त स्थानिक समुदायाच्या उपजीविकेची व्यवस्थादेखील केली जाईल.
- या प्रकल्पाला युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्रामद्वारेही (यूएनडीपी) मदत करण्यात येईल.
- या प्रकल्पाअंतर्गत १५ हजार हेक्टर क्षेत्रात मँग्रूव्ह, कोरल रीफ, सीग्रास आणि क्षारयुक्त दलदलींच्या संवार्धांसाठी कार्य करण्यात येईल. यासाठी स्थानिक युवकांना शास्त्रज्ञांसोबत काम करण्यासाठी प्रशिक्षित केले जाईल.
- तसेच स्थानिक लोकांना हवामान बदलाबद्दल आणि याबाबतच्या धोक्यांबद्दल प्रशिक्षण आणि सार्वजनिक शिक्षण कार्यक्रमाद्वारे जागरुक केले जाईल.
- या प्रकल्पाद्वारे स्थानिक समुदायाला हवामान-अनुकूल उपजीविकेची साधने मिळतील आणि हरित वायूंचे उत्सर्जन कमी होण्यास मदत मिळेल..
- यामुळे पर्यावरणातील कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनामध्ये ३.५ दशलक्ष टनांची घट होईल. पॅरिस कराराचे ध्येय आणि २०३०साठीची शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हे अत्यंत उपयुक्त ठरेल.
- पार्श्वभूमी:-
- भारताची किनारपट्टी हवामान बदलांच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील आहे.
- अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागराच्या क्षेत्रात हवामान बदलांच्या विपरीत परिणाम होऊन चक्रीवादळांसारख्या नैसर्गिक आपत्तींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.
- भारतात अंदाजे ६,७४० चौकिमी मँग्रूव्ह वनाचे क्षेत्र आहे. परंतु मवणी हस्तक्षेपामुळे यात ५० टक्के घट झाली आहे.
- येत्या काळात वाढत्या पाण्याच्या पातळीमुळे यात आणखी घट होण्याची शक्यता आहे.

## ❖ ‘सेबी’ कंपन्यांव्दारे ठेवणार बाजारावर नजर




- बेकायदेशीर मार्गांनी पैसा गोळा करणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी सेबी (सिक्युरिटीज अँठण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) आता विप्रो, एल अँड टी इंफोटेकसह इतर सात कंपन्यांची मदत घेणार आहे.
- सेबी विप्रो, एल अँड टी इंफोटेकसह इतर सात कंपन्यांच्या मदतीने बाजारावर नजर ठेवणार आहे.
- तर इतर कंपन्यांमध्ये एसेंचर सोल्युशन, कॅपजेमिनी टेक्नॉलॉजी सर्व्हिसेज इंडिया, हेलवेट पेकार्ड एंटरप्रायजेस (इंडिया), ईआईटी सर्व्हिसेज इंडिया आणि तरावू टेक्नॉलाजीचा समावेश आहे.
- सेबीची या कंपन्यांच्या मदतीनं डेटा स्टोरेज क्लाऊड, ब्रोकर्सवर नजर ठेवून आकलन करणे, विश्लेषण क्षमतेचा विस्तार करण्याची इच्छा आहे.
- या कंपन्यांमुळे सेबीला डाटा मायनिंग (माहिती हुडकून काढणे), हेरगिरीची साधने विकसित करण्यासह सायबर हल्ले रोखण्यास मदत मिळणार आहे.
- तसेच नोंदणीकृत कंपन्यांच्या अधिग्रहण सौद्यात छोट्या गुंतवणूकदारांना शेअर्सचे योग्य मूल्य मिळावे, यासाठी सेबीने या कंपन्यांची मदत घेण्याचे ठरविले आहे.
- तसेच नवीन प्रवर्तकांमार्फत छोट्या गुंतवणूकदारांना दिल्या जाणाऱ्या मूल्यांबाबत स्वतंत्रपणे आकलन केले जाणार आहे.

## ❖ अधिकाधिक भारतीय श्रीमंत होत आहेत, परंतु असमानता अजूनही आहे: ग्लोबल वेल्थ रिपोर्ट

- क्रेडिट सुइस या संस्थेनी प्रसिद्ध केलेल्या ‘ग्लोबल वेल्थ रिपोर्ट 2018’ या अहवालानुसार, अलिकडच्या काही वर्षांत भारतीय श्रीमंत बनले आहेत, तर अतिश्रीमंत लोकांची संख्या कमी आहे.
- याउलट, जगाच्या तुलनेत भारतात आर्थिकदृष्ट्या उच्च असमानता आढळून आली आहे. या सर्वेक्षणात 5 अब्ज प्रौढांच्या संपत्तीचे विश्लेषन केले गेले.




### ❑ भारताविषयी -

- प्रत्येक 10 भारतीयांपैकी केवळ एकाची संपत्ती $10,000 पेक्षा अधिक आहे.
- प्रत्येक व्यक्तीची सरासरी वैयक्तिक संपत्ती गेल्या काही वर्षांत वाढली आहे, परंतु वाढीचा दर कमी झाला आहे.
- अलिकडच्या काळात बिगर-आर्थिक मालमत्तेत स्थिरपणे वाढ झाली आहे, परंतु घरगुती कर्जात वाढ झाली आहे.
- भारतामधील दर प्रौढ व्यक्तीकडे सरासरी $1,289 एवढी संपत्ती आहे, जी $4,209 या जागतिक सरासरीपेक्षा बरीच कमी आहे.
- भारताच्या बाबतीत उच्च ‘गिनी कोईफिशिएंट’ आहे. म्हणजेच अधिक असमानतेसह गरीब देशांपैकी एक असा याचा अर्थ होतो.

- 'गिनी कोईफिशिएंट' हे असमानतेचे प्रमाण आहे, त्यात '0' म्हणजे लोकसंख्येत एकूणच समानता आहे आणि '100' म्हणजे पूर्ण असमानता आहे.
- जागतिक दृष्य -
- देशनिहाय एकूण संपत्तीच्या बाबतीत प्रथम क्रमांक अमेरिकेचा लागतो आहे. त्यानंतर चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे.
- जून 2018 पर्यंत गेल्या 12 महिन्यांच्या कालावधीत एकूण जागतिक संपत्तीमध्ये $14 लक्ष कोटी (ट्रिलियन) एवढी वाढ होऊन ती $317 लक्ष कोटी एवढी झाली आहे, म्हणजेच संपत्तीचा वृद्धीदर 4.6% इतका होता.
- दर प्रौढामागे सरासरी संपत्तीच्या बाबतीत, स्वित्झर्लंड ($530,240) प्रथम स्थानी आहे. त्यानंतर ऑस्ट्रेलिया ($411,060) आणि अमेरिका ($403,970) यांचा क्रम लागतो.
- जागतिक संपत्तीमध्ये स्त्रियांचा वाटा लक्षणीय असून तो त्यांच्याकडे 40% जागतिक संपत्ती आहे.

## ❖ अतिरिक्त भांडवलाशी संबंधित समस्यांच्या निराकरणासाठी RBIची तज्ञ समिती




- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (RBI) मंडळाने केंद्रीय बँकेसह 9.69 लक्ष कोटी रुपयांच्या अतिरिक्त भांडवलाशी संबंधित समस्यांचे परीक्षण करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.
- सूक्ष्म, लघु व मध्यम क्षेत्रातील बुडीत मालमत्तेच्या पुनर्रचनेसाठी एक योजना तयार करण्यासाठी सल्ला देण्यासाठीच्या हेतूने ही समिती तयार करण्यात आली आहे.
- याशिवाय, RBI ने दिनांक 22 नोव्हेंबर 2018 रोजी सरकारी समभागांच्या खरेदी प्रणालीमधून 8,000 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे.
- भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) ही भारतातील केंद्रीय बँकिंग संस्था आहे, जी भारतीय रुपया चलनाचे आर्थिक धोरण नियंत्रित करते.
- भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, 1934 च्या उपबंधानुसार ब्रिटिश राजवटीत संस्थेचे 1 एप्रिल 1935 पासून कार्य सुरू झाले.
- मूळ भागभांडवलाची प्रत्येकी 100 समभागामध्ये विभागणी झालेली आहे, जे की सुरुवातीला खाजगी भागधारकांच्या पूर्णपणे मालकीचे होते.
- 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताच्या स्वातंत्र्यानंतर, RBI चे 1 जानेवारी 1949 रोजी राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

## ❖ वाणिज्य मंत्रालयाकडे औद्योगिक पार्क क्रमवारीता संबंधी प्रणाली बाबत अहवाल सादर




- केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयापुढे औद्योगिक पार्क क्रमवारीता संबंधी प्रणाली बाबत अहवाल सादर केला गेला आहे.
- हा अहवाल औद्योगिक धोरण व जाहिरात विभागाने (DIPP) तयार केला आहे.
- औद्योगिक पार्कमधील राज्ये आणि 3994 औद्योगिक समुहांमधील पायाभूत सुविधेच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी हा अभ्यास केला गेला आहे.
- हा अहवाल अंतर्गत पायाभूत सुविधा; बाह्य पायाभूत सुविधा; व्यवसाय सेवा आणि सुविधा आणि पर्यावरण; सुरक्षा व्यवस्थापन या चार घटकांवर आधारित आहे.
- भारत उत्पादन क्षेत्रात जागतिक बँकेच्या व्यवसाय सुलभीकरण (EoDB 2019) या क्रमवारीतेमध्ये 190 देशांमध्ये 77 या क्रमांकावर आहे.
- या क्रमवारीतेमध्ये भारताला प्रथम 50मध्ये स्थान मिळवून देण्यासाठी मंत्रालयाने त्यासंबंधी यावेळी अभ्यास केला आहे.

## ❖ झारखंडमधील वीज प्रणाली सुधारण्यासाठी जागतिक बँकेकडून $310 दशलक्षची मदत

THE WORLD BANK

- झारखंड वीज व्यवस्था सुधारणा प्रकल्पासाठी भारत सरकारचा जागतिक बँकेशी $ 310 दशलक्ष इतक्या रकमेचा एक कर्ज करार झाला आहे.
- झारखंड राज्यामधील नागरिकांना विश्वसनीय, दर्जेदार आणि परवडणारी चोवीस तास वीज पुरवण्यासाठी हा प्रकल्प राबवला जाणार आहे.
- या मदतीने वीजेसंबंधी पायाभूत सुविधा तसेच अन्य घटकांच्या विकासास सहाय्य प्राप्त झाले आहे.
- हा प्रकल्प 2014 साली सुरू करण्यात आलेल्या भारत सरकारच्या ‘सर्वांसाठी वीज’ कार्यक्रमाचा एक भाग आहे.
- झारखंड राज्यात ताज्या आकडेवारीनुसार सर्व नागरिकांमध्ये 80% हून अधिक नागरिकांना वीज उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- आता सर्वांना चोवीस तास अखंड पुरवठा देण्याच्या उद्देशाने प्रयत्न चालवले जात आहेत.
- जागतिक बँक (WB) ही भांडवल पुरविण्यासाठी विकसनशील देशांना कर्ज देणारी एक आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था आहे.
- जागतिक बँक हा संयुक्त राष्ट्रसंघ प्रणालीचा एक भाग आहे.
- अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन, डी.सी. येथे जागतिक बँकेचे मुख्यालय आहे.


- यामध्ये आंतरराष्ट्रीय पुनर्रचना आणि विकास बँक (International Bank for Reconstruction and Development- IBRD) आणि आंतरराष्ट्रीय विकास महामंडळ (International Development Association -IDA), अश्या दोन संस्थांचा समावेश आहे.
- आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि तीन इतर संस्थांसह जागतिक बँकेची स्थापना 1944 सालच्या ब्रेटोन वूड्स परिषदेत करण्यात आली.

## ❖ बिहारमधील महामार्गांच्या विकासासाठी ADB सोबत $200 दशलक्षचा कर्ज करार




- बिहारमधील राज्य महामार्गांमध्ये सुधारणा करण्यासाठी भारत सरकारने आशियाई विकास बँक (ADB) सोबत $200 दशलक्षचा करार केला आहे.
- हा निधी सुमारे 230 किलोमीटरचा रस्ता विस्तारण्यास आणि सर्वकाळ हवामानासंबंधी मानकांवर आधारित सुधारणा करण्यासाठी वापरला जाणार आहे.
- 2008 सालापासून आतापर्यंत ADB ने 1,453 किलोमीटरच्या राज्य महामार्गांना सुधारण्यासाठी आणि पटनाजवळ गंगा नदीवर नवीन पूल उभारण्यासाठी बिहारला $1.43 अब्जचे कर्जे दिले आहे.
- आशियाई विकास बँक (ADB) ही एक क्षेत्रीय विकास बँक आहे, ज्याची स्थापना दि. 19 डिसेंबर 1966 रोजी आशियाई देशांमधील आर्थिक विकास प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्यासाठी केली गेली.
- मंडालुयोंग (फिलीपिन्स) येथे याचे मुख्यालय आहे.
- “फाइटींग पॉव्हर्टी इन एशिया अँड द पॅसिफिक” हे ADB चे घोषवाक्य आहे.
- याचे 67 देश सदस्य आहेत.

## ❖ “पैसा”: बँक कर्जावर व्याज अनुदान देण्याच्या प्रक्रियेसाठी केंद्रीकृत इलेक्ट्रॉनिक व्यासपीठ




- ❑ दिनदयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान (DAY - NULM) अंतर्गत लाभार्थ्यांना मिळणार्याउ बँक कर्जावरील व्याज अनुदानाची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एक केंद्रीकृत इलेक्ट्रॉनिक व्यासपीठ तयार करण्यात आले आहे.
- "पोर्टल फॉर अफोर्डेबल क्रेडिट अँड इंट्रेस्ट सबव्हेंशन अ‍ॅक्सेस (PAiSA / पैसा)” नावाचे हे संकेतस्थळ आधारित व्यासपीठ अलाहाबाद बँकेनी तयार केले आहे.

- या व्यासपीठाचा लाभ लहान उद्योजकांना मिळणार आहे. सर्व 35 राज्ये/केंद्रशासित प्रदेश आणि सर्व अनुसूचित व्यवसायिक बँका, क्षेत्रीय ग्रामीण बँका आणि सहकारी बँका या व्यासपीठाशी जुळण्याची अपेक्षा आहे.
- शहरी दारिद्र्य निर्मूलनाकरिता आणि कामाच्या संधी प्रदान करण्यासाठी स्वयंरोजगार व कौशल्य प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने, 23 सप्टेंबर 2013 रोजी भारत सरकारच्या गृह व शहरी दारिद्र्य निर्मूलन मंत्रालयाकडून राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान (NULM) सुरू करण्यात आले.
- ही योजना 'स्वर्ण जयंती शहरी रोजगार' योजनेच्या जागी आणली गेली.
- या साली याचे नाव बदलून 'दिनदयाल अंत्योदय योजना- राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान (DAY-NULM)' असे ठेवण्यात आले.
- वर्तमानात ही योजना सर्व वैधानिक 4,041 शहरे आणि गावांमध्ये लागू आहे.

# ८. क्रीडा



## ❖ विराट कोहली सर्वात जलद १० हजार धावा करणारा खेळाडू

- भारतीय संघाचा कर्णधार विराट कोहलीने एकदिवसीय क्रिकेट सामन्यांमध्ये सर्वात जलद १० हजार धावांचा टप्पा ओलांडण्याचा विक्रम केला आहे.
- वेस्ट इंडीजविरुद्ध दुसऱ्या वन-डे सामन्यात विराटने ही कामगिरी केली. विराटने या सामन्यात १२९ चेंडूत १५७ धावा केल्या.
- यापूर्वी सचिनने तेंडूलकरने सर्वात जलद म्हणजे २५९ डावांमध्ये हा टप्पा गाठला होता. मात्र विराटने केवळ २०५ डावांमध्ये हा पराक्रम केला.
- विराट कोहलीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये आतापर्यंत ३६ शतके आणि ४९ अर्धशतके झळकावली आहेत. विराटने आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीत आतापर्यंत ६० शतके झळकाविलेली आहेत.
- १० हजार धावांचा टप्पा पूर्ण करणारा कोहली ५वा भारतीय आणि जगातील १३वा फलंदाज ठरला आहे.यापूर्वी भारताकडून सचिन तेंडुलकर, सौरभ गांगुली, राहुल द्रविड आणि महेंद्रसिंह धोनीया चारच फलंदाजांनी हा धावांचा टप्पा पार केला आहे.
- याशिवाय विराट पदार्पणानंतर सर्वात कमी काळात १० हजार धावा करणारा फलंदाजहीबनला आहे. यापूर्वी हा विक्रम राहुल द्रविडच्या नावावर होता.
- द्रविडने पदार्पणानंतर १० वर्षे ३१७ दिवसांत १० हजार रन पूर्ण केले होते. विराटने १० वर्षे ६७ दिवसांत हा विक्रम रचला.
- विराट कोहली कर्णधार म्हणून ८ हजार आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण करणारा पहिला फलंदाजही बनला आहे.

### ❑ १० हजार धावांचा पल्ला गाठणारे खेळाडू:-

- सचिन तेंडूलकर (भारत): १८ हजार ४२६ धावा
- कुमार संगकारा (श्रीलंका): १४ हजार २३४ धावा
- रिकी पॉण्टींग (ऑस्ट्रेलिया): १३ हजार ७०४ धावा
- सनथ जयसुर्या (श्रीलंका): १३ हजार ४३० धावा
- महेला जयवर्धने (श्रीलंका): १२ हजार ६५० धावा
- इंजमाम उल हक (पाकिस्तान): ११ हजार ७३९ धावा
- जॅक कॅलिस (द. आफ्रिका): ११ हजार ५७९ धावा
- सौरभ गांगुली (भारत): ११ हजार ३६३ धावा
- राहुल द्रविड (भारत): १० हजार ८८९ धावा
- ब्रायन लारा (वेस्ट इंडिज): १० हजार ४०५ धावा
- तिलकरत्ने दिलशान (श्रीलंका): १० हजार २९० धावा
- महेंद्र सिंग धोनी (भारत): १० हजार १२३ धावा (निवृत्त झालेला नाही)



## ❖ लुईस हॅमिल्टनने मर्सिडीजला 'कन्स्ट्रक्टर्स चॅम्पियनशिप' मिळवून दिले



- मर्सिडीजचा चालक लेविस हॅमिल्टनने साओ पावलो येथे झालेल्या '2018 ब्राझिलियन ग्रँड प्रिक्स' या शर्यतीचे जेतेपद पटकावले आहे.
- या विजयाने मर्सिडीज संघाने सलग पाचव्या हंगामासाठी 'कन्स्ट्रक्टर्स चॅम्पियनशिप' जिंकले आहे.
- हॅमिल्टनचे हे कारकिर्दीतील 72वे जेतेपद आहे. रेड बुलच्या मॅक्स व्हर्स्टापेनने शर्यतीचे दुसरे आणि फेरारीच्या किमी रायकोनेनने रेड बुलच्या डॅनियल रिकार्डोला मागे टाकत तिसरे स्थान मिळविले.
- फॉर्म्युला वन वर्ल्ड कन्स्ट्रक्टर्स चॅम्पियनशिप (WCC) हा किताब पॅरिस (फ्रान्स) येथील आंतरराष्ट्रीय ऑटोमोबाइल महासंघाने (FIA) हंगामात सर्वाधिक यशस्वी ठरलेल्या फॉर्म्युला वन कन्स्ट्रक्टरला (म्हणजेच संघाला) दिला जातो.
- त्यासाठी ग्रँड प्रिक्सच्या परिणामांवर आधारीत गुणांवरून ठरवले जाते.
- कन्स्ट्रक्टर्स चॅम्पियनशिप हा किताब पहिल्यांदा 1958 साली वॅनवॉल या संघाला बहाल करण्यात आला.

## ❖ बांग्लादेशाचा BKSP संघ: 'सुब्रतो चषक 2018' या आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेचा विजेता

- नवी दिल्लीत खेळल्या गेलेल्या कनिष्ठ मुलांच्या 59व्या 'सुब्रतो चषक' या आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेचा अंतिम सामना बांग्लादेशाच्या बांग्लादेश क्रिडा शिक्षा प्रतिष्ठान (BKSP) या संघाने जिंकलेला आहे.
- BKSP संघाने अंतिम सामन्यात अफगाणिस्तानाच्या अमिनी स्कूल या संघाचा पराभव करून सुब्रतो चषक आपल्या नावे करून घेतला आहे.




- या क्रिडास्पर्धेत एकूण 95 संघांचा सहभाग होता.
- अफगाणिस्तान, बांग्लादेश आणि नेपाळ या तीन देशांमधून 8 संघांनी या खेळात भाग घेतला होता.
- स्पर्धेचे पुरस्कार विजेते -
- सर्वोत्कृष्ट गोलरक्षक - प्रणब लिंबू (सरकारी वरिष्ठ माध्यमिक शाळा, सिक्किम)
- सर्वोत्कृष्ट खेळाडू - मोहम्मद नेमिल (रिलायन्स फाऊंडेशन स्कूल, मुंबई)
- फेयर प्ले ट्रॉफी - रिलायन्स फाऊंडेशन स्कूल, मुंबई

## ❖ मेरी कोमची सहाव्यांदा विश्व अजिंक्यपदाला गवसणी

- सुपरस्टार एम. सी. मेरी कोम हीने आपल्या सहाव्यांदा जगज्जेतेपदाला गवसणी घातली आहे.
- 48 किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत खेळत असताना मेरी कोमने युक्रेनच्या एच.ओखोटोचा पराभव करत विजेतेपदावर आपलं नाव कोरलं.



- विश्व अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेच्या अंतिम फेरीत मेरीने युक्रेनच्या हॅना ओखोटाला 5-0 असे पराभूत करत जेतेपदाला गवसणी घातली आणि इतिहास रचला.
- मेरीने तब्बल 16 वर्षांपूर्वी या स्पर्धेत पहिले जेतेपद पटकावले होते.
- तसेच मेरी आता 35 वर्षांची आहे आणि तिचे हे सहावे जेतेपद ठरले आहे.
- मेरीने 2001, 2002, 2005, 2006, 2008, 2010 या वर्षांमध्ये यापूर्वी जेतेपद पटकावले होते.

## ❖ तालबद्ध जिम्नॅस्टिक विश्वचषक स्पर्धेत दिपा कर्मकारला व्हॉल्ट प्रकारात कांस्यपदक



- भारताची महिला जिम्नॅस्ट दिपा कर्मकार हिने जर्मनीत कोटबस शहरात 'FIG तालबद्ध (कलात्मक) जिम्नॅस्टिक विश्वचषक 2018' स्पर्धेत व्हॉल्ट प्रकारात कांस्यपदक पटकावले आहे.
- कर्मकार हिने 14.316 गुण मिळवत हे पदक प्राप्त केले आणि ती आता 2020 टोकियो ऑलंपिकसाठी आठ-कार्यक्रम पात्रता प्रणालीचा एक भाग आहे.
- स्पर्धेच्या या प्रकारात ब्राझीलच्या रेबेका अँड्राडेने सुवर्णपदक जिंकले तर अमेरिकेच्या जेड केरीने रौप्यपदक मिळविले आहे.
- आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक महासंघ (FIG) ही स्पर्धात्मक जिम्नॅस्टिक या क्रिडा प्रकाराची एक प्रशासन संस्था आहे.
- याचे मुख्यालय लॉसन (स्वित्झर्लंड) शहरात आहे.
- महासंघाची दिनांक 23 जुलै 1881 रोजी स्थापना करण्यात आली आणि ती सध्या अस्तित्वात असलेली जगातली सर्वात जुनी आंतरराष्ट्रीय क्रिडा संस्था ठरलेली आहे.
- त्यांनी 1975 साली पहिल्यांदा तालबद्ध (कलात्मक) जिम्नॅस्टिक स्पर्धेचे आयोजन केले होते.

## ❖ ऑस्ट्रेलिया: टी-20 महिला विश्वचषकचा विजेता




- अँटीगुआ आणि बारबूडा या कॅरेबियन राष्ट्राच्या अँटीगुआ बेटावर खेळल्या गेलेल्या 'ICC टी-20 महिला विश्वचषक 2018' या स्पर्धेचे विजेतेपद ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाने पटकावले आहे.
- ऑस्ट्रेलियाने चौथ्यांदा टी-20 विश्वचषक जिंकला आहे.
- ऑस्ट्रेलियाने अंतिम सामन्यात इंग्लंडचा पराभव केला.
- या विश्वचषकात ऑस्ट्रेलियाच्या अलिसा हेली हिला मालिकेतला सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार देण्यात आला.

- तर आपल्या पत्नीप्रमाणेच पती मिशेल स्टार्कनेही 2015 सालच्या विश्वचषक स्पर्धेच्या मालिकेतला सर्वोकृष्ट खेळाडूचा पुरस्कार पटकावला होता.
- टी-20 विश्वचषक स्पर्धांमध्ये एखाद्या दांपत्याने मालिकेतला सर्वोकृष्ट खेळाडूचा पुरस्कार मिळवण्याची ही क्रिकेट इतिहासातली पहिलीच घटना आहे.

## ❖ समीर वर्मा: सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेचा विजेता




- लखनऊ शहरात खेळल्या गेलेल्या 'सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय अजिंक्यपद 2018' या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकल गटाचे विजेतेपद भारताच्या समीर वर्माने जिंकले आहे.
- अंतिम लढतीत समीरने चीनच्या ल्यु गाऊंग्झुचा पराभव केला.
- स्पर्धेच्या इतर गटाचे विजेते -
- महिला एकल गट - हान यूए (चीन)
- पुरुष दुहेरी गट - फजर अल्फीन आणि मुहम्मद रेन आर्डियांटो (इंडोनेशिया)
- महिला दुहेरी गट - चाउ मी कुआन आणि ली मेंग यीन (मलेशिया)
- मिश्र गट - ओउ जुआनई आणि फेंग झ्यूइंग (चीन)
- 'सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन अजिंक्यपद ही दरवर्षी भारतात खेळली जाणारी एक आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धा आहे.
- ही लखनऊ शहरात खेळली जाते.
- 2011 साली ही स्पर्धा BWF ग्रँड प्रिक्स गोल्ड टूर्नामेंट म्हणून बदलण्यात आली.

# ९. विज्ञान आणि तंत्रज्ञान



## ❖ ट्रेन-१८: भारताची पहिली इंजिनाविना धावणारी ट्रेन




- भारतात पहिल्या इंजिनाविना धावणाऱ्या ट्रेनची निर्मिती करण्यात आली असून, या ट्रेनची चाचणी २९ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे.
- ट्रेन-१८ असे या ट्रेनचे नामकरण करण्यात आले आहे. ती संपूर्णपणे संगणकीकृत असून, बुलेट ट्रेनच्या धर्तीवर ही ट्रेन विकसित करण्यात आली आहे.
- या ट्रेनची बांधणी चेन्नई इंटिग्रल कोच फॅक्टरीमध्ये करण्यात आली आहे. ही ट्रेन बनवण्यासाठी सुमारे १०० कोटी रुपये खर्च आला आहे. अशी ट्रेन परदेशातून आयात केली असती तर सुमारे १७० कोटी रुपये खर्च आला असता.
- तिच्या बांधणीसाठी दीड वर्षाचा कालावधी लागला. या ट्रेनमध्ये १६ एसी आणि २ एक्झिक्युटिव्ह क्लासचे डबे असतील.
- प्रवाशांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असणारी स्वदेशी बांधणीची ही हायस्पीड ट्रेन ताशी १६० ते २०० किमी वेग गाठू शकते.
- या ट्रेनमध्ये दिव्यांग प्रवाशांसाठी विशेष असे दोन बाथरूम आणि बेबी केअरसाठी विशेष स्थान देण्यात आले आहे.
- तसेच ट्रेनच्या कोचमध्ये खास स्पेनमधून मागवण्यात आलेल्या सीट बसवण्यात आल्या आहे. या सीटचे वैशिष्ट्य म्हणजे या सीट पूर्ण ३६० अंशांमध्ये वळू शकतात.
- आणीबाणीच्या परिस्थितीत ट्रेनच्या ड्रायव्हरशी संवाद साधता यावा यासाठी टॉकबॅक सुविधाही देण्यात आली आहे.
- मुरादाबाद-बरेली आणि कोटा-सवाई माधोपूर या रेल्वे मार्गांवर या ट्रेनची चाचणी होणार आहे. त्यानंतर देशातील प्रमुख रेल्वे मार्गांवर ही ट्रेन धावणार आहे.
- ही ट्रेन ३० वर्षे जुन्या शताब्दी एक्स्प्रेसची जागा घेईल अशी आशा आहे. सध्या शताब्दी एक्स्प्रेस २० मार्गांवर धावते. ती मेट्रो शहरांना इतर प्रमुख शहरांशी जोडते.


## ❖ २०२०पासून भारतात बीएस-४ वाहनांची विक्री बंद

- सर्वोच्च न्यायालयाने १ एप्रिल २०२०पासून भारतात भारत स्टेज-४ म्हणजेच बीएस-४ या वाहनांची विक्री बंद करण्याचा आदेश दिला आहे.
- या वाहनांना पर्याय म्हणून १ एप्रिल २०२०नंतर बीएस-६ प्रकारच्या इंजिनाचा वापर करावा लागणार आहे.



- बीएस-६ इंजिन असलेली वाहने पर्यावरणासाठी कमी हानिकारक असतात. यांच्या वापरासाठी देशभरात बीएस-६ इंधनही उपलब्ध करून दिले जाणार आहे.
- भारत स्टेज उत्सर्जन मानक:-
- इंग्रजी: Bharat Stage Emission Standards (BSES)
- बीएस अर्थात भारत स्टेज हे भारत सरकारद्वारे निश्चित करण्यात आलेले वाहनांमधील इंधनाचे एक उत्सर्जन मानक आहे.
- या उत्सर्जन मानकांमध्ये वाहनांमुळे होणाऱ्या वायू प्रदुषणाच्या प्रमाणाची निश्चित व्याख्या करण्यात आली आहे.
- भारतात सन २०००मध्ये पहिल्यांदाच हे मानक लागू करण्यात आले होते. भारत स्टेज लागू झाल्यानंतर सर्व वाहनांना या मानकांच्या आधीन राहणे बंधनकारक आहे.
- ऑक्टोबर २०१०मध्ये देशात भारत स्टेज-३ लागू करण्यात आले होते. तर बीएस-४ मानक २०१७मध्ये संपूर्ण देशात लागू करण्यात आले होते.
- वाढत्या प्रदुषणाला आळा घालण्यासाठी सरकारने २०१६मध्ये घोषणा केली होती की, बीएस-५ मानकांऐवजी २०२०पर्यंत संपूर्ण देशात बीएस-६ मानक लागू केले जाईल.

## ❖ "शक्ती": IIT मद्रासने विकसित केलेली स्वदेशी 'मायक्रोप्रोसेसर' चिप



- भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) मद्रास येथील संशोधकांनी संपूर्णपणे पहिले स्वदेशी बनावटीचे 'मायक्रोप्रोसेसर' (इलेक्ट्रॉनिक चीप) विकसित केले आहे.
- या मायक्रोप्रोसेसरला 'शक्ती (SHAKTI)' हे नाव देण्यात आले आहे.
- त्यांनी सहा औद्योगिक क्षेत्रात मानक ठरणार्याS 'फॅमिली ऑफ सिक्स' प्रकारच्या मायक्रोप्रोसेसरसमधली पहिली इलेक्ट्रॉनिक चिप विकसित केली आहे.
- या मायक्रोप्रोसेसरची मायक्रोचीप भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (ISRO) चंदीगड येथील प्रयोगशाळेत तयार करण्यात आली आहे.
- 'प्रोजेक्ट शक्ती' अंतर्गत विकसित या चिपला 'शक्ती' तसेच 'RISECREEK' हे नाव देण्यात आले आहे.
- ही 'फॅमिली ऑफ सिक्स' प्रकारच्या मायक्रोप्रोसेसरसमधल्या 'C क्लास' या श्रेणीतली चिप आहे. अमेरिकेच्या ओरेगॉनमधील इंटेल कंपनीच्या सुविधेत 300 चिपसह पहिल्या तुकडीची निर्मिती करण्यात आली आहे.
- भारताचे मायक्रोप्रोसेसर इतरांद्वारे स्वीकारले जाऊ शकतात, कारण हे डिझाइन 'ओपन सोर्स' पद्धतीचे आहे.


- ते ऊर्जेचा पुरेपूर वापर करतात आणि 'अॅडव्हांस्ड RISC मशीन्स (ARM) मधील 'कॉर्टेक्स A5' यासारख्या आंतरराष्ट्रीय चिपशी स्पर्धा करते. भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रातील हे महत्वपूर्ण यश असून यामुळे परदेशी मायक्रोप्रोसेसरवरील अवलंबित्व कमी होणार असून सायबर हल्ल्याचा धोकाही कमी होईल.
- या चीपचा उपयोग भारतीय उपग्रहांमध्ये आणि संरक्षण उपकरणांमध्ये होऊ शकतो. तसेच ही चीप मोबाइल, कॅमेरा आणि स्मार्ट मीटर्स आदी उपकरणांमध्ये वापरली जाऊ शकणार.

## ❖ ISRO 2023 साली शुक्र ग्रहाचा अभ्यास करण्यासाठी अंतराळ मोहीम पाठवणार



- भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनी (ISRO) 2023 साली शुक्र ग्रहाचा अभ्यास करण्यासाठी अंतराळ मोहीम पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.
- ISROच्या या द्वितीय आंतरग्रहीय मोहिमेमधून शुक्रावर थर्मल कॅमेरा, मास स्पेक्ट्रोमिटर आणि क्लाउड मॉनिटरिंग कॅमेरासह एकूण 12 वैज्ञानिक प्रयोग पाठविण्याची योजना आहे.
- आकार, वस्तुमान, घनता, संरचना आणि गुरुत्वाकर्षण या घटकांच्या समानतेमुळे शुक्र ग्रह पृथ्वीची "जुळी बहीण" असल्याचे मानले जाते.
- या मोहिमेत पृष्ठभाग, वातावरणाची रासायनिक संरचना आणि सौर विकिरण वा सौर पवन या घटकांचा अभ्यास केला जाणार.
- भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) ही भारत सरकारची प्रमुख अंतराळ संस्था आहे. याचे बंगळुरू येथे मुख्यालय आहे.
- 1962 साली स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि शास्त्रज्ञ विक्रम साराभाई यांच्या प्रयत्नांमुळे, 15 ऑगस्ट 1969 रोजी स्थापित ISRO ने 1962 साली स्थापन झालेल्या इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रीसर्च (INCOSPAR) ला बदलले.
- ही संस्था विज्ञान विभागाकडून व्यवस्थापित केली जाते.
- ISRO चा पहिला उपग्रह 'आर्यभट्ट' 19 एप्रिल 1975 रोजी सोव्हिएत संघाने प्रक्षेपित केला.
- 1980 साली, भारतीय बनावटीचे प्रक्षेपक SLV-2 द्वारे 'रोहिणी' हा उपग्रह पहिल्यांदा प्रक्षेपित करण्यात आला.
- 22 ऑक्टोबर 2008 रोजी भारताची 'चंद्रयान-1' मोहीम यशस्वी झाली आणि चंद्रावर पोहचणारा भारत हा जगातला चौथा देश बनला.
- त्यानंतर 'मार्स ऑर्बिटर मिशन (MOM)' ने 24 सप्टेंबर 2014 रोजी यशस्वीरित्या मंगळ ग्रहाच्या कक्षेत प्रवेश केला आणि पहिल्याच प्रयत्नात मंगळ ग्रहाच्या कक्षेत यशस्वीपणे पोहोचणारा पहिला देश ठरला.

## ❖ NASAची 'राल्फ' मोहीम गुरु ग्रहाच्या 'ट्रोजन' लघुग्रहाला भेट देणार



- नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस अॅडमिनिस्ट्रेशन (NASA) याच्या 'न्यू होरीझन्स मिशन' अंतराळयानाने 'राल्फ' या शोधक उपकरणाला गुरु ग्रहाच्या कक्षेत पाठवले गेले आहे आणि योजनेनुसार हे उपकरण सन 2021 मध्ये लुसी मिशनच्या अंतर्गत गुरुच्या 'ट्रोजन' या लघुग्रहाला भेट देणार आहे.
- 2006 साली 'न्यू होरीझन्स' अंतराळयान पाठवले गेले आणि त्यावरील 'राल्फ' या शोधक प्रयोगाने अनेक शोध घेतले आहेत.
- राल्फ ही प्लूटो आणि त्याच्या चंद्राला भेट देणारी पहिली मोहीम होती.
- नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस अॅडमिनिस्ट्रेशन (NASA) ही संयुक्त राज्य अमेरिकेची (UAS) एक सरकारी शाखा आहे, जी देशाच्या सार्वजनिक अंतराळ कार्यक्रमांचे आयोजन करण्यास आणि हवाई उड्डाणशास्त्र व अंतराळ संशोधनासाठी जबाबदार आहे.
- NASA ची स्थापना 19 जुलै 1948 रोजी नॅशनल अॅडवायजरी कमिटी फॉर एरोनॉटिक्स (NCA) याच्या जागी केली गेली होती.
- या संस्थेने 1 ऑक्टोबर 1948 पासून कार्य करण्यास सुरुवात केली.


## ❖ ISROचे GSAT-29 दळणवळण उपग्रह



- दिनांक 14 नोव्हेंबर 2018 रोजी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेकडून (ISRO) आंध्रप्रदेशाच्या श्रीहरिकोटा तळावरून 3,423 किलोग्राम वजनी GSAT-29 दळणवळण उपग्रहाला अवकाशात पाठविण्यात आले आहे.
- चार टन भार वाहून नेण्याची क्षमता असणार्याश GSLV-Mk 3-D2 अग्निबाणाच्या सहाय्याने उपग्रहाला पृथ्वीपासून 36,000 किमी अंतरावर भूस्थिर कक्षेत पाठवले जात आहे.
- उपग्रहाद्वारे Ka/Ku-बँड हाय थ्रुपुट कम्युनिकेशन ट्रांसपॉन्डर पाठविण्यात आले आहे, ज्यामुळे डोंगराळ आणि दुर्गम भागात वापरकर्त्यांना उच्च-गती संपर्क सेवा पुरविण्यासाठी मदत मिळणार.
- भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) ही भारत सरकारची प्रमुख अंतराळ संस्था आहे.
- याचे बंगळुरू येथे मुख्यालय आहे.
- 1962 साली स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि शास्त्रज्ञ विक्रम साराभाई यांच्या प्रयत्नांमुळे, 15 ऑगस्ट 1969 रोजी स्थापित ISRO ने 1962 साली स्थापन झालेल्या इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रीसर्च (INCOSPAR) ला बदलले.
- ही संस्था विज्ञान विभागाकडून व्यवस्थापित केली जाते. ISRO चा पहिला उपग्रह 'आर्यभट्ट' 19 एप्रिल 1975 रोजी सोव्हिएत संघाने प्रक्षेपित केला.

- 1980 साली, भारतीय बनावटीचे प्रक्षेपक SLV-2 द्वारे 'रोहिणी' हा उपग्रह पहिल्यांदा प्रक्षेपित करण्यात आला.
- 22 ऑक्टोबर 2008 रोजी भारताची 'चंद्रयान-1' मोहीम यशस्वी झाली आणि चंद्रावर पोहचणारा भारत हा जगातला चौथा देश बनला.
- त्यानंतर 'मार्स ऑर्बिटर मिशन (MOM)' ने 24 सप्टेंबर 2014 रोजी यशस्वीरित्या मंगळ ग्रहाच्या कक्षेत प्रवेश केला आणि पहिल्याच प्रयत्नात मंगळ ग्रहाच्या कक्षेत यशस्वीपणे पोहोचणारा पहिला देश ठरला.

## ❖ मंगळावर रोव्हर गाडी उतरवण्यासाठी जेझिरो विवराची निवड





- नासाने 2020 मध्ये मंगळावर रोव्हर गाडी उतरवण्याचे ठरवले असून त्यासाठी 3.6 अब्ज वर्षांपूर्वीच्या जुन्या विवराची जागा निश्चित करण्यात आली आहे.
- 19 नोव्हेंबर रोजी याबाबतची घोषण करण्यात आली असून जेथे ही रोव्हर गाडी उतरवली जाणार आहे, त्या विवराचे नाव जेझिरो असे आहे.
- पाच वर्षे शोध घेतल्यानंतर मंगळावरील साठ ठिकाणांतून या विवराची निवड रोव्हर गाडी उतरवण्यासाठी करण्यात आली.
- जुलै 2020 मध्ये ही रोव्हर गाडी मंगळावर पाठवली जाणार असून त्यासाठी ठिकाण निवडण्यासाठी मंगळ मोहिमेतील चमूने चर्चा केली.
- मंगळावर पूर्वी असलेल्या जीवसृष्टीचे पुरावे गोळा करणे हा या मोहिमेचा उद्देश असून तेथे सूक्ष्मजीवांचे अस्तित्व शोधण्यासाठी मातीचे नमुने गोळा करण्यात येणार आहेत.
- नासा व युरोपीयन स्पेस एजन्सी यांनी मंगळावरील मातीचे नमुने गोळा करून ते पृथ्वीवर आणण्याचे निश्चित केले असून त्यासाठी ठिकाण निश्चित केले आहे.
- नासाचे मोहीम संचालक थॉमस झुरबुशेन यांनी सांगितले, की जेझिरो विवर हे भूगर्भशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाचे असून ते 3.6 अब्ज वर्षांपूर्वीचे असल्याने त्याच्या संशोधनातून ग्रहांची निर्मिती व खगोलजीवशास्त्रातील काही बाबींवर प्रकाश पडणार आहे.
- एका विशिष्ट ठिकाणचे नमुने गोळा करण्याने मंगळाबाबत विचारात क्रांतिकारक बदल होणार आहे.
- जेझिरो विवर हे मंगळाच्या विषुववृत्ताच्या उत्तरेकडे इसिडीस प्लॅनिशिया या पठाराच्या पश्चिम कडेला आहे.
- इसिडिस भाग हा जुना व मंगळाबाबत महत्त्वाची माहिती देऊ शकणारा आहे.

## ❖ पूरपरिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी IMDने एक तंत्रज्ञान विकसित केले



- भारत हवामानशास्त्र विभागाने (IMD) पावसाळयात जलाशयातली पाण्याची पातळी तपासण्यासाठी आणि पूरपरिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी 'इंपॅक्ट बेस्ड फोरकास्टिंग अॅप्रोच' नावाचे तंत्रज्ञान विकसित केले आहे.
- पावसामुळे नद्या आणि जलाशयातील पाण्याची पातळी वाढते.
- हवामानातल्या बदलांमुळे केरळमध्ये अलीकडेच आलेल्या पूरानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीला पाहता, भविष्यात अश्या परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे.
- उद्भवणार्यार परिस्थितीला सांभाळण्यासाठी याची राज्य सरकारांना मदत होणार आहे.
- भारत हवामानशास्त्र विभाग (IMD) हा भारत सरकारच्या भूशास्त्र मंत्रालयाची एक संस्था आहे.
- याची स्थापना सन 1875 मध्ये हेन्री फ्रान्सिस ब्लॅनफोर्ड यांनी केली होती.
- याचे मुख्यालय नवी दिल्लीत आहे.

## ❖ तापमान वाढीला मर्यादित करण्यास स्ट्रॅटोस्फेरिक एरोसोल इंजेक्शन तंत्र काम करू शकणार: एक अभ्यास




- काही संशोधकांच्या मते, स्ट्रॅटोस्फेरिक एरोसोल इंजेक्शन (SAI) हे भू-अभियांत्रिकी तंत्र हवामानातील बदलांमुळे वाढत्या तापमानाला मर्यादित करण्यास मदत करू शकते. मात्र अद्याप ही एक अप्रमाणित आणि काल्पनिक कल्पना आहे.
- स्ट्रॅटोस्फेरिक एरोसोल इंजेक्शन (SAI) या तंत्रामधून पृथ्वीच्या वातावरणाच्या वरच्या थरात सूर्यप्रकाशाला रोखणारी रसायने फवारणी केली जाते.
- यासाठी मोठ्या प्रमाणात सल्फेट कणांचा वापर केला जाऊ शकतो. मात्र अमेरिकेच्या हार्वर्ड विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या अभ्यासानुसार, हे तंत्र वापरण्यास 15 वर्षांच्या कालावधीत दरवर्षी सुमारे $2.25 अब्ज एवढा खर्च येऊ शकतो.
- ओझोन हा वातावरणात मुख्यत: दोन थरांमध्ये आढळतो. जमिनीपासून 10-16 किमीपर्यंतचा वातावरणाचा थर म्हणजे तपांबर (troposphere) आणि त्यावरील 50 किमीचा थर हा स्थितांबर (stratosphere) म्हणून ओळखला जातो.
- ओझोनचे प्रमाण विषुववृत्तीय प्रदेशावर कमी तर ध्रुवीय प्रदेशांवर सर्वाधिक असते.
- ओझोन हा हरितगृह वायू (greenhouse gas) असल्यामुळे तो तपांबराचे व पृथ्वीच्या पृष्ठभागाचे तापमान वाढविण्यासही कारणीभूत होऊ शकतो.
- स्थितांबरातील (stratosphere) ओझोन सूर्यकिरणांतील अतिनील (ultraviolet or UV) किरणांना पृथ्वीच्या पृष्ठभागावर येण्यापासून थोपवतो.

## ❖ 'पिग्मी फॉल्स कॅटशार्क': भारतात आढळलेली शार्कची नवीन प्रजाती



- उत्तर हिंद महासागरात खोल समुद्रात शार्कची एक नवीन प्रजाती आढळली आहे.
- या नव्या प्रजातीला 'पिग्मी फॉल्स कॅटशार्क' हे नाव देण्यात आले आहे. त्याचे वैज्ञानिक नाव 'प्लॅनोनासूस इंडिकस' हे आहे.
- 'पिग्मी फॉल्स कॅटशार्क' समुद्रात 200-1000 मीटर खोलीत आढळून आली आहे.
- त्यांची लांबी 65 सेंटीमीटर एवढी आहे. त्यांचा रंग गडद तपकिरी आहे व त्यात कोणतीही समरूपता नाही.
- मुंबईचे सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च इन्स्टिट्यूट (CMFRI) येथील संशोधक के. व्ही. अखिलेश यांचा समावेश असलेल्या अमेरिका आणि जर्मनीच्या शास्त्रज्ञांच्या चमूने ही नवीन प्रजाती भारताच्या दक्षिण-पश्चिम किनारपट्टी आणि श्रीलंकेच्या उत्तरेस शोधली आहे.
- 2011 साली भारतीय क्षेत्रात मंगलोर हाऊंडशार्क आढळले होते.
- त्यानंतर आता पहिल्यांदाच ही नवी प्रजाती आढळली आहे.

## ❖ नासाचे 'इनसाइट' अंतराळयान लाल ग्रहवर उतरले



- अमेरिकेच्या नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस अॅडमिनिस्ट्रेशन (NASA) या अंतराळ संस्थेचे 'इनसाइट (इंटेरियर एक्सप्लोरेशन युजींग सिस्मिक इंव्हेस्टिगेशंस)' हे अंतराळयान दि. 26 नोव्हेंबर 2018 रोजी लाल ग्रह म्हणजेच मंगळ ग्रहावर यशस्वीपणे उतरले.
- 'इनसाइट' 300 दशलक्ष मैल (482 दशलक्ष किलोमीटर) अंतर कापत सहा महिन्यांचा प्रवास करीत अखेरीस मंगळावर पोहचले.
- 1976 सालच्या 'वायकींग' मोहिमेपासून आतापर्यंतची नासाची ही आठवी यशस्वी मंगळ मोहीम आहे.
- 2012 साली नासाने पाठविलेले 'क्यूरिओसिटी रोव्हर' अजूनही मंगळावर कार्यरत आहे.
- जर्मनीच्या नेतृत्वाखाली $1 अब्जच्या या आंतरराष्ट्रीय मोहीमेमध्ये ग्रहाच्या पृष्ठभागाखालील उष्णतेचे मोजमाप करण्यासाठी पहिल्यांदाच 16 फूट (5 मीटर) इतक्या खोलीपर्यंत खोदकाम केले जाणार आहे.
- शिवाय यात भूकंपाची मोजणी करण्यासाठी फ्रान्सने तयार केलेले सिस्मोमीटर देखील बसविण्यात आले आहे.

## ❖ हायसिस (PSLV-C43): ISROचा अत्याधुनिक पृथ्वी निरीक्षण उपग्रह



- भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (ISRO) दि. 29 नोव्हेंबर 2018 रोजी ‘PSLV-C43’ या प्रक्षेपकाद्वारे एकाचवेळी 31 उपग्रहांना अवकाशात यशस्वीपणे पाठवले आहे.
- आंध्रप्रदेशातील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अवकाश तळावरुन हे प्रक्षेपण केले गेले. हे PSLVचे 45वे उड्डाण होते.
- प्रक्षेपित केलेल्या उपग्रहांमध्ये “हायसिस (हायपरस्पेक्ट्रल इमेजिंग सॅटलाइट -HysIS)” हा भारताचा अत्याधुनिक पृथ्वी निरीक्षण उपग्रह आहे.
- अन्य उपग्रहांमध्ये अमेरिकेचे 23 तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, कोलंबिया, फिनलंड, मलेशिया, नेदरलंड आणि स्पेन यांचा प्रत्येकी एक असे एकूण 30 उपग्रह आहेत. कोलंबियाने पहिल्यांदाच स्वतःच्या उपग्रहाच्या प्रक्षेपणासाठी ISROची निवड केली आहे.
- भारताचा “हायसिस (हायपरस्पेक्ट्रल इमेजिंग सॅटलाइट -HysIS)” उपग्रह –
- 380 किलो वजनाच्या हायसिसच्या मदतीने पृथ्वीवरील जमीन, पाणी, वनस्पती आणि अन्य घटकांबाबत माहिती मिळवता येणार आहे.
- शिवाय प्रदूषणाची माहिती देखील हा उपग्रह पुरविणार आहे.
- हायसिसचे आयुष्य पाच वर्षांचे असणार आहे.

### ❑ भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) –

- ही भारत सरकारची प्रमुख अंतराळ संस्था आहे.
- याचे बंगळुरू येथे मुख्यालय आहे.
- 1962 साली स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि शास्त्रज्ञ विक्रम साराभाई यांच्या प्रयत्नांमुळे, 15 ऑगस्ट 1969 रोजी स्थापित ISRO ने 1962 साली स्थापन झालेल्या इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रीसर्च (INCOSPAR) ला बदलले.
- ही संस्था विज्ञान विभागाकडून व्यवस्थापित केली जाते.
- ISRO चा पहिला उपग्रह ‘आर्यभट्ट’ 19 एप्रिल 1975 रोजी सोव्हिएत संघाने प्रक्षेपित केला. 1980 साली, भारतीय बनावटीचे प्रक्षेपक SLV-2 द्वारे ‘रोहिणी’ हा उपग्रह पहिल्यांदा प्रक्षेपित करण्यात आला.
- 22 ऑक्टोबर 2008 रोजी भारताची ‘चंद्रयान-1’ मोहीम यशस्वी झाली आणि चंद्रावर पोहचणारा भारत हा जगातला चौथा देश बनला.
- त्यानंतर ‘मार्स ऑर्बिटर मिशन (MOM)’ ने 24 सप्टेंबर 2014 रोजी यशस्वीरित्या मंगळ ग्रहाच्या कक्षेत प्रवेश केला आणि पहिल्याच प्रयत्नात मंगळ ग्रहाच्या कक्षेत यशस्वीपणे पोहोचणारा पहिला देश ठरला.

# १०. व्यक्ती विशेष




## ❖ स्पायडरमॅन, आयर्नमॅनचा निर्माता 'स्टेन ली' कालवश




- जगप्रसिद्ध मार्वल कॉमिक्सचे जनक स्टेन ली यांचे 12 नोव्हेंबर रोजी निधन झाले.
- वयाच्या 95 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.
- स्पायडरमॅन, आयर्नमॅन, ब्लॅक पँथर, हल्क यांच्यासारख्या सुपरहिरोंच्या पात्रांची निर्मिती करणाऱ्या स्टेन ली यांच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते.
- अमेरिकेतील कॉमिक बुक संस्कृतीचा चेहरा अशी ली यांची ओळखहोती.
- स्टेन ली यांच्या मृत्यूची माहिती त्यांच्या मुलीने दिली. यानंतर अनेकांनी सोशल मीडियावर त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.
- ली यांचा जन्म 28 डिसेंबर 1922 रोजी न्यूयॉर्कमध्ये झाला होता.
- सन 1961 मध्ये त्यांनी द फॅन्टास्टिक फोरसोबत मार्वल कॉमिक्स सुरु केले. त्यानंतर यामध्ये स्पायडरमॅन, एक्स मॅन, हल्क, आयर्न मॅन, ब्लॅक पँथर आणि कॅप्टन अमेरिका यांसारख्या सुरपहिरोंच्या पात्रांचा समावेश झाला.
- स्टेन ली काही हॉलीवूड चित्रपटांमध्येदेखील दिसले होते.

## ❖ 1971 सालच्या भारत-पाक युद्धाचे नायक कुलदीप सिंग चंदपुरी यांचे निधन



- 1971 साली झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धात विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा असलेल्या ब्रिगेडियर (निवृत्त) कुलदीप सिंग चंदपुरी यांचे मोहालीत निधन झाले.
- ते 78 वर्षांचे होते.
- राजस्थान येथील लोगेंवाला सीमेवर पाकिस्तानकडून दिनांक 5 आणि 6 डिसेंबर 1971 रोजी मध्यरात्री हल्ला करण्यात आला होता.
- यावेळी पंजाब तुकडीचे नेतृत्व कुलदीप सिंग चंदपुरी यांनी केले होते.
- या युद्धात त्यांनी भारताला विजय मिळवून दिला होता.
- कुलदीप सिंग यांना त्यांच्या या शौर्यासाठी महावीरचक्राने सन्मानित करण्यात आले.

# ११. महत्वाचे दिवस



## ❖ 12 नोव्हेंबर: जागतिक न्यूमोनिया जनजागृती दिन

- वर्ष 2016 मध्ये जगभरात झालेल्या पाच वर्षांखालील बालकांच्या मृत्यूंपैकी 25 टक्के मृत्यू न्यूमोनिया आणि डायरियामुळे झाले होते. भारतात हे प्रमाण सर्वाधिक असल्याचे समोर आले आहे.
- न्यूमोनिया व डायरियामुळे सर्वाधिक बालमृत्यू होणाऱ्या 15 देशांचा अभ्यास अहवालात नुकताच प्रसिद्ध करण्यात आला. यातून ही बाब स्पष्ट झाली आहे.
- हे प्रमाण सर्वाधिक आढळणार्या देशांतील आरोग्यव्यवस्था असुरक्षित वर्गातील मुलांना उपचार पुरवण्यात असमर्थ असल्याचे या अहवालात म्हटले आहे.
- 12 नोव्हेंबर रोजी साजरा होणाऱ्या जागतिक न्यूमोनिया जनजागृती दिनाच्या पार्श्वभूमीवर 10वा न्यूमोनिया ॲण्ड डायरिया प्रोग्रेस रिपोर्ट जॉन्स हॉपकिन्स ब्लूमबर्ग स्कूल ऑफ पब्लिक हेल्थमधील इंटरनॅशनल व्हॅक्सिन ॲक्सेस सेंटरने नुकताच प्रसिद्ध केला.
- यात न्यूमोनिया व डायरिया आजारांनी सर्वाधिक बालमृत्यू होणाऱ्या 15 देशांतील न्युमोनिया आणि डायरिया प्रतिकारासंदर्भातील प्रगतीबाबत विवेचन करण्यात आले आहे.
- या आजारांमुळे होणारे मृत्यू टाळण्यासाठी उपायांमध्ये स्तनपान, लसीकरण, वैद्यकीय सेवेची उपलब्धता, प्रतिजैवकांचा वापर, ओरल रिहायड्रेशन सोल्युशन (ओआरएस) व झिंक पूरके देणे हे उपाय प्रभावी असल्याचे सिद्ध झाले आहे.
- लसीकरणाच्या व्याप्तीबाबत हे देश प्रगती करत असले, तरी लहान मुलांमधील आजारांवर उपचार करण्यात ते प्रचंड प्रमाणात कमी पडत आहेत, असे गेल्या दहा वर्षांपासून प्रसिद्ध होणाऱ्या अहवालात म्हटले आहे.
- विशेषत: दुर्गम भागात राहणार्यास, गरीब आणि मागास समुदायांतील मुलांना होणारे आजार हाताळण्यात हे देश कमी पडत आहेत.

## ❖ आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन: 16 नोव्हेंबर

- संयुक्त राष्ट्रसंघाकडून दरवर्षी 16 नोव्हेंबर या दिवशी 'आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन' (International Day for Tolerance) पाळला जातो.
- या दिनानिमित्त आयोजित एका समारंभात मॅनोन बार्बेऊ (कॅनडाचे चित्रपट निर्माता) आणि कोएक्जिस्ट इनिशिएटिव्ह (केनियाची सामाजिक संस्था) यांना यावर्षीचा 'सहिष्णुता आणि अहिंसा याला प्रोत्साहन देण्यासाठीचा UNESCO-मदनजीत सिंग पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

- यावेळी संयुक्त राष्ट्रसंघ सार्वजनिक माहिती (United Nations Department of Public Information) कडून ‘2018 यूट्यूब क्रिएटर्स फॉर चेंज’ या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले, ज्यामध्ये यूट्यूबचा वापर करणार्या’ निर्मात्यांकडून निर्मित निवडक आंतरराष्ट्रीय लघुपटांना प्रदर्शित करण्यात आले.




- जगभरात संस्कृती आणि लोक यांच्यात परस्पर समंजस्यता वाढवून सहिष्णुतेला बळ देण्याच्या उद्देशाने, दिनांक 16 नोव्हेंबर 1995 रोजी संयुक्त राष्ट्रसंघ शिक्षण, वैज्ञानिक आणि सांस्कृतीक संघटना (UNESCO) याच्या सदस्य राष्ट्रांनी ‘सहिष्णुतेसंबंधी तत्त्वांचे घोषणापत्र’ (Declaration of Principles on Tolerance) अंगिकारले होते.
- या घटनेच्या स्मृतीत, 1996 साली संयुक्त राष्ट्रसंघ महासभेने 16 नोव्हेंबर या दिवशी पहिला ‘आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन’ पाळला.
- 1995 हा साल ‘संयुक्त राष्ट्रसंघ सहिष्णुता वर्ष’ (United Nations Year for Tolerance) म्हणून पाळला गेला होता.
- संयुक्त राष्ट्रसंघाने जगात सहिष्णुता, सन्मान आणि प्रतिष्ठा राखण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ‘टुगेदर’ नावाची मोहीम सुरू केली आहे.
- ज्यामधून स्थलांतरित आणि शरणार्थी यांच्याबाबत असलेला नकारात्मक दृष्टिकोन बदलण्यासाठी कार्य केले जात आहे.

## ❖ राष्ट्रीय पत्र दिन: 16 नोव्हेंबर




- भारतीय पत्र परिषद (Press Council of India) कडून दरवर्षी 16 नोव्हेंबर हा दिवस ‘राष्ट्रीय पत्र दिन’ म्हणून पाळला जातो.
- यावर्षी या दिनानिमित्त वित्तमंत्री अरुण जेटली यांच्या हस्ते नवी दिल्लीत एका कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.
- या कार्यक्रमात विविध पुरस्कारांचे वाटप करण्यात आले आहे, ते म्हणजे –
- पत्रकारीतेमध्ये उत्कृष्टतेसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार – सी. के. प्रसाद (भारतीय पत्र परिषदेचे (PCI) अध्यक्ष)
- राजा राम मोहन रॉय पुरस्कार – एन. राम (हिंदू पब्लिशिंग ग्रुपचे अध्यक्ष)
- ग्रामीण पत्रकारीतेसाठीचा पुरस्कार - रुबी सरकार (देशबंधू, भोपाळ) आणि राजेश जोश (दैनिक पुढारी, रत्नागिरी).
- रीपोर्टर्स विदाउट बॉर्डर्स (RSF)च्या क्रमवारीतेनुसार, पत्रकारीतेच्या स्वातंत्र्याबाबतीत भारताचा 180 देशांमध्ये 138 हा क्रमांक आहे.
- याबाबतीत नॉर्वे हा सलग दुसऱ्या वर्षीही अग्रस्थानी आहे.

- भारतात 'पत्र परिषद' याची स्थापना सन 1956 मध्ये झाली, जे की देशातील पहिले पत्र आयोग होते.
- त्यानंतर दिनांक 16 नोव्हेंबर 1966 रोजी भारतीय पत्र परिषद (PCI) याची स्थापना करण्यात आली.
- स्थापना दिनाच्या निमित्ताने 'राष्ट्रीय पत्र दिन' (किंवा राष्ट्रीय प्रेस दिन किंवा राष्ट्रीय वृत्तसंस्था दिन किंवा राष्ट्रीय वृत्त दिन) पाळला जातो.

## ❖ 'कौमी एकता आठवडा': 19 नोव्हेंबर ते 25 नोव्हेंबर

- जातीय सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि मिश्र संस्कृती आणि राष्ट्रीय सद्भावना बाळगण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, देशात 19 नोव्हेंबर ते 25 नोव्हेंबर 2018 या काळात 'कौमी एकता आठवडा' (राष्ट्रीय एकता आठवडा) पाळला जात आहे.
- या काळात आयोजित केली जाणारी कार्यक्रमे -
- 19 नोव्हेंबर 2018 - राष्ट्रीय एकता दिन
- 20 नोव्हेंबर 2018 - अल्पसंख्यक कल्याण दिन
- 21 नोव्हेंबर 2018 - भाषिक सलोखा दिन
- 22 नोव्हेंबर 2018 - कमकुवत वर्ग दिन
- 23 नोव्हेंबर 2018 - सांस्कृतिक एकता दिन
- 24 नोव्हेंबर 2018 - महिला दिन
- 25 नोव्हेंबर 2018 - संवर्धन दिन



- केंद्रीय गृह मंत्रालयाच्या नॅशनल फाऊंडेशन फॉर कम्युनल हॉरमोनी (NFCH) या स्वायत्त संस्थेकडून 'कौमी एकता आठवडा'चे आयोजन केले जाते.
- या काळात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते आणि 25 नोव्हेंबरला 'जातीय सलोखा ध्वज दिन' पाळला जातो.

## ❖ जागतिक शौचालय दिन: 19 नोव्हेंबर




- दरवर्षी 19 नोव्हेंबर या दिवशी जागतिक शौचालय संघटनेच्या (World Toilet Organization-WTO) नेतृत्वात जगभरात 'जागतिक शौचालय दिन' पाळला जातो.
- यावर्षी हा दिन 'व्हेन नेचर कॉल्स' या संकल्पनेखाली पाळला गेला.
- दिनांक 19 नोव्हेंबर 2001 रोजी स्थापना करण्यात आलेल्या जागतिक शौचालय संघटनेचा स्थापना दिन 'जागतिक शौचालय दिन' म्हणून पाळण्याचा निर्णय घेण्यात आला.
- 145 देशांमध्ये केल्या गेलेल्या अभ्यासात असे आढळून आले आहे की, 58% अतिसार अस्वच्छतेमुळे होते.
- अतिसार या आजारामुळे 2015 साली पाच वर्षाखालील कमी वयाच्या 5,26,000+ बालकांचा मृत्यू झाला.
- यावर उपाय म्हणून शौचालयाला प्रोत्साहन दिले जात आहे.

- संघटनेने शौचालयांची असुविधा, त्यापासुन होणारे आजार आणि मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असणार्यास शौचालयाची समस्या संयुक्त राष्ट्रसंघापुढे मांडली.
- संयुक्त राष्ट्रसंघाने निश्चित केलेल्या 2030 शाश्वत विकास लक्ष्य 6 (SDG-6) अंतर्गत, 2013 साली शौचालयाला मानवाची महत्त्वाची गरज म्हणून तांत्रिक आणि कायदेशीर मान्यता दिली.
- जागतिक शौचालय संघटना (World Toilet Organization-WTO) ही एक आंतरराष्ट्रीय ना-नफा संस्था आहे.
- ही जगभरात स्वच्छता आणि शौचालय संदर्भात परिस्थितीत सुधारणेसाठी जबाबदार आहे.
- जॅक सिम यांनी WTO ची स्थापना दिनांक 19 नोव्हेंबर 2001 रोजी 15 सदस्य देशांसमवेत केली, जी आता 151 पर्यंत पोहचलेली आहे.
- संघटना जागतिक शौचालय परिषदेची आयोजक आहे.
- 2014 साली 18-20 नोव्हेंबर या काळात जगातला पहिला आंतरराष्ट्रीय शौचालय महोत्सव दिल्लीत आयोजित केला गेला होता.

## ❖ भारताचा संविधान दिन: 26 नोव्हेंबर




- भारताचा संविधान दिन (राष्ट्रीय विधी दिन) हा 26 नोव्हेंबर रोजी भारतभर साजरा केला जातो.
- या वर्षी 'बुद्धिष्ट असोसिएशन फॉर द ब्लाईंड', सावी फाऊंडेशन आणि स्वागत थोरत यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे पहिल्यांदाच ब्रेल लिपीत संविधान उपलब्ध केले जात आहे.
- अंध व्यक्तीसाठी संविधान ब्रेल लिपीत पाच भागांमध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
- दि. 29 ऑगस्ट 1947 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या राज्यघटनेच्या निर्मितीसाठी मसूदा समिती स्थापन झाली.
- अंतिम मसुदा दि. 26 नोव्हेंबर 1949 रोजी संविधान समितीने स्वीकारला.
- या घटनेचे राष्ट्रार्पण दि. 26 जानेवारी 1950 रोजी करण्यात आले.
- दि. 19 नोव्हेंबर 2015 रोजी भारत सरकारने एका अधिसूचनेद्वारे 26 नोव्हेंबरला संविधान दिन म्हणून घोषित केले.
- त्याआधी, 1979 सालापर्यंत हा दिन 'राष्ट्रीय विधी दिन' म्हणून पाळला जात होता.
- संसदीय लोकशाही, संघराज्यीय पद्धत, मुलभूत हक्क व त्यासाठी (न्यायालयीन यंत्रणा), मार्गदर्शक तत्त्वे, केंद्र राज्य संबंध, घटना दुरुस्ती ही संविधानातली प्रमुख अंगे आहेत.
- भारतीय संविधान धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविणाचा व सर्व नागरिकांस समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची शिकवण देते.
- भारतीय संविधानात 395 अनुच्छेद आहेत. यात मुळात 8 परिशिष्टे आणि आज 12 परिशिष्टे आहेत.
- ICS अधिकारी, ॲंग्लोइंडियन संस्थानिक, सरकारी सनदी नोकर या सर्वाबाबतबच्या तरतुदींचा यात समावेश आहे. यात अल्पसंख्यांक, अनुसूचित जाती, जमाती बाबत तरतुदी समाविष्ट आहेत.

# १२. MPSC-PSI-STI-ASO संभाव्य प्रश्न

1. कोणता देश 25वी 'DST-CII तंत्रज्ञान शिखर परिषद 2019' याचा भागीदार देश असणार?
अ. नेदरलँड्स
ब. जर्मनी
क. इटली
ड. चीन

2. कलकत्ता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून कोणाची नेमणूक झाली आहे?
अ. न्या. विजय कुमार बिस्त
ब. न्या. डी. बी. भोसले
क. न्या. संजय करोल
ड. न्या. देबाशिश कार गुप्ता

3. गुजरातमध्ये 'रो-पॅक्स' (रोल ऑन / ऑफ पॅसेंजर) फेरी सेवा सुरू करण्यात आली आहे?
अ. कांबे खाडी
ब. साबरमती नदी
क. तापी नदी
ड. औरंगा नदी

4. ऑक्टोबर 2018 मध्ये निधन झालेल्या दिल्लीच्या माजी मुख्यमंत्र्याचे नाव काय आहे?
अ. मदनलाल खुराणा
ब. सोमनाथ चटर्जी
क. कुंदन शाह
ड. यापैकी नाही

5. योग्य विधाने ओळखा
१. नवी दिल्लीत 'DST-CII भारत इटली तंत्रज्ञान शिखर परिषद 2018' याचे आयोजन करण्यात आले होते.
२. या परिषदेत नेदरलँड हा 25वी 'DST-CII भारत इटली तंत्रज्ञान शिखर परिषद' याचा भागीदार देश असणार अशी घोषणा करण्यात आली आहे.
३. या कार्यक्रमाचे आयोजन भारतीय उद्योग महासंघ (CII) आणि इटलीचे विज्ञान व तंत्रज्ञान विभाग हे एकत्रितपणे करतात.
ड. भारतीय उद्योग ही भारतातली एक व्यवसाय संघटना आहे. याची स्थापना 1895 साली झाली
अ. १ ब 3
ब. २ क ४
क. १ आणि २
ड. वरील सर्व

6. अयोग्य विधाने ओळखा
१. पाकिस्तानी कार्यकर्त्या मलाला यूसुफझाई यांना हार्वर्ड विद्यापीठाकडून 2018 सालचा ग्लीट्समन पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे जाहीर झाले आहे.
२. 2014 साली नोबेल शांती पुरस्काराने मालाला ना सन्मानित करण्यात आले होते.
३. जगभरातले जीवनमान सुधारण्यासाठी दिलेल्या योगदानासाठी व्यक्तीला हार्वर्ड विद्यापीठाकडूनग्लीट्समन पुरस्कार दिला जातो.
अ. फक्त १
ब. फक्त २
क. फक्त ३
ड. एकही नाही

7. योग्य विधाने ओळखा
१. जागतिक बँकेच्या उद्योगसुलभता क्रमवारीत भारताने ७७ क्रमांकावर स्थान मिळवले आहे.
२. जागतिक बँकेच्या २०१९च्या या अहवालातील ही क्रमवारी ठरवताना दिल्ली आणि मुंबई या दोन औद्योगिक वित्तीय शहरांचा विचार करण्यात आला आहे.
३. गेल्या वर्षी भारत १००व्या क्रमांकावर होता.
अ. १ आणि २
ब. २ आणि ३
क. फक्त १
ड. वरील सर्व

8. अयोग्य विधाने ओळखा
१. माजी भारतीय क्रिकेटपटू वंगिपुरापू व्यंकट साई लक्ष्मण यांचे “281 अँड बियॉन्ड” हे शीर्षक असलेले आत्मचरित्र प्रसिद्ध करण्यात आले आहे.
२. सुप्रसिद्ध संवादकार आर. कौशिक हे या पुस्तकाचे लेखक आहे
३. वेस्टलँड पब्लिकेशन्स हे प्रकाशक आहेत.
अ. फक्त १
ब. फक्त २
क. फक्त ३
ड. यापैकी नाही

9. योग्य विधाने ओळखा
१. भारतीय नौदलाने ‘डिप सबमर्जन्स रेस्क्यू’ जहाज (DSRV) सेवेत रूजू करून घेतले आहे. या जहाजावर सागरी क्षेत्रात बचाव यंत्रणा आणि संबंधित उपकरणे बसविण्यात आली आहेत.
२. हे जहाज (DSRV) सागरी क्षेत्रात 650 मीटरच्या खालीपर्यंत संकटात अडकलेल्या पाणबुडीमधील लोकांना वाचविण्यास सक्षम आहे.
३. हे जहाज ब्रिटनच्या जेम्स फिशेस डिफेन्स या कंपनीने तयार केले आहे.
अ. फक्त १
ब. फक्त २
क. फक्त ३
ड. १, २, ३

10. योग्य विधाने ओळखा
१. डॉ. उद्धव भोसले यांची नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती करण्यात आली आहे.
२. राज्यपाल तथा कुलपती चे. विद्यासागर राव यांनी एका आदेशानुसार डॉ. उद्धव भोसले यांची पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी ही नियुक्ती केली आहे.
अ. फक्त १
ब. फक्त २
क. १ आणि २ दोन्ही
ड. एकही नाही

11. खाली दिलेले घोषित करण्यात आलेले कोणते विधान MSME क्षेत्रासाठीच्या 'सपोर्ट अँड आऊटरीच' उपक्रमाचा भाग आहेत?
I. 59 मिनिटांमध्ये अ कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज मंजूर केले जाणार.
II. नव्या किंवा वाढीव कर्जाच्या व्याजात ब% सूट देण्यात येणार.
III. निर्यातकांना क-5% पर्यंत व्याजदरात सूट देण्यात आली आहे.
अचूक पर्याय निवडा
अ. I आणि II
ब. II आणि III
क. I आणि III
ड. वरील सर्व

12. कोणत्या भारतीय विमानतळाचे नाव 'वीर सुरेंद्र साई विमानतळ' असे बदलण्यात आले आहे?
अ. खजुराहो विमानतळ, मध्यप्रदेश
ब. धना विमानतळ , मध्यप्रदेश
क. झारसुगुडा विमानतळ , ओडिसा
ड. यापैकी नाही

13. कोणत्या समितीच्या शिफारशींच्या आधारावर 'कंपनी (दुरुस्ती) अध्यादेश-2018' तयार केला गेला आहे?
अ. इंजेती श्रीनिवास समिती
ब.अंजली भवरा समिती
क. उदय कोटक समिती
ड. राजीव बंसल समिती

14. कोणत्या देशाच्या निर्माती कंपनीने भारतीय नौदलाने सेवेत रूजू करून घेतलेले 'डिप सबमर्जन्स रेस्क्यू' जहाज (DSRV) पुरवले?
अ. अमेरिका
ब. ब्रिटन
क. फ्रान्स
ड. रशिया

15. कोणत्या देशाच्या मंत्रिमंडळाने परदेशी कामगारांना देशात काम करण्यास परवानगी देण्यासाठीच्या कायद्याला मान्यता दिली?
अ. जर्मनी
ब. संयुक्त राज्य अमेरिका
क. दक्षिण कोरिया
ड. जपान

16. कोणत्या राज्य सरकारने ‘INS विराट’ या युद्धनौकेचे वस्तुसंग्रहालयात रुपांतरीत करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे?
अ. गुजरात
ब. गोवा
क. महाराष्ट्र
ड. आंद्रप्रदेश

17. अयोग्य विधाने ओळखा
१. देशात मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी अअ नोव्हेंबर हा दिवस ‘राष्ट्रीय शिक्षण दिन’ म्हणून साजरा केला जातो.
२. मौलाना अब्दुल कलाम आझाद हे एक स्वातंत्र्य सेनानी आणि स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री होते.
३. त्यांनी अ5 ऑगस्ट 1947 ते ब फेब्रुवारी 1958 या काळात शिक्षण मंत्री म्हणून सेवा दिली.
अ. फक्त १
ब. फक्त २
क. फक्त ३
ड. एकही नाही

18. योग्य विधाने ओळखा
१. ‘पयीप्पदन चुंदन’ या संघाने केरळमधील ‘नेहरू ट्रॉफी बोट रेस 2018’ जिंकली
२. केरळची प्रसिद्ध बोट रेस 'वल्लमकली' या नावाने ओळखली जाते.
३ . केरळमध्ये नेहरू ट्रॉफी बोट रेसनंतर स्नेक बोटची सर्वात मोठी शर्यत ही आहे.
अ. फक्त १
ब. फक्त २
क. फक्त ३
ड. वरील सर्व

19. योग्य विधाने ओळखा
१. भारतीय कुस्तीपटू "बजरंग पुनिया" ६५ किलो वजनी गटात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी.
२. या वर्षात पाच पदके जिंकणाऱ्या २४ वर्षीय बजरंग पुनिया यूडब्ल्यूडब्ल्यूच्या यादीत ९६ गुणांसह प्रथम क्रमांकावर विराजमान आहे.
३. क्युबाचा एलेजांद्रो एनरिक व्लाडेस टोबियर ६६ गुणांसह दुसऱ्या स्थानावर विराजमान आहे.
४. रशियाचा अखमद चाकेइव ६२ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.
अ. १ आणि २
ब. २ आणि ३
क. १ आणि ४
ड. वरील सर्व

20. अयोग्य विधाने ओळखा
१.‘वैश्विक शीतकरण अभिनवता शिखर परिषद 2018’ नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली आहे
२. केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे ही परिषद भरविण्यात आली.
३. वातानुकूलित यंत्रणेच्या वाढत्या मागणीमुळे हवामानाला पोहचणारा धोका याबाबत या परिषदेत चर्चा चालवली
अ. १ आणि २
ब. २ आणि ३
क. फक्त ३
ड. एकही नाही

21. अयोग्य विधाने ओळखा
१.पश्चिम बंगाल राज्य सरकारने 15 नोव्हेंबर या तारखेला 'रोसोगोल्ला दिन' पाळण्याचा निर्णय घेतला आहे.
२. बंगालच्या प्रसिद्ध रसगुल्ला या मिष्ठान्नाला भौगोलिक संकेतांक (GI) टॅग प्राप्त झाला आहे.
३. त्याच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त हा दिन पाळण्याचा निर्णय घेतला गेला आहे.
अ. फक्त १
ब. फक्त २
क. फक्त ३
ड. एकही नाही

22. 5 नोव्हेंबर 2018 रोजी, 'प्रवासी रोपवे' प्रकल्पासाठी WAPCOS आणि डोपेलमायर यांनी सामंजस्य करार केला. त्या संदर्भात खालील विधाने विचारात घ्या:
I. WAPCOS 45 देशांमध्ये कार्यरत असलेली एक भारतीय बहुराष्ट्रीय संस्था आहे.
II. डोप्लेमेयर ही ऑस्ट्रियाची जगातली सर्वात मोठी रोपेवे निर्माता कंपनी आहे.
अचूक असलेले विधान ओळखा.
अ. केवळ १
ब. केवळ २
क. १ आणि २
ड. एकही नाही

23. कोणत्या भारतीय नेमबाजाने कुवेत येथे आठव्या आशियाई शॉटगन अजिंक्यपद स्पर्धेत जागतिक विक्रमी कामगिरीसह सुवर्णपदक पटकावले?
अ. एलव्हेनियल वलारिवांन
ब. हृदय हजारिका
क. आनंद वीर सिंग बाजवा
ड. मोहन राठोड

24. निवडणूक आयोगाने कोणत्या राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत 'संगवारी' मतदान केंद्राची स्थापना केली आहे?
अ. मध्यप्रदेश
ब. राजस्थान
क. मिझोराम
ड. छत्तीसगड

25. 8 नोव्हेंबर रोजी, केंद्रीय मंत्रिमंडळाकडून कोणता धोरणात्मक पेट्रोलियम साठा (SPR) भरण्यास परदेशाच्या राष्ट्रीय तेल कंपन्यांना मंजुरी दिली गेली?
अ. विशाखापट्टणम
ब. मंगलोर
क. पादुर
ड. यापैकी नाही

26. 8 नोव्हेंबर रोजी भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने कोणत्या सार्वजनिक क्षेत्रातल्या उपक्रमामधील संपूर्ण हिस्स्यामध्ये निर्गुंतवणूक करण्यास मंजुरी दिली?
अ. ONGC
ब. भारतीय विमानतळ प्राधिकरण
क. ड्रेजिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड
ड. यापैकी नाही

27. योग्य विधाने ओळखा
१. अशोक कुमार गुप्ता यांची भारतीय प्रतिस्पर्धा आयोगाचे (CCI) नवे अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
२. गुप्ता यांची सुधीर मितल यांच्या जागी नेमणूक करण्यात आली आहे.
३. स्पर्धा अधिनियम-2002 अंतर्गत स्थापित भारतीय प्रतिस्पर्धा आयोग (CCI) ही भारताची एक विनियामक संस्था आहे
४.याची अड ऑक्टोबर 2004 रोजी स्थापना करण्यात आली.
अ. १ ब ३
ब. २ क ४
क. १ ब ४
ड. वरील सर्व

28. योग्य विधाने ओळखा
१.फ्रान्समध्ये दोन ठिकाणी भारतीय युद्ध स्मारके उभारण्यात आले
२. दिनांक अअ नोव्हेंबरला उपराष्ट्रपती वेंकय्या नायडू यांच्या हस्ते स्मारकाचे अनावरण करण्यात आले.
३. अअ नोव्हेंबर 2018 रोजी प्रथम विश्वयुद्धाच्या समाप्तीला 100 वर्ष पूर्ण झालीत.
अ. फक्त १
ब. फक्त २
क. फक्त ३
ड. वरील सर्व

29. योग्य विधाने ओळखा..
१. केंद्रीय रसायने व खते तसेच संसदीय कामकाज मंत्री अनंत कुमार यांचे बेंगळूरूमध्ये निधन झाले. ते 59 वर्षांचे होते.
२. अनंत कुमार संयुक्त राष्ट्रसंघामध्ये (UN) कन्नड भाषेत बोलणारे प्रथम व्यक्ती होते.
३. ते 1998 साली अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळामधील सर्वात तरुण मंत्री होते.
४. कर्नाटकच्या दक्षिण बेंगळूरू मतदारसंघातून ते सहा वेळा संसदेवर निवडून आले.
अ. १ आणि २
ब. २ आणि ३
क. १ ब ४
ड. वरील सर्व

30. अयोग्य विधाने निवडा
१. आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघात (ITU-International Telecommunications Union) भारताची सदस्य म्हणून निवड करण्यात आली.
२. भारताचा कार्यकाल 2019-2022 असा असणार आहे
३. दुबई येथे पार पाडलेल्या ITU परिषदेत भारताची निवड करण्यात आली आहे
४. 1952 पासून भारत ITU चा नियमित सदस्य आहे
अ. फक्त १
ब. फक्त २
क. फक्त ३
ड. एकही नाही

31. योग्य विधाने ओळखा
१. आंध्रप्रदेश राज्यासाठी वेगळे उच्च न्यायालय स्थापन करण्यास सर्वोच्च न्यायालयाची मंजूरीअ जानेवारी 2019 पासून कार्यरत होणार आहे
२.हे देशातील 25 वे उच्च न्यायालय असेल
३. याचे मुख्यालय अमरावती येथे असेल
४. यापूर्वी तेलंगणा आणि आंध्रप्रदेश साठी हैद्राबाद उच्च न्यायालय होते
अ. १. २. ३
ब. २. ३. ४
क. १. ३. ४
ड. वरील सर्व

32. कोणाची भारतीय प्रतिस्पर्धा आयोगाचे (CCI) नवे अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली आहे?
अ. सुधीर मित्तल
ब. अशोक कुमार गुप्ता
क. एस.के भूषण
ड. दिनेश पाचोडी

33. कोणत्या मंत्रालयाच्या अंतर्गत भारतीय प्रतिस्पर्धा आयोग कार्य करते?
अ. वाणिज्य व उद्योग मंत्रालय
ब. वित्त मंत्रलय
क. कॉर्पोरेट कल्याण मंत्रालय
ड. यापैकी नाही

34. मानवी मेंदूप्रमाणे चालणार्याय जगातल्या सर्वात मोठ्या महासंगणकाचे नाव काय आहे?
अ. SpiNNaker
ब. फास्टइन्फिनिटी
क. लुसी अ
ड. यापैकी नाही

35. कोणत्या बॅडमिंटनपटूने ‘चीन ओपन 2018’ ही क्रिडास्पर्धा जिंकली?
अ. चाउ तियान चेन
ब. केंटा मोमोटा
क. अंटोनियो डस्क
ड. फिझो किएमा

36. कोणती अंतराळ संस्था 3D मॅट्रिक्समध्ये मानवी पेशी साठविण्यात आलेले लहान उपकरण अवकाशात पाठविण्याची योजना तयार करीत आहे?
अ. NASA अमेरिका
ब. ISRO भारत
क. ESA युरोप
ड. CNSA चीन

37. भारतीय ‘नौदल दिन’ कोणत्या दिवशी पाळला जातो?
अ. 12 नोव्हेंबर
ब. 05 डिसेंबर
क. 12 सप्टेंबर
ड. 2 डिसेंबर

38. भारताच्या पूर्व किनारपट्टीत असलेल्या कोणत्या राज्यामध्ये कौशल्य विकासासंदर्भात वातावरणामध्ये सुधारणा करण्यासाठी भारत सरकार आणि आशियाई विकास बँक (ADB) यांच्यात $85 दशलक्षचा कर्ज करार झाला?
अ. ओडिशा
ब. आंद्रप्रदेश
क. पश्चिम बंगाल
ड. यापैकी नाही

39. जागतिक बँकेनी हवामान कृती गुंतवणूक 2021-25 साठी किती गुंतवणूकीची घोषणा केली आहे?
अ. 100 अब्ज डॉलर्स
ब. 200 अब्ज डॉलर्स
क. 300 अब्ज डॉलर्स
ड. 400 अब्ज डॉलर्स

40. कोण आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रिडा महासंघ (ISSF) याच्या पंच समितीमधील एक सदस्य म्हणून निवड होणारे पहिले भारतीय बनले?
अ. रमेश सिंग
ब. पान सिंग तोमार
क. पवन सिंग
ड. मिल्खा सिंग

41. कोणत्या भारतीय शहरात 'आंतरराष्ट्रीय भालू परिषद' आयोजित केली गेली?
अ. दिल्ली
ब. आग्रा
क. चेन्नई
ड. मुंबई

42. कोणत्या भारतीय बॅडमिंटनपटूने 'टाटा ओपन बॅडमिंटन अजिंक्यपद 2018' स्पर्धेत पुरूष गटाचे विजेतेपद पटकावले?
अ. लक्ष्मण सेन
ब. वृषाली गुम्मडी
क. कुनालवूत वितिदर्सन
ड. आनंद पिल्लाई

43. भारत आणि कोणत्या देशांमध्ये 'शिन्यूयु मैत्री-18' हा संयुक्त हवाई सराव आयोजित केला गेला?
अ. मलेशिया
ब. जपान
क. दक्षिण कोरिया
ड. ऑस्ट्रेलिया

44. गिनिया सेंटर (दक्षिण अमेरिका) येथून ISRO द्वारे भारताचा सर्वात वजनदार 'जीसॅट-11' उपग्रह पाठवला गेला. 'जीसॅट-11' हा एक ..... आहे?
अ. दळणवळण उपग्रह
ब. सुदूर संवेदी उपग्रह
क. ध्रुवीय उपग्रह
ड. जमिनी उपग्रह

45. नुकत्याच झालेल्या जी-20 शिखर परिषदेदरम्यान भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हॅमबर्ग घोषणापत्र संदर्भित केले. त्यांनी कोणत्या जागतिक समस्येशी लढा देण्यासाठी घोषणापत्राचा संदर्भ दिला?
अ. दारिद्य्र
ब. कुपोषण
क. दहशतवाद
ड. असमनाता

46. 'एक्स-कोप इंडिया 2018' हा कोणत्या दोन देशांच्या दरम्यानचा संयुक्त हवाई सराव आहे?
अ. भारत- अमेरिका
ब. भारत- जपान
क. रशिया -भारत
ड. व्हिएतनाम- भारत

47. कोणत्या शहरात भारत आणि संयुक्त अरब अमीरात यांच्या आर्थिक व तांत्रिक सहकार्यासाठीच्या संयुक्त आयोगाची अबवी बैठक आयोजित केली गेली?
अ. दुबई
ब. अबू धाबी
क. दिल्ली
ड. चेन्नई

48. कोणत्या पेट्रोलियम उत्पादक देशाने जानेवारी 2019 मध्ये 'पेट्रोलियम निर्यातदार देशांची संघटना' (OPEC) या समुहामधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे?
अ. व्हेनेझुएला
ब. इराण
क. संयुक्त अरब अमीरत
ड. कतार

49. कोणता देश नैसर्गिक वायूचा (LNG) जगातला सर्वात मोठा निर्यातदार देश आहे?
अ. सौदी अरेबिया
ब. संयुक्त अरब अमीरत
क. कतार
ड. रशिया

50. ONGCच्या 149 तेल क्षेत्रांना विकण्यासाठी म्हणून तयार केलेल्या सहा सदस्यांच्या समितीचे प्रमुख कोण आहेत?
अ. राजीव कुमार
ब. एस. के. शर्मा
क. रणधीर सिंग
ड. सी. पी.कपाडिया

51. 'पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन 2018' स्पर्धा कोणी जिंकली?
अ. अटलाव्हीम देबेबे
ब. तेशोमे गेटाच्यु
क. बेकेले असेफा
ड. फेकेडे तील्हाऊन

52. जी-20 समुहाचा कोणता देश 2015 सालाच्या पॅरिस हवामानातील बदल करारामधून बाहेर पडला आहे?
अ. भारत
ब. चीन
क. अमेरिका
ड. फ्रान्स

53. संरक्षण अधिग्रहण परिषद (DAC) याने भारतीय नौदलासाठी दोन जहाजांसाठी स्वदेशी ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या अधिग्रहणासाठीचा प्रस्ताव मंजुर केला. ब्रह्मोस क्षेपणास्त्राचा विकास कोणत्या दोन देशांनी संयुक्तपणे केला?
अ. भारत आणि जपान
ब. भारत आणि रशिया
क. भारत आणि अमेरिका
ड. भारत आणि दक्षिण कोरिया

54. ब्रह्मोस क्षेपणास्त्र ... येथून सोडले जाऊ शकते?
अ. पाणबुडी
ब. जमीन
क. विमान
ड. वरील सर्व

55. पक्ष परिषदेची (COP) बडवी बैठक कोणत्या देशात आयोजित केली गेली?
अ. पोलंड
ब. ऑस्ट्रेलिया
क. संयुक्त राज्य अमेरिका
ड. चीन

56. पक्ष परिषदेच्या (COP) बडव्या बैठकीत कोणी भारताचे प्रतिनिधीत्व केले?
अ. राष्ट्रपती रामनाथ कोविंद
ब. पंतप्रधान नरेंद्र मोदी
क. पर्यावरण मंत्री डॉ. हर्ष वर्धन
ड. संरक्षण मंत्री निर्मला सीतारामन

57. कोणते राज्य 'आणीबाणी प्रतिसाद सहाय्य यंत्रणा' (ERSS) कार्यरत करण्यात आलेले ईशान्य भारतातले पहिले राज्य आणि देशातले दुसरे राज्य बनले?
अ. मिझोरम
ब. नागालँड
क. आसाम
ड. मणिपूर

58. योग्य विधाने ओळखा
१. अमेनेस्टी इंटरनॅशनलने म्यानमारच्या आंग सान सू की यांना दिलेला सन्मान परत घेतला
२. अमेनेस्टी इंटरनॅशनल या जागतिक मानवाधिकार संघटनेनी म्यानमारच्या आंग सान सू की यांना 2009 साली बहाल केलेला 'अॅम्बेसेडर ऑफ कोन्सायन्स अवॉर्ड' हा सन्मान देण्यात आला होता
अ. १ योग्य
ब. २ योग्य
क. १ आणि २ दोन्ही योग्य
ड. १ आणि २ दोन्ही अयोग्य

59. अयोग्य विधाने ओळखा
१. पणजीमध्ये 'सार्वजनिक आरोग्यासाठी योग विषयक आंतरराष्ट्रीय परिषद'चे आयोजन करण्यात आले होते
२. दोन दिवसीय या परिषदेचे आयोजन भारत सरकारच्या AYUSH मंत्रालयातर्फे करण्यात आले.
३. 50 देशांमधील प्रतिनिधींनी परिषदेत भाग घेतला होता.
अ. फक्त १
ब. फक्त २
क. फक्त ३
ड. एकही नाही

60. योग्य विधाने ओळखा.
१. भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्त्रो ने GSLV-MK-III Dब या प्रक्षेपकाद्वारे GSAT-29 या दळणवळण उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले. .
२. आंध्रप्रदेशातील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अवकाश तळावरुन हे प्रक्षेपण झाले.
३. जीसॅट-२९ उपग्रह ३,४२३ किलो वजनाचा आहे.
४.GSLV-MK-III D2 भारताचे सर्वात वजनदार रॉकेट असून या रॉकेटचे वजन ६४१ टन आहे.
अ. १ आणि २
ब. २ आणि ३
क. १ ३. ४.
ड. वरील सर्व

61. प्रादेशिक व्यापक आर्थिक भागीदारी (RCEP) हा 16 देशांमध्ये झालेला एक मुक्त व्यापार करार आहे. त्यासंबंधी कोणते विधान अचूक आहे?
I. ASEAN आणि 6 ASEAN FTA भागीदारांच्या दरम्यान प्रस्तावित केला गेलेला मोठा प्रादेशिक मुक्त व्यापार करार आहे.
II. भारत, चीन, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, जपान आणि पाकिस्तान हे या गटाचे सदस्य आहेत.
अ. केवळ I
ब. केवळ II
क. I आणि II दोन्ही
ड. यापैकी नाही

62. नोव्हेंबर महिन्यात कोणत्या राज्यात कार्यरत असलेल्या 7 जहालमतवादी गटांवर आलेल्या बंदीचा काळ आणखी पाच वर्षांसाठी वाढविण्यात आला आहे?
अ. नागालँड
ब. मणिपूर
क. आसाम
ड. मेघालय

63. स्पाइडरमॅन आणि हल्क यासारखे सुपरहिरो तयार करणार्यास प्रसिद्ध कॉमिक पुस्तक लेखकाचे निधन झाले आहे. या प्रतिष्ठित पुस्तक लेखकाचे नाव काय आहे?
अ. फ्रान्स मिलर
ब. स्टॅन ली
क. जॅक किर्बी
ड. अलेक्स रॉस

64. कोणत्या देशासह भारताने “समुद्र शक्ती” हा सागरी सराव आयोजित केला?
अ. संयुक्त राज्य अमेरिका
ब. जपान
क. इंडोनेशिया
ड. थायलंड

65. कुठे द्वितीय ‘स्टार्टअप इंडिया गुंतवणूक परिसंवाद’ आयोजित करण्यात आला?
अ. बीजिंग
ब. मुंबई
क. सेयुल
ड. टोकियो

66. भारत आणि कोणत्या देशाच्या दरम्यान ‘इंद्रा’ नावाचा संयुक्त लष्करी सराव आयोजित केला जात आहे?
अ. चीन
ब. अमेरिका
क. रशिया
ड. इंडोनेशिया

67. योग्य विधाने ओळखा
१. कोचीमध्ये ‘इंडियन ओशन नेव्हल सिम्पोझियम (IONS)’ याचा 10वा वर्धापन दिन साजरा करण्यासाठी एक परिसंवाद आयोजित केले गेले होते.
२. IONS अॅज ए कॅटालिस्ट फॉर SAGAR" या विषयाखाली हा कार्यक्रम चालवला गेला
३. एकूण कब देश IONSचे सदस्य आहेत.
४. सन 2018 मध्ये इराणी नौदलाने दोन वर्षांसाठी IONS चे अध्यक्षपद स्वीकारलेले आहे
अ. १ आणि २
ब. २ आणि ३
क. १ ३ ४
ड. वरील सर्व

68. योग्य विधाने ओळखा
१. NITI आयोगाने ‘हिमालय राज्य प्रादेशिक परिषद’ची स्थापना केली
२. परिषदेच्या अध्यक्षपदी NITI आयोगाचे डॉ. व्ही. के. सारस्वत हे असतील.
३. भारतीय हिमालयाच्या क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी ही परिषद तयार करण्यात आली आहे.
अ. १ आणि २
ब. २ आणि ३
क. फक्त १
ड. वरील सर्व

69. योग्य विधाने ओळखा
१. भारताच्या पंकज अडवाणी ह्याने यंगून येथे खेळली गेलेली ‘IBSF बिलियड्र्स’ ही क्रिडास्पर्धा जिंकली आहे.
२. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात म्यानमारच्या नाय थ्वॉय ओ ह्याला पराभूत केले.
३. अडवाणीने जिंकलेल्या एकूण जागतिक स्पर्धांची संख्या 20 इतकी झाली आहे..
४. या महासंघाची स्थापना 1971 साली करण्यात आली. महासंघाचे येथे मुख्यालय आहे
अ. १. २. ३.
ब. २. ३. ४
क. १. आणि २
ड. वरील सर्व

70. अयोग्य विधाने ओळखा
१. आंध्रप्रदेश राज्य सरकारने 'धम्म चक्का' किंवा 'द व्हील ऑफ लॉ' चित्रित असलेले बोधचिन्ह राज्याचे राज्य चिन्ह म्हणून निश्चित केले आहे.
२. हे बोधचिन्ह अमरावती स्कूल ऑफ आर्ट या संस्थेनी तयार केले आहे.
३. चिन्हात 'धम्म चक्का' (पाली भाषेत) म्हणजेच 'धर्म चक्र' (संस्कृत भाषेत) याने सर्वाधिक जागा व्यापलेली आहे.
अ. फक्त १
ब. फक्त २
क. फक्त ३
ड. वरील पैकी एकही नाही

71. अयोग्य विधाने ओळखा
१. महाराष्ट्रातले दुसरे मेगा फूड पार्क औरंगाबाद जिल्ह्यातल्या पैठण तालुक्यात वाहेगाव आणि धनगांव या गावांमध्ये उभारण्यात आले आहे.
२. राज्यातल्या तिसऱ्या मेगा फूड पार्कलाही मंत्रालयाने मंजुरी दिली असून ते वर्धा जिल्ह्यात उभारण्यात येणार आहे.
३. राज्यातले पहिले मेगा फूड पार्क सातारा जिल्ह्यात आहे.
अ. फक्त
ब. फक्त २
क. फक्त ३
ड. एकही नाही

72. योग्य विधाने ओळखा
१.भारताची धावपटू हिमा दास ह्यांची संयुक्त राष्ट्रसंघ बाल कोष (UNICEF) राजदूतम्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
२. संयुक्त राष्ट्रसंघ बाल कोष याचे मुख्यालय न्यूयॉर्क शहर येथे आहे.
३. UNICEF आधी 1947रोजी 'युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रन्स इमर्जन्सी फंड' या नावाने स्थापना करण्यात आली होती.
४. पोलंडचे डॉक्टर लुडविक राज्चमॅन हे UNICEFचे संस्थापक म्हणून ओळखले जातात आणि ते या संघटनेचे पहिले अध्यक्ष होते.
अ. १ आणि २
ब. २ आणि ३
क. १. २. ड
ड. वरील सर्व

73. NITI आयोगाने तयार केलेल्या 'हिमालय राज्य प्रादेशिक परिषद' याच्या अध्यक्षपदी कोणाची नेमणूक केली गेली?
अ. अमिताभ कांत
ब. राजीव कुमार
क. एन. के. सिंग
ड. डॉ. व्ही. के सारस्वत

74. 14 नोव्हेंबरला कोणत्या देशाने भारतासह पाच वर्षांच्या द्वैपक्षीय कर्करोग संशोधन कार्यक्रमासाठी करारावर स्वाक्षरी केली?
अ. फिनलंड
ब. ऑस्ट्रिया
क. ब्रिटन
ड. स्वीडन

75. आंध्रप्रदेश राज्याचे राज्य चिन्ह ...... द्वारे तयार केले गेले आहे?
अ. मथुरा स्कूल ऑफ आर्ट
ब. गांधार स्कूल ऑफ आर्ट
क.अमरावती स्कूल ऑफ आर्ट
ड. वरील सर्व

76. कोणत्या सरकारी संस्था/विभागाने 'युवा सहकार - कोऑपरेटीव्ह एंटरप्राइज सपोर्ट अँड इनोव्हेशन स्कीम' ही योजना सुरू केली आहे?
अ. भारतीय लघुउद्योग विकास बँक
ब. राष्ट्रिय कृषी व विकास बँक
क. राष्ट्रिय सहकार विकास मंडळ
ड. राष्ट्रिय कौशल्य विकास मंडळ

77. 87व्या इंटरपोल महासभेची बैठक ...... येथे आयोजित केली गेली.
अ. दुबई ब. पॅरिस
क. टोरांटो ड. दिल्ली

78. केंद्र सरकारने अलीकडेच 'युवा रस्ते सुरक्षा शिकाऊ परवाना कार्यक्रम' सुरू केला. त्यासंदर्भात कोणते विधान अचूक आहे?
I. सन 2020 पर्यंत रस्त्यावर होणार्याआ अपघातांच्या संख्येत 50% पर्यंत घट होण्याचे लक्ष्य साध्य करण्यासाठीच्या उद्देशाने हा कार्यक्रम आहे.
II. डिएगो इंडिया आणि इंस्टीट्यूट ऑफ रोड ट्रॅफिक एज्युकेशन (IRTE) याच्या सहकार्याने सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर हा पुढाकार सुरू करण्यात आला आहे.
अ. केवळ I ब. केवळ II
क. I आणि II दोन्ही ड. यापैकी कोणतेही नाही

79. सन 2017 मध्ये ब्रिटनमध्ये शाळकरी गरीब मुलींना मासिक पाळीत लागणारी स्वच्छतेसंबंधी (सॅनिटरी) उत्पादने विनामूल्य पुरवावी अशी मागणी करणारी '#फ्री पीरियड्स' मोहीम कोणी चालवली?
लक्षात घ्या: तिला 2018 सालासाठी सामाजिक प्रगतीसाठीचा 'ऑस्कर' म्हणून समजला जाणारा पुरस्कार दिला गेला.
अ. मारिया जोसेफ ब. कविता भारद्वाज
क. वर्षा सिंग ड. अमिका जॉर्ज

80. सप्टेंबर 2018 मध्ये दिलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार:
I. केवळ आयकर रिटर्न दाखल करण्यासाठी आणि PANच्या वाटपासाठी आधार आवश्यक आहे.
II. हे बँक खाती उघडणे किंवा दूरसंचार क्षेत्रातल्या ऑपरेटरकडून सिम कार्डे मिळविण्यासाठी देखील आवश्यक आहे.
III. CBSE, NEET आणि UGC याच्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी आधार क्रमांकाची आवश्यकता नाही.
IV. न्यायालयाने कलम 33 (2) रद्द केला, जो राष्ट्रीय सुरक्षा प्रश्नांसाठी आधार डेटा उघड करण्यास परवानगी देतो.
वरील कोणते विधान सत्य आहे?
अ. केवळ I आणि III
ब. केवळ II, III, आणि IV
क. केवळ I, III, आणि IV
ड. सर्व सत्य आहे

81. 14 सप्टेंबर 2018 रोजी 'शिल्प गुरु' आणि 'राष्ट्रीय मास्टर क्राफ्ट व्यक्ती पुरस्कार' यांचे वाटप करण्यात आले. पुढील कोणते विधान अचूक आहे?
I. शिल्प गुरु पुरस्कार विजेत्यांना 2,00,000 रुपये रोख बक्षीस देण्यात आले.
II. राष्ट्रीय पुरस्कार विजेत्यांना 1,00,000 रुपये रोख बक्षीस देण्यात आले.
III. हे पुरस्कार एखाद्या शिल्पकाराला आयुष्यात केवळ दोनदाच दिले जातात.
योग्य पर्याय निवडा
अ. I आणि II
ब. II आणि III
क. I आणि III
ड. वरील सर्व

82. महाराष्ट्रने खुल्यावर शौच करणार्या्ला, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणार्याषला आणि थुंकणार्याालाला दंड ठोठावण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंबंधी कोणते विधान बरोबर नाही,
I. खुल्यावर शौच करणार्यावला 500 रूपयांपर्यंत दंड ठोठावला जाईल.
II. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणार्या5ला आणि थुंकणार्याडला अनुक्रमे रु. 500 आणि रू. 500 पर्यंत दंड ठोठावला जाईल.
अ. केवळ I
ब. केवळ II
क. I आणि II दोन्ही
ड. कोणतेही नाही

83. कुठे 7-9 सप्टेंबर 2018 या कालावधीत चौथ्या 'जागतिक मान्यता शिखर परिषद 2018' (WOSA -2018) याचे आयोजन करण्यात आले?
अ. पॅरिस, फ्रान्स
ब. नवी दिल्ली , भारत
क. वॉशिंग्टन डीसी, अमेरिका
ड. यापैकी नाही

84. जगभरात आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन केव्हा पाळला जातो?
अ. 14 सप्टेंबर
ब. 15 सप्टेंबर
क. 16 सप्टेंबर
ड. 17 सप्टेंबर

85. ऑक्टोबर 2018 मध्ये निधन झालेल्या दिल्लीच्या माजी मुख्यमंत्र्याचे नाव काय आहे?
अ. मदनलाल खुराणा
ब. सोमनाथ चॅटर्जी
क. कुंदन शहा
ड. यापैकी नाही

86. ऑक्टोबर 2018 मध्ये बेनामी मालमत्ता व्यवहार प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत केंद्र सरकारने कड सत्र न्यायालये अधिसूचित केली आहेत. तर हा कायदा भारतात कोणत्या साली संपूर्णपणे लागू करण्यात आला?
अ. सन 1988
ब. सन 2008
क. सन 2001
ड. सन 2016

87. कोणत्या व्यक्तीस 2018 सालचा अर्थशास्त्रातला नोबेल पारितोषिक दिला जात आहे?
अ. पॉल रोमार
ब. विल्यम नॉर्दास
क. अ आणि ब
ड. पॉल कुगमॅन

88. योग्य विधाने निवडा
१. उत्तरप्रदेश राज्याच्या आग्रा शहरात ‘आंतरराष्ट्रीय भालू परिषद’ याला सुरुवात झाली.
२. भालू या वन्यप्राण्याच्या संरक्षणार्थ आणि संवर्धनार्थ प्रयत्न करण्याच्या उद्देशाने, या परिषदचे आयोजन करण्यात आले आहे
३. तीन दिवस चालणार्याय या परिषदेत अअ देशांमधून 80 प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.
४. अमेरिका आणि कॅनडा या देशांमधील बियर केयर ग्रुपसह ‘वाइल्ड लाइफ SOS’ ही संस्था या परिषदेचे आयोजक आहे.
अ. १ आणि २ ब. फक्त २
क. १ . २. ३ ड. वरील सर्व

89. योग्य पर्याय निवडा
१. भारताचा नेमबाज अभिनव बिंद्रा याला ‘ब्लू क्रॉस’ या नेमबाजीतल्या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.
२. आंतरराष्ट्रीय संघटना आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रिडा महासंघ (ISSF)ने हा मानाचा पुरस्कार जाहीर केला असून
३. हा पुरस्कार मिळविणारा अभिनव बिंद्रा हा दुसरा भारतीय नेमबाज आहे.
अ. फक्त १ ब. फक्त २
क. १ आणि २ ड. वरील सर्व

90. खालील योग्य विधाने निवडा
१. आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिन क डिसेंबर रोजी पाळला जातो.
२. 2018 ची थिम 'अपंक व्यक्तींचे सशक्तीकरण आणि समावेशकता आणि समानता सुनिश्चित करणे' ही आहे
३. स्थापना 1992 (संयुक्त राष्ट्र आम सभेद्वारा करण्यात आली होती
अ. १ आणि २ ब. २ आणि ३
क. फक्त १ ड. वरील सर्व

91. अयोग्य विधाने ओळखा
१. भारतीय नौदलाचे प्रमुख एडमिरल सुनील लांबा यांच्या हस्ते 'ब्लू वॉटर्स अहोय!' हे शीर्षक असलेल्या पुस्तकाचे अनावरण करण्यात आले आहे.
२. वाइस ॲडमिरल (निवृत्त) अनुप सिंग हे या पुस्तकाचे लेखक आहेत.
३. भारतीय नौदलाचा इतिहास सांगणारे हे पुस्तक सन 2001 पासून ते सन 2010 पर्यंत या काळात भारतीय नौदलाने केलेल्या ऐतिहासिक कार्यांचा हवाला देते.
४. हे पुस्तक भारतीय नौदलाचा इतिहास सांगणार्ा पुस्तक मालिकेमधील सहावा खंड आहे.
अ. फक्त १ ब. फक्त २
क. १ आणि ४ अयोग्य ड. एकही अयोग्य नाही

92. अयोग्य विधाने ओळखा
१. G-20 शिखर परीषद 2018 अर्जेंटीनाच्या ब्यूनस आयर्स येथे आयोजित केली गेली.
२. G-20 हे जगभरातील 20 प्रमुख अर्थव्यवस्थांचा एक समूह आहे.
३. या वर्षी शिखर परीषदेचा विषय. 'Building Consensus for Fair and Sustainable Development' हा होता.
४. शिखर परीषदे दरम्यान चर्चेतील महत्वाचे मुद्दे हवामान, व्यापार,IMFभ्रष्टाचार,लैंगिक असमानता, कामाचे भविष्य,पायाभूत सुविधा हे असणार आहेत
अ. फक्त १ ब. २ आणि ३
क. वरील सर्व ड. यापैकी नाही

93. केंद्रीय मंत्रिमंडळाने 'संलग्न आणि आरोग्यसेवा व्यवसाय विधेयक-2018' याला मंजुरी दिली आहे. त्या संदर्भात कोणते विधान अचूक आहे?
I. केंद्रीय आणि संबंधित राज्य संलग्न आणि आरोग्यसेवा परिषदांची स्थापना करण्यात येणार.
II. आरोग्यसेवा क्षेत्रात धोरणे तयार करण्यासाठी राज्य सरकारच्या परिषदांची कोणतीही भूमिका नसणार.
III. केंद्रीय परिषदेत 47 सदस्यांचा समावेश असेल, ज्यात अड कार्यकारी आणि कक गैर-कार्यकारी सदस्य असतील.
IV. राज्य परिषदेत 7 कार्यकारी आणि बअ गैर-कार्यकारी सदस्य असतील.

अ. I आणि II | ब. II, III, IV
क. I, III, IV | ड. वरील सर्व

94. योग्य विधाने ओळखा
१. नवी दिल्लीत 'इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल (IIC) कार्यक्रम' आयोजित केले गेले
२. 21 नोव्हेंबर 2018 रोजी नवी दिल्लीत 'इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल (IIC) कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता.
३. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या 'अभिनवता विभाग (Innovation cell)' तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अ. १ आणि २ | ब. २ आणि ३
क. १. २. ३. | ड. एकही नाही

95. योग्य विधाने ओळखा
अ गोव्याच्या 49व्या 'भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' (IFFI) याची संकल्पना स्प्रेड द जॉय ऑफ सिनेमा".ही होती
२. 49व्या IFFI मधील 'इंडियन पर्सनॅलिटी ऑफ द इयर' पुरस्का ीर विजेता अमिताभ बच्चन यांना देण्यात आला
३. IFFI 2018 मधील सर्वोत्कृष्ट चित्रपट (सुवर्ण मयूर) पुरस्कार विजेता - 'डॉनबास' यांना देण्यात आला.
४. 2018 सालचा IFFI जीवनगौरव पुरस्कार विजेता – डेन वोलमन (इस्राएलचे चित्रपट निर्माता). यांना देण्यात आला

अ. १ २ ४ | ब. २ ३ ४
क. १. २ ३ | ड. वरील सर्व

96. खालीलपैकी योग्य विधाने ओळखा
१. राष्ट्रीय प्रकल्प बांधकाम महामंडळ मर्यादित (National Projects Construction Corporation Limited - NPCC) - मिनीरत्न: श्रेणी-I चा देण्यात आला
२. संरक्षण क्षेत्रातल्या स्वदेशी उद्योगांमध्ये बौद्धिक संपदा अधिकार (IPR) याबाबत प्रोत्साहन देण्यासाठी प्रकल्प -'मिशन रक्षा ज्ञान शक्ती'.सुरू करण्यात आला

अ. फक्त १ | ब. फक्त २
क. अ आणि ब दोन्ही योग्य | ड. अ आणि ब दोन्ही अयोग्य

97. योग्य विधाने ओळखा
१. भारताचे नवे मुख्य निवडणूक आयुक्त - सुनील अरोरा यांची नेमणूक करण्यात आली आहे
२. 1961 सालच्या प्राप्तीकर कायद्याचा आढावा घेण्यासाठी आणि नवा प्रत्यक्ष कर कायद्याचा मसूदा तयार करण्यासाठी असलेल्या भारताच्या कृती दलाचे प्रमुख - अखिलेश रंजन यांची निवड करण्यात आली आहे.
३. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC)अध्यक्षपदी अरविंद सक्सेना यांची नियुक्ती करण्यात आली आहे

अ. फक्त १ | ब. १ आणि २
क. फक्त २ | ड. वरील सर्व

98. योग्य विधाने ओळखा
१. 'सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय अजिंक्यपद ब0अ8' या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकल गटाचा विजेता समीर वर्मा (भारत). ठरला
२. सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन' अजिंक्यपद ही दरवर्षी भारतात लखनऊ शहरात खेळली जाणारी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धा आहे
अ. फक्त १
ब. फक्त २
क. १ आणि २ दोन्ही
ड. यापैकी नाही

99. योग्य विधाने ओळखा
१. आणीबाणी प्रतिसाद सहाय्य यंत्रणा' कार्यरत करण्यात आलेले देशातले पहिले राज्य - हिमाचल प्रदेश.ठरेल
२. ISROने 29 नोव्हेंबरला भारताचा अत्याधुनिक पृथ्वी निरीक्षण उपग्रह - हायसिस हा पाठवला
३. UGCच्या कन्सोर्टियम ऑफ अॅकडमिक अँड रिसर्च ईथिक्स' (CARE)चे अध्यक्ष - UGCचे उपाध्यक्ष (वर्तमानात भूषण पटवर्धन) यांची निवड करण्यात आली
४. राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे (NSDC) नवे अध्यक्ष - अनिल मनीभाई नाईक यांची निवड करण्यात आली आहे
अ. १ २ ३
ब. २ ३ ४
क. १ ३ ४
ड. वरील सर्व


100. योग्य विधाने ओळखा
१. इंडिया स्किल्स रिपोर्ट २०१९ची 6वी आवृत्ती प्रसिद्ध करण्यात आली.
२. या अहवालात रोजगार प्रदान करण्याच्या बाबतीत प्रथम तीन राज्ये आंध्रप्रदेश (प्रथम) ,राजस्थान (दुसऱ्या), हरियाणा (तिसऱ्या) आहेत.
३. हे सर्वेक्षण व्हीबॉक्स, पीपलस्ट्राँग आणि भारतीय उद्योग महासंघाद्वारे (CII) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांनी मिळून केले आहे.
अ. १ आणि २
ब. २ आणि ३
क. वरील सर्व
ड. वरील एकही नाही

# उत्तरतालिका

| प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | २६ | क | ५१ | अ | ७६ | क |
| २ | ड | २७ | अ | ५२ | क | ७७ | अ |
| ३ | अ | २८ | ड | ५३ | ब | ७८ | क |
| ४ | अ | २९ | ड | ५४ | ड | ७९ | ड |
| ५ | ड | ३० | ड | ५५ | अ | ८० | क |
| ६ | ड | ३१ | ड | ५६ | क | ८१ | अ |
| ७ | ड | ३२ | ब | ५७ | ब | ८२ | ब |
| ८ | ड | ३३ | क | ५८ | क | ८३ | ब |
| ९ | ड | ३४ | अ | ५९ | ड | ८४ | ब |
| १० | क | ३५ | ब | ६० | ड | ८५ | अ |
| ११ | ड | ३६ | अ | ६१ | अ | ८६ | ड |
| १२ | क | ३७ | ड | ६२ | ब | ८७ | क |
| १३ | अ | ३८ | अ | ६३ | ब | ८८ | ड |
| १४ | ब | ३९ | ब | ६४ | क | ८९ | क |
| १५ | ड | ४० | क | ६५ | अ | ९० | ड |
| १६ | क | ४१ | ब | ६६ | क | ९१ | ड |
| १७ | ड | ४२ | अ | ६७ | ड | ९२ | ड |
| १८ | ड | ४३ | ब | ६८ | ड | ९३ | क |
| १९ | ड | ४४ | अ | ६९ | ड | ९४ | क |
| २० | ड | ४५ | क | ७० | ड | ९५ | ड |
| २१ | अ | ४६ | अ | ७१ | ड | ९६ | क |
| २२ | क | ४७ | ब | ७२ | क | ९७ | ड |
| २३ | क | ४८ | ड | ७३ | ड | ९८ | क |
| २४ | ड | ४९ | क | ७४ | क | ९९ | ड |
| २५ | क | ५० | अ | ७५ | क | १०० | क |

# The Reliable Publication, Pune
























The Name Of Quality

Knowledge is Power

संस्थापक : श्री. मनोहर पाटील

# Reliable Academy®

ISO 9001 : 2015

चालु घडामोडींचे मासिके, अभ्यासक्रम, सराव प्रश्न पत्रिका, नोकरी संदर्भ, विषयावरील महत्त्वाच्या PDF साठी आमच्या संकेत स्थळाला भेट द्या.

**www.reliableacademy.com**

## मुख्य वैशिष्टये

१) अनुभवी व तज्ञ प्राध्यापक (मुंबई-पुणे-औरंगाबाद-नाशिक)

२) दर्जेदार व अद्यावत नोट्स

३) सर्व स्पर्धापरीक्षेची पुस्तके व मासिके वाचनास मोफत उपलब्ध

४) पूर्व आणि मुख्य परीक्षाभिमुख सराव चाचण्या

५) मुलाखातीसाठी तज्ञ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

६) स्पर्धापरीक्षेचे फॉर्म मोफत भरुन दिले जातील.

७) २४ तास सुसज्ज A/C लायब्ररी (मुले व मुलींसाठी स्वतंत्र)

८) शालेय पुस्तकांवर आधारीत सराव परिक्षा

## Features:

- Expert Faculty
- Online Exam Practice
- Projector Presentations
- Qualititative Materials
- 200 Update Test Series Topicwise online / off Line
- 18 A/C Library
- Maths & Reasoning Tricks
- Personal Attention
- Interview Guidance
- CCTV Surveillance
- AC Class Room
- Personality Development
- Memory Technique Course
- Committed to Result

## संपूर्ण मार्गदर्शन

१) राज्यसेवा पूर्व व मुख्य परीक्षेची तयारी कशी करावी?

२) PSI/STI/ADO पूर्व व मुख्य परीक्षेची तयारी कशी करावी?

३) प्रत्येक विषयाचा अभ्यास कोणत्या पध्दतीने करावा?

४) सराव परीक्षांमध्ये कशाप्रकारे सुधारणा करावी?

५) अभ्यासाचे वार्षिक नियोजन कसे असावे?

६) वर्तमानपत्र वाचन व चालू घडामोडीची तयारी कशी करावी?

७) आगामी काळातील परीक्षेची एकत्रित तयारी करते वेळी कोणती काळजी घ्यावी?

**Join Us :**

@mpscofficers | 9222333999 | @Reliable Academy

## Kalyan (Head Office)

- 5th Floor, C.J.Joshi Complex, Above Vodafone Store, Opp. Railway reservation counter, Kalyan (W)

## Kalyan (Library)

- Reliable 24*7 A/C Library, Near Waman Hari Pethe Jewellers Shivaji Chowk, Kalyan (W)

## Nashik (Office)

- Suyojit Avdhoot Tower, Below Vikhe Patil Bank, Dongre Vastigruh,Old Gangapur Naka, Nashik

## Nashik (Library)

- 2nd Floor, Shraddha Sankul Building, Nr.Vihar Hotel, Old Gangapur Naka, Gangapur Road, Nashik

Email : thereliableacademy@gmail.com

# 9222333999